सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, २ डिसेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक १७ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



तुमचा विचार कितीही श्रेष्ठ असला तरी, जोपर्यंत त्या विचारानुसार व्यवहार करणारा समाज निर्माण होत नाही, प्रगत, निरोगी जीवनाला प्रोत्साहन देत नाही, तोपर्यंत लोक त्यावर विश्वास ठेवत नाहीत. विचार मांडणे हा केवळ बौद्धिक विलास नाही. बुद्धीद्वारे कोणताही विचार रुजवण्याने काम होणार नाही. ते प्रत्यक्ष उभे करून दाखवावे लागते.

**- कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

# नेत्यांची प्रलोभनांची विधाने; अजितदादा-शिंदेंसह २० नेते अडचणीत

### • निवडणूक आयोगाकडून गंभीर दखल, जिल्हाधिकाऱ्यांकडून मागवला अहवाल

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.१ डिसेंबर-**

राज्यातील नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी प्रचाराची रणधुमाळी शिगेला पोहोचली असतानाच निवडणूक आयोगाने राजकीय नेत्यांना मोठा दणका देण्याची तयारी केली आहे. प्रचाराच्या ओघात मतदारांना आर्थिक प्रलोभने दाखवणे आणि निधीची धमकी देणे, यांसारखी विधाने करणाऱ्या नेत्यांची निवडणूक आयोगाने दखल घेतली आहे.



यामध्ये खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि भाजपा नेत्या चित्रा वाघ यांच्यासह २० बड्या नेत्यांचा समावेश असून, आयोगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून तात्काळ अहवाल मागवला आहे. मंगळवार, २ डिसेंबर रोजी राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मतदान होत असून, बुधवारी मतमोजणी पार पडणार आहे. आज प्रचाराचा शेवटचा दिवस असल्याने सर्वच पक्षांनी ताकद पणाला लावली आहे. मात्र, शेवटच्या टप्प्यात ही कारवाईची बातमी आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. निवडणूक आयोगातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आचारसंहितेचा भंग होईल अशी वक्तव्ये करणाऱ्या २० नेत्यांची यादी तयार करण्यात आली आहे.

**प्रलोभने देणारी नेत्यांची विधाने?**

आयोगाच्या रडारवर असलेल्या नेत्यांनी भरसभेत मतदारांना आकर्षित करण्यासाठी




किंवा धमकावण्यासाठी विविध विधाने केल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तुमच्या हातात मत आहे, तर माझ्या हातात निधी आहे. राष्ट्रवादीला मतदान न केल्यास निधीला कात्री लावणार, अशा आशयाचे विधान केले होते. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही अप्रत्यक्षपणे 'तिजोरीच्या चाव्या' संदर्भातील वक्तव्य केले होते. मंत्री गुलाबराव पाटील यांनी मतदानाच्या आदल्या रात्री 'लक्ष्मी दर्शन' होणार असल्याचे विधान केले होते. तर भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी खा कुणाचंही मटण, पण दाबा कमळाचं बटण, असे विधान केले होते.

### व्हिडिओ रेकॉर्डिंग तपासून अहवाल

निवडणूक आयोगातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अशा प्रकारची वादग्रस्त विधाने करणाऱ्या सुमारे २० नेत्यांची यादी तयार करण्यात आली आहे. आयोगाने ज्या ठिकाणी ही वक्तव्ये झाली, त्या ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांना व्हिडिओ रेकॉर्डिंग तपासून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

### नीलेश राणेही अडचणीत?



निवडणुकीत मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्व प्रकारच्या हालचालींवर आयोग आता कठोर भूमिका घेण्याच्या तयारीत आहे. निवडणुकीच्या तोंडावर आयोगाने घेतलेल्या या भूमिकेमुळे प्रलोभणे देणारी वक्तव्य करणाऱ्या नेत्यांवर कारवाईची टांगती तलवार निर्माण झाली आहे. यासंदर्भात निवडणूक आयोग नेमकी कोणती कारवाई करते, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे. दुसरीकडे, मालवणमध्ये भाजप कार्यकर्त्याच्या घरी स्टिंग ऑपरेशन केल्याप्रकरणी शिंदे गटाचे आमदार निलेश राणे यांच्यावरही गुन्हा दाखल झाला आहे, असून त्यांच्या देखील अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

## महत्त्वाचे

### बाजाराची विक्रमी पातळीवरून घसरण



**मुंबई** : सोमवारी भारतीय शेअर बाजारात दिवसभर जोरदार चढ-उतार पाहायला मिळाला. सकाळच्या सत्रात मोठी तेजी दिसल्यानंतर बाजारात मोठी नफा वसुली झाली. यामुळे निर्देशांक आणि निफ्टी यांची दिवसभरातील तेजी एका क्षणात गडप झाली. या घसरणीपूर्वी निफ्टीने २६,३२५ चा तर निर्देशांकाने ८५,८५० चा नवा सर्वोच्च उच्चांक गाठला होता. ही तेजी दिवसअखेरपर्यंत टिकू शकली नाही. बाजारातील घसरण आटोक्यात ठेवण्याचे काम ऑटो क्षेत्रातील शेअर्सनी केले. या शेअर्सनी मोठी वाढ नोंदवली. टाटा मोटर्स आणि मारुतीच्या नोव्हेंबर महिन्यातील विक्रीचे आकडे अपेक्षितपणे चांगले राहिल्याने या शेअर्समध्ये मोठी वाढ झाली. यामुळे निर्देशांक घसरले तरी सूचिबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल वाढले.

# 'डिजिटल अरेस्ट'चा तपास सीबीआयकडे

### • सर्वोच्च न्यायालयाचा आदेश • राज्यांना मान्यता देण्याचा निर्देश

**◆ नवी दिल्ली, १ डिसेंबर**

'डिजिटल अरेस्ट'च्या माध्यमातून देशभरात झालेल्या फसवणुकीच्या प्रकरणांचा तपास करा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात् सीबीआयला दिला. या तपासाला मान्यता द्यावी, असा निर्देश न्यायालयाने पश्चिम बंगाल, तामिळनाडू, कर्नाटक, तेलंगणा या विरोधी पक्षांचे सरकार असलेल्या राज्यांना दिला.

सर्वोच्च न्यायालयाने माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्राशी संबंधित मध्यस्थांनाही निर्देश दिला. डिजिटल अरेस्टशी संबंधित सर्वच प्रकरणांतीव विवरण सीबीआयला उपलब्ध करा आणि तपासात सहकार्य करा, असे न्यायालयाने म्हटले आहे. कर आश्रयस्थाने, विदेशी ठिकाणे तसेच इतर देशांमधून होणाऱ्या सायबर गुन्ह्यांतील आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी इंटरपोलची मदत घेतली जावी, असा निर्देश न्यायालयने सीबीआयला दिला.

### एका ग्राहकाला कित्येक सिम विकण्यावर संताप



**»** **एका ग्राहकाला कित्येक सिम विकण्यावरही न्यायालयाने संताप व्यक्त केला. देशातील टेलिकॉम कंपन्यांनी एका ग्राहकाला कित्येक सिम कार्ड उपलब्ध करू नये, हे सुनिश्चित करावे, असा निर्देश दूरसंचार विभागाला दिला. एकाच ग्राहकाला मोठ्या प्रमाणावर सिम कार्ड उपलब्ध केल्यास त्याचा गैरवापर सायबर गुन्ह्यांसाठी केला जाऊ शकतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले.**



### फसवणुकीत वापरलेली खाती गोठवणार




**नागरिकांची फसवणूक करणाऱ्यांसोबत हातमिळवणी करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांची चौकशी करा, असा निर्देश न्यायालयाने दिला. नागरिकांच्या फसवणुकीसाठी वापरण्यात आलेली बँक खाती गोठवण्यासाठी राज्य, केंद्रशासित प्रदेश, त्यांचे पोलिस दल आणि सीबीआय स्वतंत्र आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.**

सायबर गुन्हेगारी आणि डिजिटल अरेस्टच्या या संवेदनशील प्रकरणात न्यायालयाने भारतीय रिझर्व्ह बँकेलाही नोटीस बजावली. सायबर फसवणूक प्रकरणात वापरण्यात आलेली खाती गोठवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा मशीन लर्निंगच्या तंत्रज्ञानाचा वापर का करण्यात आला नाही, असा सवाल न्यायालयाने रिझर्व्ह बँकेला केला.

सायबर गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी न्यायालयाच्या निर्देशाची माहिती गृह मंत्रालय, दूरसंचार विभाग, अर्थ मंत्रालयासह विविध केंद्रीय यंत्रणांना दिली जाईल. सर्वच राज्ये, केंद्रशासित प्रदेशांत या गुन्ह्यांच्या विरोधात क्षेत्रीय आणि राज्य सायबर गुन्हे समन्वय केंद्र स्थापित करण्यास सांगण्यात आले, असा युक्तिवाद केंद्राने केला. *(वृत्तसंस्था)*

# निवडणुका पुढे ढकलण्याचा आयोगाचा निर्णय चुकीचा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची टीका

**◆ छ. संभाजीनगर, १ डिसेंबर**

काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निवडणूक आयोगाने घेतलेला निर्णय उमेदवारांसाठी चुकीचा आणि अन्यायकारक आहे, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केली.

याचिका किंवा न्यायालयीन मुद्द्यावर शेवटच्या क्षणी निवडणुका पुढे ढकलण्याचा आयोगाने घेतलेला निर्णय हा उमेदवारी दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केलेल्यांवर अन्याय आहे, असे त्यांनी प्रचारासाठी पैठणला रवाना होण्यापूर्वी पत्रकारांसोबत संवाद साधताना सांगितले.

कुणाच्या तरी याचिका आणि न्यायप्रविष्ट प्रकरणांमुळे निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय म्हणजे उमेदवारांवर अन्याय आहे, असे फडणवीस म्हणाले. निवडणूक आयुक्तांनी कुणासोबत सल्लामसलत केली माहीत नाही, असे त्यांनी दिलेल्या स्थगितीच्या कायदेशीर आधारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना सांगितले. मला माहीत असलेल्या कायद्यानुसार, कुणी तरी न्यायालयात गेले म्हणून निवडणुका पुढे ढकलल्या जात नाहीत, असे ते म्हणाले.

काही ठिकाणच्या निवडणुका पुढे ढकलण्याबाबत आयोगाने रविवारी घेतलेल्या निर्णयानंतर मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त वक्तव्य केले आहे. नेमक्या किती ठिकाणच्या निवडणुका पुढे ढकलल्या याची घोषणा अद्याप आयोगाने केलेली नाही. या मुद्द्यावर देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक प्रक्रिया झालेल्या लातूर जिल्ह्यातील निलंग्याचे उदाहरण दिले. उमेदवारी फेटाळलेला कुणी तरी न्यायालयात गेला. उमेदवारी अर्ज दाखल केलेल्यांना निवडणूक प्रक्रियेसाठी पूर्ण वेळ देण्यात आला. कुणी तरी न्यायालयात गेले म्हणून निवडणुका रद्द करणे हे पूर्णतः चुकीचे आहे, असे फडणवीस म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

### निवडणूक आयोगाला निवेदन देणार



» निवडणूक आयोग ही एक स्वतंत्र संस्था आहे आणि त्यांना निर्णय घेण्याचा अधिकार आहे. पण, निवडणुका पुढे ढकलणे चुकीचे आहे. उमेदवारांनी केलेले काम पाण्यात गेले आहे. आता आणखी १५ दिवस प्रचार करावा लागणार आहे. आम्ही याबाबत आयोगाला निवेदन देणार आहोत, असे फडणवीस यांनी सांगितले.

### डॉलरच्या तुलनेत रुपयात घसरण



**नवी दिल्ली** : रुपया सोमवारी डॉलरच्या तुलनेत आतापर्यंतच्या सर्वात नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. व्यवहारादरम्यान रुपया ३४ पैशांनी घसरून ८९.७९ च्या पातळीवर आला होता. याने २ आठवड्यांपूर्वीच्या सर्वकालीन नीचांकी पातळी (८९.६६) ला मागे टाकले. २१ नोव्हेंबर रोजी रुपया ९८ पैशांनी घसरला होता. देशांतर्गत शेअर बाजारातील घसरण आणि परदेशी निधीच्या सततच्या काढणीमुळे रुपयावर दबाव वाढला आहे. सकाळी रुपया प्रति डॉलर ८९.४५ च्या पातळीवर उघडला होता. तर, शुक्रवारी डॉलरच्या तुलनेत रुपया ९ पैशांच्या घसरणीसह ८९.४५ वर बंद झाला होता.

# शिंदेसेनेचे नेते शहाजीबापूंच्या ऑफिसवर गुन्हे शाखेचा छापा

### एलसीबी पथकासह निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची तपासणी



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१ डिसेंबर -**

सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक आज मंगळवार दि.२ डिसेंबर रोजी असून रविवार दि.३० नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास एलसीबी पथकासह निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगोल्यात अचानक तपासणी केली. या तपासणीमध्ये शिवसेनेचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांचे कार्यालय तसेच त्यांचे सहकारी माजी नगराध्यक्ष रफिक नदाफ यांचे घरी व सांगोला शहर विकास आघाडीचे कार्यालय व अन्य एका ठिकाणाचा समावेश होता.

> कुणी तरी विरोधकांनी तक्रार केल्यामुळे हा प्रक्रियेचा भाग होता. तो विषय संपला आहे. ह्या प्रकरणी माझी कुणाविषयी तक्रार नाही.
> - शहाजीबापू पाटील, माजी आमदार

रविवारी दुपारी भाजपचे नगराध्यक्ष पदाचे व नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची छत्रपती शिवाजी महाराज चौकात सभा आयोजित करण्यात आली होती. तसेच रात्री शिवसेनेचे नगराध्यक्ष पदाचे व नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ माजी आमदार शहाजीबापू पाटील यांची सांगोला शहरातील जय भवानी चौक येथे सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभा संपल्यानंतर वरील ठिकाणी अचानक तपासणी करण्यात आली. सदर अचानक तपासणीमुळे सांगोला शहरासह तालुक्यात सोमवार दि.१ डिसेंबर रोजी दिवसभर सोशल मीडियावर चांगलीच चर्चा रंगली होती.

# २६४ नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी आज मतदान

### न्यायालयीन स्थगितीमुळे २४ नगरपरिषद व १५४ सदस्यासाठी २० डिसेंबरला निवडणुका

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ डिसेंबर-**

राज्यातील २६४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मंगळवारी (दि.२) मतदान होत आहे. त्यासाठी संपूर्ण मतदान यंत्रणा सज्ज झाली आहे. एकूण १२ हजार ३१६ मतदान केंद्रांसाठी ६२ हजार १०८ निवडणूक अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. मतदान केंद्रांवर पुरेशा बंदोबस्त तैनात केला आहे.

दरम्यान, न्यायालयाच्या स्थगितीमुळे ऐनवेळी रद्द करण्यात आलेल्या २४ अध्यक्षपदांच्या आणि विविध ठिकाणच्या १५४ सदस्यपदाच्या जागांसाठी २० डिसेंबरला मतदान होणार आहे. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या २६४ अध्यक्षपदांच्या आणि ६ हजार ४२ सदस्यपदांच्या जागांसाठी उद्या मतदान होईल. संपूर्ण निवडणूक प्रकियेसाठी पुरेशा मतदान



यंत्रांची (EVM) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात एकूण १७ हजार ३६७ कंट्रोल युनिट; तर ३४ हजार ७३४ बॅलेट युनिटचा समावेश आहे. अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली मतदान पथके मतदान केंद्रावर सुरळित पोहचली आहेत. उद्या सकाळी ७.३० वाजता मतदानास सुरुवात होईल. सांयकाळी ५.३० पर्यंत मतदानाची वेळ असेल.

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या (एकूण २८८) सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. आता निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील असलेल्या प्रकरणांचा निर्णय २३ नोव्हेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर आल्याने २४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदाच्या आणि सदस्यपदांच्या निवडणुकांसाठी उद्या मतदान होणार नाही.

तेथे सुधारित कार्यक्रमानुसार २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे आता उर्वरित २६४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी उद्या मतदान होईल. त्यातील ७६ नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील न्यायालयीन प्रकरणांमुळे बाधित १५४ जागांसाठीदेखील मतदान होणार नाही. तिथेही सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार संबंधित बाधित जागांसाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होईल.

# राज्यभर गाजलेली अनगर नगराध्यक्षपदाची निवडणूक स्थगित

### जिल्हाधिकारी आशिर्वाद : सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार होणार पुढील कार्यवाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून अनगर नगरपंचायत अध्यक्षपदाची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे. आता सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार पुढील कार्यवाही होणार आहे. याबाबत जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आदेश जारी केले आहेत.

अनगरसह जिल्ह्यातील ६ नगरपालिकेतील ६ प्रभाग आणि २ नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे. आता या निवडीला स्थगिती देण्यात आली असून, सुधारित कार्यक्रमानुसार येथे पुढील कार्यवाही होणार आहे. दरम्यान, अनगरच्या बिनविरोध निवडणुकीची औपचारीक घोषणा पुढे ढकलली असून, स्थगितीचा



बिनविरोध झालेल्यांवर कसलाही परिणाम होणार नाही. जिल्ह्यातील अनगर नगरपंचायत निवडणूक बिनविरोध झाल्याने राज्यभरात या निवडणुकीची चर्चा रंगली होती. तर, येथील माजी आमदार राजन पाटील यांचे सुपुत्र बाळराजे पाटील यांनी विजयी जल्लोष करताना थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव घेऊन चॅलेंज केले. त्यामुळे, येथील निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागले होते. त्यातच, भाजप उमेदवार प्राजक्ता पाटील यांच्याविरोधात निवडणूक लढवलेल्या उज्ज्वला थिटे यांचा अर्ज बाद झाल्यानंतर त्यांनी न्यायालयात धाव घेतली. मात्र, जिल्हा न्यायालयानेही त्यांचा अर्ज फेटाळल्याने ही जागा बिनविरोध झाली आहे. त्यातच, आता सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी अनगर नगरपंचायतीची निवडणूक स्थगित केल्याने येथे फेरनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होणार आहे. मात्र, ह्या स्थगितीचा भाजप नेते राजन पाटलांना आणि बिनविरोध निवड झालेल्या कुठलाही धक्का बसणार नाही. कारण, केवळ येथील बिनविरोध निवडणुकीची औपचारीक घोषणा पुढे ढकलण्यात आल्याची माहिती आहे.

**राजन पाटील यांना धक्का नाही**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार उज्ज्वला थिटे यांचा उमेदवारी अर्ज बाद करण्यात आला आहे. सोलापूर सत्र न्यायालयानेही त्यांचा अर्ज फेटाळला आहे. त्यामुळे, पुढील निवडणूक प्रक्रियेत त्यांना अर्ज दाखल करता येणार नाही, ज्या उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले आहेत, अथवा ज्यांचे अर्ज बाद झाले आहेत, त्यांनीही सुधारित निवडणुकीत अर्ज दाखल करता येणार नाहीत. त्यामुळे, येथील बिनविरोध निवडणुकीची औपचारीक घोषणाच केवळ पुढे ढकलल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. त्यामुळे, राजन पाटील किंवा अनगर नगरपंचायतीमधील नगराध्यक्ष व १८ सदस्यांना धक्का म्हणता येणार नाही.

# संसदेला अहंकाराचा आखाडा बनू देऊ नका : पंतप्रधान मोदी

### विरोधकांनी कामकाजात अडथळे आणू नये




**◆ नवी दिल्ली, १ डिसेंबर**

संसदेला निवडणुकीतील जयपराजयामुळे येणाऱ्या निराशेचा तसेच अहंकाराचा आखाडा बनू देऊ नका, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केले.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून प्रारंभ झाला, अधिवेशनासाठी संसदभवन परिसरात आगमन झाल्यावर पत्रकारांशी बोलतांना मोदी म्हणाले की, विरोधकांनी जनतेच्या आकांक्षा तसेच लोकशाहीच्या मर्यादा लक्षात घेऊन अधिवेशनाच्या कामकाजात सहभागी झाले पाहिजे.



आपल्या व्यक्तिगत अजेंड्यासाठी सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणला जाऊ नये, नवीन सदस्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळाली पाहिजे, सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणून या सदस्यांना मिळणाऱ्या संधीपासून वंचित केले जाऊ नये.

नवीन सदस्यांना वेगवेगळ्या मुद्द्यावर अभिव्यक्त होण्याची संधी मिळाली पाहिजे, आपली निराशा तसेच निवडणुकीतील पराभवामुळे नवीन सदस्य बळीचा बकरा होणार नाही, याची काळजी सगळ्यांनी घेतली पाहिजे, असे आवाहन करत मोदी म्हणाले की, या अधिवेशनामुळे संसद आणि संसदसदस्य देशासाठी काय करत आहे, काय करणार आहे, याची माहिती देशाला होणार आहे. त्यामुळे विरोधकांनीही आपली जबाबदारी पार पाडत मजबूत मुद्दे उचललेले पाहिजे, लोकशाही मजबूत करण्यात आपले योगदान दिले पाहिजे. मात्र आज दुर्देवाने काही राजकीय पक्ष निवडणुकीतील पराभवामुळे आलेल्या निराशेतून बाहेर यायलाच तयार नाही. त्यांच्या विधानावरुन तरी तसेच जाणवत आहे.

पराजयामुळे निराश होत संसदेला आखडा बनू देऊ नये, तसेच विजयाच्या अहंकारात डुबत आपल्या जबाबदारीचा विसर पडू देऊ नये, याकडे लक्ष वेधत मोदी म्हणाले की, देशाच्या हितासाठी सगळ्यांनी एकत्र येत काम केले पाहिजे.

सभागृहात गोंधळ झाल्यामुळे नवीन सदस्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळत नाही, त्यामुळे नव्या सदस्यांना संधी मिळाली पाहिजे. *(तभा वृत्तसेवा)*

> जुन्यांचा अनुभव आणि नवीन पिढीचा जोश यांचा फायदा देशाला मिळाला पाहिजे. नारेबाजी करायला संपूर्ण देश पडला आहे, तेथे नारेबाजी करा, सभागृहात नारेबाजी नाही तर नीतीवर चर्चा झाली पाहिजे, सभागृहात ड्रामा नाही तर डिलिव्हरी झाली पाहिजे, असे मोदी म्हणाले. नकारात्मकेतचा फायदा कधी कोणाला मिळत असला तरी देशासाठी सकारात्मक विचार केला पाहिजे, सभागृहाच्या मर्यादेत राहून काम केले पाहिजे, असे मोदी म्हणाले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे...



### कृपासिंधू सोशल फाउंडेशनकडून विद्यार्थ्यांना उबदार शालींचे वाटप

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती संचलित अस्थिव्यंग व मतिमंद विद्यार्थ्यांच्या अक्कलकोट येथील निवासी शाळेतील ३० विद्यार्थ्यांना शहरात नव्याने स्थापन झालेल्या कृपासिंधू सोशल फाउंडेशनच्या वतीने उबदार शालींचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी कोंडीबा इंगळे प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत इंगळे, उद्योगपती ओंकार कोरे यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला. याप्रसंगी फाउंडेशनचे सचिव रवीकिरण पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकामधून कृपासिंधू सोशल फाउंडेशन स्थापन करण्याचे उद्दिष्ट विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार अरविंद पाटील यांनी केले. याप्रसंगी युवा उद्योजक ओंकार कोरे, व्यापारी संघटनेचे उपाध्यक्ष प्रसन्न हत्ते, संतोष नरुणे, ओम हत्ते, निवासी शाळेतील शिरीष बन्ने, विठ्ठल मदरी, इराया स्वामी, शीला पवार आदी उपस्थित होते.



### राष्ट्रीय कराटे स्पर्धेत चैतन्य स्कूलच्या संबोधी गायकवाडला कांस्य


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

विशाखापट्टणम येथे झालेल्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत कै. सुरेश सखाराम सुरवसे चारिटेबल ट्रस्ट संचलित श्री चैतन्य प्रशालेतील संबोधी गायकवाड कांस्यपदक तर कराटे प्रशिक्षिका साक्षी तोरंगी हिनेही रौप्यपदक पटकाविले. प्रशिक्षिका म्हणाल्या, नियमित प्रशिक्षण, प्रोत्साहन, तसेच तांत्रिक मार्गदर्शनामुळेच राष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी मिळाली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांची क्षमता ओळखून त्यांना योग्य मार्गदर्शन दिले, तसेच स्पर्धेपूर्वी त्यांची शारीरिक आणि मानसिक तयारी करण्यावर विशेष भर दिला. मुख्याध्यापिका डॉ.पी. सौजन्या यांनी त्यांचे अभिनंदन केले.

**राष्ट्रीय कराटे स्पर्धा : प्रशिक्षिका साक्षी तोरंगीस रौप्य**

### पालिका क्र.१ कॅम्प शाळेत संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**




महानगरपालिका सोलापूर संचलित प्रशाला क्र. १ कॅम्प शाळेत संविधान दिन २० ते २६ नोव्हेंबर या कालावधीत येथे संविधान महोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांना रांगोळी, चित्रकला, प्रश्नमंजुषा, पोस्टर स्पर्धा तसेच तज्ञाचे संविधान दिनाचे महत्त्व या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. दि. २६ नोव्हेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजन मुख्याध्यापक जे. आर. सज्जन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रशालेतील विद्यार्थ्यांची प्रशालेच्या परिसरात संविधान रॅली काढण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षकांच्या हस्ते मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक कांबळे, हंचाटे, खरबस, रंडाळे, खांडेकर, शेळके, अझहर पठाण, बनसोडे व भंडारे यांचे सहकार्य लाभले.

# १८० दिवसांच्या आत पदवी प्रमाणपत्र देणे बंधनकारक

## विद्यापीठ अनुदान आयोगाचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

अभ्यासक्रम पूर्ण करून पदवीसाठी पात्र ठरल्याच्या दिवसापासून १८० दिवसांच्या आत विद्यार्थ्यांना विद्यापीठाने पदवी प्रमाणपत्र देणे यूजीसीने बंधनकारक केले आहे. उच्च शिक्षण संस्थांकडून परीक्षा आणि पदवी प्रमाणपत्राच्या वितरणात होत असलेल्या मोठ्या विलंबावर विद्यापीठ अनुदान आयोगाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

काही विद्यापीठे वेळेवर परीक्षा घेत नसल्याचे आणि विद्यार्थ्यांना त्यांची पदवी व अंतिम प्रमाणपत्रे देण्यास विलंब करत असल्याचे यूजीसीच्या निदर्शनास आले आहे. या गंभीर समस्येमुळे विद्यार्थ्यांच्या करिअरवर नकारात्मक परिणाम होत आहे. वेळेवर कागदपत्रे न मिळाल्याने त्यांना योग्य नोकरीच्या संधी आणि पुढील उच्च शिक्षणाचे प्रवेश गमावावे लागत आहेत यूजीसीने सर्व विद्यापीठांना या नियमांचे आणि शैक्षणिक मार्गदर्शक तत्त्वांचे त्वरित पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

**पालन न झाल्यास कठोर कारवाई**

यूजीसीने सर्व उच्च शिक्षण विद्यापीठांना या नियमांचे आणि शैक्षणिक मार्गदर्शक तत्त्वांचे त्वरित पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. यापुढे, जी विद्यापीठे यूजीसीच्या नियमांचे उल्लंघन करतील आणि वेळेवर परीक्षा घेऊन प्रमाणपत्रे देणार नाहीत, त्यांच्यावर कठोर दंडात्मक कारवाई करण्याचा स्पष्ट इशारा आयोगाने दिला आहे.

**विद्यार्थ्यांना रोजगार मिळवण्याच्या मार्गात अडथळे**

या विलंबाबद्दल यूजीसीने स्पष्ट केले आहे की, वेळेवर प्रमाणपत्रे न मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या नोकरीच्या आणि पुढील शैक्षणिक संधी गमावल्या जातात. यामुळे विद्यार्थ्यांच्या योग्य आणि दर्जेदार रोजगार मिळवण्याच्या मार्गात अडथळे निर्माण होतात.

# सोलापूर विद्यापीठाची 'पेट १०'ची प्रवेश प्रक्रिया फेब्रुवारीमध्ये

## प्र. कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांची माहिती

**विद्यापीठाच्या स्थापनेपासून ते आजतागायत विद्यार्थ्यांचे संशोधन वेबसाईटवर**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची 'पेट९'ची ऑनलाईन परीक्षा यशस्वी झाल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमास अधिन राहून 'पेट १०'च्या (पीएच.डी. प्रवेश परीक्षा) प्रवेश प्रक्रियेस फेब्रुवारी २०२६ मध्ये सुरू होणार असल्याची माहिती विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा.लक्ष्मीकांत दामा यांनी दिली.

प्रा. दामा म्हणाले, गुणवत्ता वाढीसाठी विद्यापीठ नवनवीन उपक्रम राबवित आहे. त्यात २००४ पासून ते आतापर्यंतेच विद्यार्थ्यांनी संशोधन केलेले शोध निबंध हे विद्यापीठाच्या बेवसाईटवार ऑनलाईन स्वरुपात विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया पूर्णत्वास येत आहे. पेट१०च्या परीक्षेस बसणाऱ्या या विद्यार्थ्यांना हे उपयोगी पडणार आहे. देशहित साधून सर्वांना उपयुक्त असे संशोधनाचे विषय निवडीसाठी विद्यापीठ प्राधान्य देत आहे. पीएच.डीच्या अंतिम मौखिक परीक्षेअगोदर पूर्व मौखिक परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांच्या त्या प्रबंधामध्ये असलेल्या उणिवा व त्रुटी दूर करण्यासाठी विद्यापीठातील तसेच राज्यातील व राज्याबाहेरील तज्ञ व्यक्तीकडून पूर्व मौखिक परीक्षा विद्यापीठाकडून घेतली जाते. त्यांच्या सूचनाचा त्या प्रबधात समाविष्ठ करण्यात येतो. त्यामुळे संबंधित पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांचा शोध निंबध निर्दोष होण्यासाठी उपयोग होणार आहे.

# काळे व वाघमोडे तायक्वोंदो स्पर्धेत अजिंक्य

## दोघींची विद्यापीठ संघात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १ डिसेंबर-**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या पंढरपूर येथे झालेल्या महाविद्यालयीन तायक्वोंदो स्पर्धेत येथील समीर गांधी कला महाविद्यालयातील तनिष्का काळे ४९ किलो वजन गटात व तेजस्विनी वाघमोडे हिने ६७ किलो वजन गट अजिंक्यपद पटकाविले. त्यांना क्रीडा मार्गदर्शक प्रा.संजय सपताळे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांची फकीर मोहन युनिव्हर्सिटी उडीसा येथे होणाऱ्या ऑल इंडिया विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. दोघींचे श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष ॲड. माधव मिराजदार, कार्याध्यक्ष ॲड. मिलिंद दादा कुलकर्णी, कार्यवाह रामभाऊ दोशी, सहकार्यवाहक ढाले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास गेजगे व विष्णुपंत कुलकर्णी, इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका अपर्णा इनामदार आदींनी अभिनंदन केले.



# तायक्वांदो स्पर्धेत मंद्रुपच्या चौघांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांनी आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन तायक्वान्दो स्पर्धेत दक्षिण सोलापूर तायक्वांदो अकॅडमीच्या चौघांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

पंढरपूर येथील उमा महाविद्यालयात झालेल्या या स्पर्धेत तनुजा पवारने ५८ ते ६२ किलो वजनी गटात सुवर्ण पटकाविले. तिची सोलापूर विद्यापीठ संघात निवड झाली आहे. शिवराज मुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रवीण जोडमोटे, रेश्मा राठोड, दीपक धूळखेडे, सचिन कुंभार, सिध्दाराम विजापुरे यांनी अभिनंदन केले.

प्रणाली व्हनमाने (४६ ते ४९ किलो, कांस्य), यश खंदारे ( ५४ किलो, कांस्य), शिवराज बोळकवठे (५८ ते ६३ किलो, रौप्य),




# ए. जी. पाटील अभियांत्रिकीमध्ये विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

स्वरक्षणाचे हे फक्त शारीरिक नसून ते विविध पाच स्तरावर करावयाचे असते. प्राप्त परिस्थितीत मनोबल खचू न देणे, प्रसंगावधान आदी गोष्टी ही स्वरक्षणाचाच भाग आहे, अशी माहिती कराटे प्रशिक्षिका संगीता जाधव यांनी विद्यार्थ्यांना दिली.

ए.जी.पाटील अभियांत्रिकीच्या संगिनी वुमन्स फोरम तर्फे विद्यार्थ्यांसाठी स्वरक्षणाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती या कार्यशाळेत त्या बोलत होत्या. सुरुवातीस जाधव यांनी स्व आणि संरक्षण यांचा अर्थ विषद केला. संरक्षण हे फक्त शरीराचे नसून मन, बुद्धी, भावना यांचेही असते असे विविध उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. त्यांच्यासोबत त्यांचे सहाय्यक मिहीर जाधव व शिष्य हे उपस्थित होते. मिहीर यांनी प्रात्यक्षिकांद्वारे हाताची पकड सोडविणे, आक्रमणापासून बचावात्मक हालचाली, शारीरिक संतुलन राखणे तसेच धोका ओळखण्यासाठी आवश्यक परिस्थिती ज्यांनी जागरूकता इत्यादी सराव करून घेतला. तसेच संभाव्य संकट परिस्थितीत शांत मनाने आणि योग्य निर्णय क्षमता वापरत स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत ही मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत २०० पुरुष व महिलांनी सहभाग नोंदविला.

संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील व संस्था सचिव शिवानंद पाटील हे नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आग्रही असतात त्यामुळे अशा कार्यशाळा वारंवार आयोजित केल्या जातात अशी माहिती कॅम्पस डायरेक्टर एम.ए.चौगुले यांनी दिली प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा.डी.ए.जव्हेरी, प्रा. एस.एन. कांबळे प्रा.आर.एस. कटनळळी, प्रा.ए.जी. घाळीमठ यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन आभार प्रदर्शन प्रा. एस. के. कोनापूरे यांनी केले.

# बाळे ते जुळे सोलापूरपर्यंत राष्ट्रवादीचे नगरसेवक महापालिकेत जाणार : बनसोडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**



विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केवळ जुळे सोलापूर नव्हे तर 'बाळे ते जुळे' इथपर्यंत अजित पवार राष्ट्रवादीचे नगरसेवक महानगरपालिकेत गेले पाहिजेत, असा विश्वास अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केला. ते जुळे सोलापूर भागातील प्रभाग २४ आणि २६ मधील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन गोविंदश्री मंगल कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीत महानगरपालिका जिंकण्याचा निर्धार राष्ट्रवादीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांच्या साक्षीने पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी केला. सोलापूर शहरात गेल्या अनेक वर्षापासून राष्ट्रवादी पक्षाचे काम मोठ्या जोमाने सुरू आहे सातत्याने अजित पवार यांच्या पक्षाकडे येण्याचा ओढा अनेकांचा वाढला आहे.जुळे सोलापूर भागामध्ये यंदा कोणत्याही परिस्थितीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे जास्तीत जास्त नगरसेवक सोलापूर महानगरपालिकेत जातील, असा विश्वास प्रमोद भोसले यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

याप्रसंगी राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान, महिला आघाडी अध्यक्ष संगीता जोगधनकर, महिला आघाडी कार्याध्यक्ष चित्रा कदम,जेष्ठ नेते हेमंत चौधरी, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, विद्यार्थी अध्यक्ष अनिकेत व्हसुरे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले माजी नगरसेविका नूतन गायकवाड,प्रदेश सचिव विशाल बंगाळे उपस्थित होते.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'मरे'च्या १५ अनारक्षित विशेष सेवा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ डिसेंबर-**

मध्य रेल्वेच्यावतीने येत्या ४ ते८ डिसेंबर या कालावधीत १५ अनारक्षित विशेष सेवा नागपूर ते मुंबई या मार्गांवर चालवणार आहे.प्रवाशांच्या सुविधेसाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनासाठी प्रवास करणाऱ्या भाविकांच्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे महानिर्वाणदिनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी होत असते. त्यासाठी राज्यभरातून भीम अनुयायी शिवाजी पार्कवर जमत असतात. त्यांच्या सोयीसाठी यंदाही विशेष गाड्या सोडण्यात येत आहेत. **त्याचा तपशील असा:**

**(अ) नागपूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस : ४ सेवा : ४ डिसेंबरला सुटणाऱ्या विशेष गाड्या-**

**गाडी क्रमांक ०१२६० नागपूर** - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष गाडी नागपूर येथून १८.१५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १०.५५ वाजता पोहोचेल.



**गाडी क्रमांक ०१२६२ नागपूर** - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष गाडी नागपूर येथून २३.५५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १५.३० वाजता पोहोचेल.

**५ डिसेंबरला सुटणाऱ्या विशेष गाड्या:**

**गाडी क्रमांक ०१२६४ नागपूर** - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष गाडी नागपूर येथून ०८.०० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे त्याच दिवशी २३.४५ वाजता पोहोचेल.

**गाडी क्रमांक ०१२६६ नागपूर** - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष गाडी नागपूर येथून १८.१५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १०.५५ वाजता पोहोचेल.

**थांबे** : अजनी, सेवाग्राम, वर्धा, पुलगांव, धामणगांव, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, जालंब, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कसारा, कल्याण आणि दादर.

**(ब) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर** : ४ सेवा

**६ डिसेंबर:** गाडी क्रमांक ०१२४९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून २०.५० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ११.२० वाजता पोहोचेल.

**७ डिसेंबर:**

**गाडी क्रमांक ०१२५१**

**छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस** - नागपूर विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १०.३० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ००.५५ वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०१२५५ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १२.३५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ०३.०० वाजता पोहोचेल.

**८ डिसेंबर:** गाडी क्रमांक ०१२५७ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल.

**दादर - नागपूर : १ सेवा**

**७ डिसेंबर:** गाडी क्रमांक ०१२५३ दादर - नागपूर विशेष गाडी दादर येथून ००.४० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल.

**थांबे:** दादर, कल्याण, कसारा, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, चाळीसगाव, जळगाव, भुसावळ, मलकापूर, जालंब, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव, पुलगाव, वर्धा, सेवाग्राम आणि अजनी.

**(क) कलबुर्गी** - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - कलबुर्गी : २ सेवा

**गाडी क्रमांक ०१२४५ विशेष**

ही गाडी कलबुर्गी येथून ५ डिसेंबर १८.३० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ८.२० वाजता पोहोचेल.

**गाडी क्रमांक ०१२४६ विशेष**

ही गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ७. डिसेंबरला ००.२५ वाजता सुटेल आणि कलबुरगि येथे त्याच दिवशी ११.३० वाजता पोहोचेल.




# चंडक प्रशालेच्या शिबिरात ३८४ रक्तदात्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

महेश इंग्लिश स्कूल, संतोकीराम रामसुख चंडक इंग्लिश हायस्कूल व दमाणी विद्या मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले होते . या रक्तदान शिबिरा मध्ये ३८४ पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोदविला.

या शिबिराचे उदघाटन डॉ. योगेश बंग यांच्या हस्ते झाले. रक्तदान जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पथनाट्य , कलाकृती व चित्रकलेचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यासाठी कला शिक्षक अरविंद गोटीमुकुल, शशिकांत कनकी व स्वाती साठे यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी संस्थेचे चेअरमन चेअरमन योगेश बियाणी, सचिव डॉ. अर्चना दरक, सहसचिव स्वप्निल मर्दा, गिरीधारी भुतडा, ओमप्रकाश सोमाणी, सी.ए. जोत्स्ना भट्टड, विष्णुक मानधनिया, संजय करवा, राहुल चंडक, जितेंद्र राठी, शैलेश चंडक, प्रमोद भुतड , सपना राठी, डॉ. सारिका झंवर, नयना राठी, पूजा सोमाणी, डॉ. नूतन झंवर, डॉ. प्रतिभा बलदवा व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अंजली चव्हाण, पर्यवेक्षिका मनाली संगवे उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# स्थानिकच्या निवडणुकीत ढवळले जिल्ह्याचे राजकारण

## ● आजी-माजी पालकमंत्र्यांची जुंपली; यंदाच्या निवडणुकीत पालकमंत्री गोरेंचा मोठा प्रभाव; विरोधकांसह मित्रपक्षही घेतले अंगावर

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

**तब्बल तीन वर्षांच्या गॅपनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असल्याने जुन्यांसह नव्यांमध्ये देखील मोठा उत्साह आहे. तर राजकीय पक्षांनी देखील युती-आघाड्या धाब्यावर बसवून सत्तेसाठी काय पण म्हणत भेळ-मिसळीचे कारस्थान केल्याने सोलापूर जिल्ह्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. आजपर्यंतचा इतिहास पाहता यंदा पहिल्यांदाच जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी स्थानिकच्या राजकारणात ग्राऊंडवर लक्ष घातल्याने या निवडणुकीवर त्यांचा मोठा प्रभाव दिसत आहे. कुरघोड्यांचे राजकारण करत भाजपाचे सर्वाधिक नगराध्यक्ष विजयी करण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विरोधकांसह मित्रपक्षांनाही अंगावर घेतल्याने राजकारण रंगले आहे. बार्शी तालुक्यात तर पालकमंत्री गोरे आणि माजी पालकमंत्री दिलीप सोपल यांच्यातच जुंपल्याचे चित्र आहे. माळशिरस, करमाळा, अक्कलकोट, पंढरपूर, मंगळवेढा, मोहोळ, बार्शी, कुर्डुवाडी, सांगोला तालुक्यात यंदा राजकारण रंगले असून आज मंगळवारी मतदान तर बुधवारच्या मतमोजणीनंतर कोण, किती पाण्यात हे कळणार आहे.**




स्थानिकच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असतात अशी या निवडणुकांची ओळख असल्याने आस लावून बसलेल्यांनी निवडणुकीच्या रिंगणात ताकद लावली आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत युती-आघाड्या करुन निवडणूक लढणारे राजकीय पक्ष स्थानिकच्या निवडणुकीत मात्र एकमेकांच्या बोकांडी बसून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडत असल्याने लोकांचा राजकारणाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत असल्याचे जाणवत आहे. कारण लोकसभा, विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाची तत्वे, नितिमत्ता सांगणारे पक्ष स्थानिकच्या निवडणुकीत मात्र सर्वकाही धाब्यावर बसवत असल्याचे दिसून येते.

पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्राचे राजकारण तर गेल्या काही वर्षात वेगळ्याच वळणावर गेले आहे. घराणेशाहीच्या सत्ताकारणामुळे राजकीय नेत्यांनी उभारलेले डोळे दिपवणारे एम्पायर टिकवून ठेवण्यासाठी राजकीय घराण्यांनी नवा राजकीय फंडा सुरु केला आहे. कुटुंबातील सदस्यांची विभागणी करत काहीजण सत्ताधारी तर काहीजण विरोधी पक्षात जोमाने राजकारण करत आहे. जेणेकरून देश-राज्यात अथवा स्थानिक पातळीवर कोणत्याही पक्षाची सत्ता असो, आपल्या कुटुंबातील एक तरी सदस्य सत्तेत असतोच. त्यामुळे कोणत्याही कारवाईची भीतीच त्या राजकीय घराण्याला असत नाही. मोठ-मोठ्या राजकीय घराण्यांनी हा राजकीय फंडा अवलंबल्याचे दिसून येते. त्यामुळे सर्वच पक्षात स्वार्थाचे आणि घराणेशाहीचे राजकारण सुरु असल्याचा प्रकार आता लोकांच्या लक्षात येवू लागला आहे.



मोहोळ, बार्शी, पंढरपूर, माळशिरस, सांगोला नगरपालिकांच्या निवडणुकीत तर यंदा मोठी राजकीय खलबते झाली. एकेकाळी राष्ट्रवादी आणि काँग्रेसचे बालेकिल्ले असलेल्या जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये या पक्षांची वाताहत होत आहे. विशेष म्हणजे, पक्षांतर्गत वादाच्या राजकारणानेच राष्ट्रवादीची अवस्था बिकट झाली आहे. मोहोळमधील राष्ट्रवादीमध्ये मोठा वाद उफाळला. या वादाचे रुपांतर पक्षाला रामराम ठोकण्यापर्यंत गेले. तरी देखील पक्षातंर्गत वाद पक्षाच्या मुख्य नेत्यांनी थांबवले नसल्याचे दिसून आले. याचाच अर्थ आपल्याच पक्षातील नेते आपसात शिवराळ भाषेत आरोप-प्रत्यारोप करत असताना पक्षप्रमुखांची याला मूकसंमती तर नव्हती ना, अशी चर्चा लोक करीत आहेत. एकत्र असतानाही राष्ट्रवादीमध्ये एकमेकांची जिरवण्याचेच राजकारण सुरु होते आणि त्याला राष्ट्रवादीच्या सर्वेसर्वा नेत्यांनी मौन धरुन खतपाणी घातल्यानेच या पक्षाची वाताहात झाल्याचे दिसून आले. याचाच परिपाक म्हणून अनगरच्या बाळराजेंनी थेट राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवारांनाच आव्हान दिल्याचे दिसले.

बार्शी नगरपालिकेच्या निवडणुकीत तेथील पारंपारिक राजकीय विरोधक सोपल-राऊत यांच्यातच पहिल्या दिवसापासून चुरस दिसून आली. पालकमंत्री जयकुमार गोरेंच्या बार्शीतील सभेनंतर राजकारण ढवळले आणि बार्शीचे आमदार तथा जिल्ह्याचे माजी पालकमंत्री दिलीप सोपल यांनीही गोरेंवर टीकास्त्र सोडले. बार्शीचे चाणाक्ष मतदार कोणाच्या पारड्यात आपल्या मताचे दान टाकतात, हे मतमोजणीनंतर स्पष्ट होणार आहे.

अक्कलकोट तालुक्यात अक्कलकोट, मैंदर्गी आणि दुधनी अशा तीन नगरपरिषदा आहेत. येथेही पारंपारिक राजकीय विरोधक असलेले आ.सचिन कल्याणशेट्टी आणि माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे यांच्यातच प्रमुख लढत दिसते आहे. येथील नेत्यांनी कार्यकर्त्यांसह घरातील लोकांनाही निवडणुकीत उतरवल्याने मोठी चुरस दिसून येत आहे. मुख्यमंत्र्यांना देखील येथे प्रचाराच्या मैदानात उतरावे लागले. त्यामुळे अक्कलकोटच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

पंढरपूर तालुक्याचे राजकारणच इरसाल असल्याची चर्चा नेहमीच होते. पंढरपूरचे आमदार स्थानिक मंगळवेढ्याचे आहेत तर पंढरपूरचे स्थानिक माढ्याचे आमदार आहेत. माजी आमदारांनी नगरपरिषदेवर सत्ता राखण्याचा चंग बांधला आहे. पंढरीच्या राजकारणात देखील घराणेशाहीचे चित्र आहे. मंगळवेढा नगराध्यक्ष पदाची निवडणूक पुढे ढकलली असल्याने येथील चुरस थोडी थंडावल्याचे चित्र आहे.

सांगोल्यात मात्र यंदाच्या निवडणुकीत मोठा ट्विस्ट असून शिवसेनेचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या विरोधात सर्वच विरोधक एकवटले असून याची धुरा पालकमंत्री गोरेंच्या हाती आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्याच्या सत्तेत महायुतीत असलेल्या भाजपा-शिवसेनेत येथे आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. पालकमंत्री गोरे, आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, माजी आमदार दिपकआबा साळुंखे यांच्या युतीच्या उमेदवारांना वेगवेगळी चिन्हे मिळाली तर शहाजीबापूंचे उमेदवार मात्र चिन्हावर निवडणुकीच्या रिंगणात आहेत. रात्रीत अचानक राजकीय पक्षांची कार्यालये तपासण्यात आल्याने येथील राजकारणाला काहीसे वेगळे वळण लागले आहे. या निवडणुकीत सांगोल्यात पालकमंत्र्यांसह विद्यमान आणि माजी आमदारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

माळशिरस येथेही चुरशीची निवडणूक सुरु असून मोहिते-पाटील कुटुंबातही आमना-सामना होत आहे. याठिकाणी भाजपाचे माजी आमदार राम सातपुते आणि शरद पवार राष्ट्रवादीचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यातच प्रमुख लढत जाणवते आहे. पालकमंत्री गोरेंनी देखील याठिकाणी प्रतिष्ठा पणाला लावली आहे. पण माळशिरस-अकलूजचा राजकीय इतिहास पाहता येथील मतदार चाणाक्ष असून निकाल बुधवारी मतमोजणीनंतरच कळणार आहे. करमाळा नगरपालिकेच्या निवडणुकीत स्थानिक आमदार अलिप्त दिसून येत आहेत. येथील निवडणुकीत माजी आमदार आणि नेत्यांमध्ये तसेच सावंत परिवारांमध्ये प्रमुख राजकीय लढत रंगल्याचे चित्र आहे. करमाळ्यात देखील राजकीय प्रमुख पक्षांमध्ये राजकीय भेळ-मिसळ दिसून येत आहे. करमाळ्यात सावंत गट सध्या प्रमुख दावेदार असल्याची चर्चा मतदारांमध्ये रंगली आहे.

### निधी कोणाला मागणार : पालकमंत्री गोरे; शासनाचा निधी वडिलोपार्जित प्रॉपर्टी नाही : आ. सोपल

बार्शी नगरपालिकेच्या निवडणुकीत आजी-माजी पालकमंत्री भिडल्याचे चित्र आहे. पालकमंत्री जयकुमार गोरेंनी प्रचार सभेत आ. दिलीप सोपल यांना आव्हान देताना वक्तव्य केले की, एक तरी विकासकाम दाखवा, तूम्ही विकासकामासाठी निधी कोणाकडे मागणार. याला प्रत्युत्तर देताना आ.दिलीप सोपल प्रचार सभेत म्हणाले की, अहो पालकमंत्री गोरे मी १९८५ ला पहिल्यांदा आमदार झालो तेंव्हा तुम्ही कुठे तरी कॉलेजात शिकायला असाल. सोलापूरचे पालकमंत्री शरद पवारांसह अनेक दिग्गजांनी भूषविलेले आहे. पालकमंत्री पदाची प्रतिष्ठा जपली पाहिजे. विकासकामांसाठी आम्ही निधी कोणाकडे मागणार म्हणजे आम्ही मुख्यमंत्र्यांकडे निधी मागणार. कारण मुख्यमंत्री हे कोणत्या पक्षाचे नसतात तर ते महाराष्ट्राचे असतात. शासनाचा निधी म्हणजे कोणीही वडिलोपार्जित प्रॉपर्टी समजू नये. आजी-माजी पालकमंत्र्यांच्या टोलेबाजीने बार्शीचे राजकारण ढवळून निघाल्याचे चित्र आहे.

# २ लाखांवर खाजगी कंपन्या पाच वर्षांत बंद

**◆ नवी दिल्ली, १ डिसेंबर**

गेल्या पाच वर्षांमध्ये देशात २ लाख ४ हजार,२६८ हजार खाजगी कंपन्या बंद पडल्या आहेत, अशी माहिती सरकारने दिली आहे. २०१३ च्या कंपनी कायद्यांतर्गत ह्या कंपन्या बंद पडल्या आहेत.

कार्पोरेट राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांनी दिलेल्या लेखी उत्तरात ही माहिती देण्यात आली आहे. बंद पडलेल्या कंपन्यांमधील कामगारांचे पुनर्वसन करणार का? अशी माहिती विचारली असता यासंदर्भात सरकारपुढे असा कोणताही प्रस्ताव नसल्याचे मल्होत्रा यांनी सांगितले.

गेल्या पाच वर्षांमध्ये १ लाख, ८५ हजार, ३५० कंपन्यांची नोंदणी हटविण्यात आली आहे. या आर्थिक वर्षात १६ जुलैपर्यंत साडेआठ हजार कंपन्या बंद पडल्या आहेत. बंद झालेल्या कंपन्या शेल कंपन्या होत्या का, असे विचारले असता कंपनी कायद्यात अशा कंपनीची नोंद होत नसल्याचे उत्तर सरकारच्या वतीने देण्यात आले आहे.

अनेक कंपन्या वित्तीय घाट्यामुळे बंद पडल्या आहेत. कंपन्या सुरू राहाव्यात यासाठी सरकारच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत. ◀(वृत्तसंस्था)



संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत करताना संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, जितेंद्रसिंह व अन्य. कामकाजाला उपस्थित राहण्यासाठी येत असताना मंत्री चिराग पासवान, भाजपा खासदार कंगना राणावत, काँग्रेस खासदार प्रियांका वढेरा आणि अपक्ष खासदार पप्पू यादव यांच्या टिपलेल्या भावमुद्रा

# काश्मीर-उत्तरप्रदेशात एनआयएची छापेमारी

## ● तपासाची व्याप्ती वाढविली ● डॉ. आदिल, मौलवीच्या घराची झडती




**◆ नवी दिल्ली, १ डिसेंबर**

दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने सोमवारी जम्मू-काश्मीर आणि उत्तरप्रदेशातील काही ठिकाणांवर छापेमारी केली. व्हाईट कॉलर्ड मॉड्युलशी संबंधित ही छापेमारी असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

दिल्लीतील बॉम्बस्फोट प्रकरणाच्या तपासाची व्याप्ती वाढवत एनआयएने जम्मू-काश्मिरातील पुलवामा, शोपियाँ आणि कुलगाम जिल्ह्यातील आठ ठिकाणांवर छापेमारी केली. उत्तरप्रदेशातील विविध जिल्हे आणि लखनौमध्येही छापेमारी करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

शोपियाँतील मौलवी इरफान अहमद वगायच्या घराची एनआयएच्या पथकांनी झडती घेतली. व्हाईट कॉलर्ड दहशतवाद्यांना कट्टर बनवण्यात आणि तरुणांची भरती करण्यात वगायचा हात आहे. कार बॉम्बस्फोटाचा तपास हाती घेतल्यावर एनआयएने मागील महिन्यात त्याला अटक केली आहे.

एनआयएच्या पथकांनी पुलवामातील कोईल, चंदगाम, मलंगपुरा आणि संबुरा येथेही छापेमारी केली. मागील महिन्यात अटक केलेल्या डॉ. अदील अहमद राथरच्या उत्तरप्रदेशातील सहारनपूर येथील घरावर एनआयएने छापेमारी केली, अशी माहिती सूत्रांनी दिली.




पुलवामा येथे संशयिताच्या घराची झडती घेताना सुरक्षा दलाचे जवान

### जावेद सिद्दिकीला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

दहशतवादाशी संबंधित मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात ईडीने अटक केलेला अल-फलाह विद्यापीठाचा संस्थापक जावेद सिद्दिकीला १४ दिवस न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश दिल्लीतील न्यायालयाने सोमवारी दिला.

१९ नोव्हेंबर रोजी न्यायालयाने त्याला १३ दिवस ईडीच्या कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला होता. त्याला सोमवारी अतिरिक्त सत्र न्यायाधीश शीतल चौधरी प्रधान यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. त्यांनी जावेदला १५ डिसेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. जावेदच्या कोठडीची मुदत मंगळवारी पहाटे एक वाजता संपणार असल्याने त्याला मुदतीआधीच हजर करणे अकाली आहे. तांत्रिकदृष्ट्या सोमवारी त्याच्या कोठडीला १२ दिवस होत असल्याचा युक्तिवाद ईडीच्या वकिलाने केला. दरम्यान, कोठडीतल्या कालावधीत जावेद सिद्दिकीला औषधे आणि चष्मा वापरू देण्याची त्याच्या वकिलाने मागितलेला परवानगी न्यायालयाने मान्य केली. ईडीच्या अधिकाऱ्यांनी सिद्दिकीच्या औषधांची चिठ्ठी न्यायालयाला सादर केली. त्याला उपचार मिळत राहावे, असे न्यायालयाने सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

## बॉर्डरजवळील श्रीगंगानगर बनले ‘लॉजिस्टिक हब’

**◆ जयपूर, १ डिसेंबर**

भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेला लागून असलेले श्रीगंगानगर परदेशी शस्त्रास्त्रांचे लॉजिस्टिक हब (पुरवठ्याचे केंद्र) बनत चालले आहे. पाकिस्तानात बसलेले समर्थित तस्कर दारूगोळ्यापासून ते चीन-तुर्कस्तानमध्ये बनवलेली शस्त्रे ड्रोनद्वारे टाकत आहेत. येथून ही शस्त्रे देशाच्या इतर भागांमध्ये पोहोचवली जात आहेत. पूर्वी या मार्गातून अंमली पदार्थांचा पुरवठा केला जात होता.

अलीकडेच लुधियाना (पंजाब) पोलिसांच्या चकमकीत सापडलेला श्रीगंगानगर (राजस्थान) येथील रहिवासी रामलाल देखील पाक-समर्थित दहशतवादी मॉड्यूलचा भाग होता. यापूर्वी गुजरात एटीएसच्या ताब्यात आलेल्या तीन संशयित दहशतवाद्यांनाही शस्त्रे याच मार्गाने पोहोचवण्यात आली होती.

लुधियाना येथे पोलिसांनी २० नोव्हेंबर रोजी चकमकीनंतर रामलाल आणि दीपक या दोन तस्करांना हँड ग्रेनेडसह अटक केली होती. रामलाल श्रीगंगानगर जिल्ह्यातील लालगड शहरातील ताखरांवाली गावाचा रहिवासी आहे. ◀(वृत्तसंस्था)

# ‘उम्मीद’वर वक्फ मालमत्तेची माहिती अपलोड करणे सक्तीचे

## मुदतवाढ देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार




**◆ नवी दिल्ली, १ डिसेंबर**

‘उम्मीद’ पोर्टलवर वक्फ मालमत्तेची माहिती अपलोड करण्याची अंतिम मुदत वाढविण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे नकार दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना संबंधित न्यायाधिकरणासमोर त्यांची बाजू मांडण्यास सांगितले आहे.

अंतिम मुदत वाढवण्याची मागणी करणाऱ्या याचिकांमध्ये ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड आणि नेते असदुद्दीन ओवैसी यांनी दाखल केलेल्या याचिकांचा समावेश होता. पोर्टलवर वक्फ मालमत्तेची माहिती अपलोड करण्याची अंतिम मुदत ५ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. तोवर माहिती अपलोड न केल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थेला शिक्षा होऊ शकते.

न्यायाधीश दीपंकर दत्ता आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या न्यायासनाने सांगितले की न्यायालय वक्फ कायदा पुन्हा लिहू शकत नाही; उलट, वक्फ कायद्यात आधीच उपाय आहेत. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी आधीच सांगितले होते की प्रत्येक मुतवल्ली केस-दर-प्रकरण आधारावर न्यायाधिकरणाकडून दिलासा मागू शकतो. हे अधोरेखित करून न्यायालयाने अंतिम मुदत वाढविण्यास नकार दिला. ◀(वृत्तसंस्था)

### संभाव्य शिक्षा काय?

**» यापूर्वी, १५ सप्टेंबर रोजी, सर्वोच्च न्यायालयाने आपल्या अंतरिम आदेशात, वक्फ (सुधारणा) कायदा २०२५ पूर्णपणे स्थगित करण्यास नकार दिला होता. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने काही तरतुदींवर बंदी घातली होती. नियमांनुसार, वक्फ मालमत्ता अपलोड न करणाऱ्यांना सहा महिन्यांची शिक्षा आणि २०,००० रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. पोर्टलवर त्यांच्या मालमत्तांची नोंदणी न करणाऱ्यांच्या मालमत्ता रद्द केल्या जातील आणि वक्फ न्यायाधिकरणाच्या आदेशानुसारच त्यांची पुन्हा नोंदणी करता येईल.** ■


# सोन्याची २० बिस्किटे जप्त

**◆ कोलकाता, १ डिसेंबर**

पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील घोजडांगा सीमेवर सोन्याची २० बिस्किटे सीमा सुरक्षा दलाने पकडली आहेत. या बिस्किटांची किंमत ३ कोटी रुपये आहे.

सीमेवरून दोन तस्कर सीमा पार करीत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर जवानांनी पाळत ठेवली. ३० नोव्हेंबर रोजी सीमेवर एक ट्रक आला. चालकाच्या केबिनची तपासणी केली असता आतमध्ये सोन्याची बिस्किटे आढळली. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. दोघेही उत्तर २४ परगणा जिल्ह्यातीलच रहिवासी असून ते वीटभट्टीवर कामगार आहेत. एका अनोळखी व्यक्तीने ही बिस्किटे दिली असून त्याबदल्यात पैसे घेण्यास सांगितल्याची कबुली दोघांनी दिली आहे. सीमा सुरक्षा दलाने ट्रक जप्त केला असून दोघांना पुढील कारवाईसाठी संबंधित अधिकाऱ्यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. ◀(वृत्तसंस्था)

## ‘स्त्री’च्या पुढील भागात दिसणार दीपिका?



**मुंबई :** हिंदी चित्रपटसृष्टीत सध्या हॉरर कॉमेडीचे युग सुरू आहे. त्यात ‘स्त्री’ या चित्रपटाच्या सीरिजचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. श्रद्धा कपूर आणि राजकुमार राव यांच्या अप्रतिम अभिनयाने या चित्रपट मालिकेला प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली. आता याच्या आगामी भागात दीपिका पदुकोण झळकणार, अशी शक्यता वर्तविली जात आहे. कारण काही दिवसांपूर्वीच दीपिका मुंबईतील मॅडॉक फिल्म्सच्या कार्यालयाबाहेर दिसली. लोककथांमध्ये प्रसिद्ध असलेल्या बंगाली रहस्यमय भूतनी शकचुन्नीवर आगामी कथाभाग राहू शकतो. या भूमिकेसाठी सध्या दीपिकाशी चर्चा सुरू आहे. ही चर्चा पूर्णत्वास गेली तर कदाचित दीपिका आगामी भागात दिसू शकते. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# केल्याने तीर्थाटन

भौतिक समाधानासाठी आवश्यक असलेल्या गरजांची पूर्तता झाली की, आपण ज्या समाधानाच्या शोधात होतो ते समाधान हे नाही याची जाणीव कदाचित होत असावी. बहुधा, भौतिक सुखाच्या आणि समाधानाच्या आजपर्यंतच्या कल्पनांचा पूर्ण उपभोग घेऊनही सुखाचा आणि समाधानाचा तो शोध संपलेला नसावा. तसे नसते, तर पर्यटनाच्या पारंपरिक प्रथांमध्ये परिवर्तन होऊ लागले नसते. 'केल्याने देशाटन' हा पर्यटनाचा पारंपरिक बाज आपल्या देशात तसा जुनाच आहे. या पर्यटनाच्या कल्पना मात्र जुन्या काळात वेगळ्या होत्या. अशा पर्यटनातून वेगवेगळ्या प्रांतातील पंडित, विद्वानांचा सहवास मिळतो, व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो आणि व्यासंग वाढून विद्वत्ता समृद्ध होते ही पारंपरिक पर्यटनाची समजूत काळासोबत बदलत गेली आणि पर्यटनास सहलीचे स्वरूप प्राप्त होत गेले. प्रेक्षणीय स्थळांच्या सहली आणि त्या निमित्ताने होणारा बाजारहाट व त्यातून पुन्हा घरांचे स्वरूप समृद्ध करणाऱ्या वस्तूंची खरेदी असा पर्यटनाचा नवा बाज सुरू झाल्याने त्यास या क्षेत्रास उद्योगाचे स्वरूप प्राप्त होत गेले. एका अर्थाने, पर्यटन हा आर्थिक उन्नतीचा एक नवा पर्याय म्हणून उभारी घेत गेला असला, तरी सहली, मौजमजा आणि आर्थिक उलाढालीचा नवा मार्ग असेच त्याचे रूप राहिल्याने जुन्या काळातील पर्यटनाच्या किंवा देशाटनामागच्या कल्पना संकोतच गेल्या. पुढे पर्यटनाच्या नव्या कल्पनांस बळ देतील अशी नवी पर्यटनस्थळे नव्याने आकार घेऊ लागली, जुन्या, पठडीबाज पर्यटनस्थळांनी कात टाकली व नव्या जाणिवांसोबत जुळवून घेण्याचे प्रयत्न करून त्यानुसार स्वत:मध्ये तसे बदलही घडवून आणले. पर्यटनाचा उद्देशच जेव्हा बदलून जातो, तेव्हा त्यामागील व्यवहारदेखील बदलतात. नव्या व्यवहारांनुसार पर्यटनाच्या संकल्पनेत आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य मिळाल्याने साहजिकच भौतिक सुखाच्या आणि विरंगुळ्याच्या शोधाचा नवा मार्ग म्हणूनच पर्यटन व्यवसायाची बरकत सुरू झाली. इतिहासाची पुनरावृत्ती होत असते असे म्हणतात. ते खरे आहे हे वारंवार सिद्धही झालेले आहे. अन्यथा, वेशभूषेपासून केशभूषेपर्यंतच्या अनेक परंपरा वेगळ्या स्वरूपात फॅशनच्या नावाने नव्या पिढीत रुजल्या नसत्या. पर्यटनाच्या नव्या व्यावहारिक विरंगुळ्यातून सुख, समाधानाचे शोध संपत नाहीत, विरंगुळ्याचे क्षणही वेचता येत नाहीत असे आता अनेकांच्या लक्षात येऊ लागले आहे. आता या क्षेत्राला नव्या वळणाची वाट सापडली असावी, पर्यटनक्षेत्राचे पूर्वीचे देशाटनाचे रूप बदलून सहली किंवा विरंगुळ्याचा मार्ग म्हणून वळण घेतलेल्या या क्षेत्राने पुन्हा जुन्या वाटांकडे मोहरा वळविण्याचे ठरविले असावे. त्याची काही चिन्हे आता दिसू लागली आहेत. समाजाची संस्कृती पिढीगणिक बदलत असते असे म्हटले जाते. नव्या पिढीसोबत रुजणाऱ्या नव्या संस्कृतीमुळे जुन्या पिढ्या उसासे टाकतात, 'आमच्या वेळी असे नव्हते' असे म्हणत बदलत्या संस्कृतीच्या नावाने खंतदेखील व्यक्त करत असतात, त्या पिढीला दिलासा मिळेल असे नवे चित्र पर्यटनाच्या क्षेत्रात उमटू लागल्याचे काही संकेत आता मिळू लागले आहेत. सहलींच्या किंवा प्रेक्षणीय स्थळांची जागा आता पुन्हा तीर्थक्षेत्रे घेऊ लागल्याचे चित्र नव्याने समोर येऊ लागले आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पर्यटन क्षेत्राच्या भावी वळणाची ही नवी दिशा कदाचित याआधीच दिसू लागली असावी. राजे महाराजांच्या सामर्थ्यामुळे नव्हे, तर या देशातील तीर्थक्षेत्रांच्या वाटेवर उमटलेल्या संत-महंतांच्या पाऊलखुणांमुळे भारतासारखा खंडप्राय देश सांस्कृतिकदृष्ट्या एकसंध राहिला आहे, यावर विदेशी अभ्यासकांचेही एकमत आहे. भक्तीच्या धाग्याने व धार्मिकतेच्या भावनेने शाश्वत जीवनाच्या अर्थांचा शोध घेण्याचा ध्यास ही भारताची सांस्कृतिक परंपरा राहिली आहे आणि त्या ध्यासाच्या धाग्यानेच जनतेस प्रांतभेद, भाषाभेदाच्या दऱ्या बुजवून एकत्र राखले आहे. त्यामुळेच हा देश परकीय आक्रमकांच्या विध्वंसालाही पुरून उरला आणि देशाने आपली परंपरा जतन केली. संस्कृतीच्या या उपकारांची जाणीव पुन्हा समाजात जागी करण्याच्या हेतूने मोदी सरकारने विकासासोबत परंपरांच्या पुनरुज्जीवनाची मोहीम हातात घेतली आणि तार्थक्षेत्रांच्या विकासाचा कार्यक्रम सुरू केला. अयोध्येतील राम मंदिर, काशी विश्वेश्वराच्या नवनिर्माणाचा कार्यक्रम, गुजरातमधील सरदार पटेल यांचा स्टॅच्यू ऑफ युनिटी, अशा काही स्थळांच्या विकासातून पर्यटनक्षेत्रातील बदलाच्या नव्या वाटा निर्माण होत गेल्या. काशी विश्वेश्वराच्या कायापालटामुळे, केवळ तीर्थक्षेत्र असलेले हे ठिकाण आता पर्यटनक्षेत्रही ठरले आहे. सुधारलेले रस्ते, नियोजनबद्ध विकास यामुळे भाविकांच्या भक्तिभावना जाग्या होतात, तसेच प्रेक्षणीय काही पाहिल्याचा नवा आनंदही त्यासोबतच मिळू लागला आहे. केदारनाथ धामच्या विकासाची योजनाही पर्यटनाच्या नव्या वाटांना विस्तृत करण्यास साह्यभूत ठरणार आहे. विकास आणि संस्कृती संवर्धनाचे हे नवे प्रयोग हातात हात घालून सुरू असल्याने पर्यटनक्षेत्राच्या पठडीबाजपणाने कात टाकण्यास सुरुवात केली असून पर्यटनाची जागा तीर्थाटनाने घेतली तर नवल वाटू नये असा आश्चर्यकारक बदल दिसू लागला आहे. भारतातील पर्यटनक्षेत्राचा हा बदलता बाज देशातील पर्यटकांप्रमाणे विदेशी पर्यटकांसही भुरळ घालू लागला आहे. गेल्या काही वर्षांत भारतात पर्यटनासाठी येणाऱ्या विदेशी पर्यटकांची संख्या झपाट्याने वाढत आहेच, पण त्यांनादेखील पर्यटनसंस्कृतीतील हा नवा बदल खुणावत आहे. भारतातील प्रेक्षणीय स्थळांच्या त्यांच्या पसंतिक्रमात विविध धार्मिक स्थळे, तीर्थक्षेत्रे आणि अयोध्येतील राम मंदिरासारख्या नव्या यादीचीही भर पडली आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत, विशेषत: कोविड महामारीनंतर जनजीवन पूर्वपदावर आल्यापासूनच्या काळात भारतास तब्बल सुमारे एक कोटी विदेशी पर्यटकांनी भेट दिली. यापैकी बहुसंख्य पर्यटकांची पावले भारतीय संस्कृतीची मानचिन्हे असलेल्या तीर्थक्षेत्रांकडेही वळलेली दिसतात. हा पर्यटनसंस्कृतीतील बदल किती चांगला, हे ठरविण्यासाठीचे नवे मापदंड याचे उत्तर सकारात्मकच देतात. पर्यटन हा उद्योग असेल, तर त्यातून आर्थिक उलाढालींचे नवे स्रोत तयार व्हावेत हीच प्राधान्याने अपेक्षा असते. समाजात रोजगाराच्या नव्या संधी, उत्पन्नाचे नवे स्रोत आणि पर्यायाने जीवनशैलीत होणारी सुधारणा हेच विकासाचे उद्दिष्ट असेल, तर तीर्थाटनांच्या नव्या प्रकारांतूनही ते साध्य झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दर वर्षी ३१ डिसेंबर हा दिवस वर्षअखेरचा सोहळा म्हणून साजरा केला जातो. त्याच्या साजरेपणाच्या कल्पनांवरील बाह्य समजुतींचा पगडादेखील आता नव्या पर्यटनसंस्कृतीमुळे पुसला जात असल्याचे चित्र आहे. सणासुदीच्या काळातील पर्यटनाकडे वळणारी पावले आणि वर्षअखेरीसारख्या क्षणांचे साजरेपण यांमधील फरक आता पुसला जाऊ लागला आहे. उत्सवांचा काळ संपला की समाजाची पावले मौजमजेकडे वळतात हा आजवरचा पर्यटनक्षेत्राचा पठडीबाज अनुभवही आता बदलाच्या टप्प्यावर दाखल झाला आहे. कारण, आता भारतीय पर्यटकांची पावले वर्षअखेरीचा सोहळा साजरा करण्यासाठी किंवा ख्रिसमसची सुटी घालविण्यासाठी युरोप किंवा थायलंडसारख्या प्रेक्षणीय परदेशी पर्यटनांची वाट धरण्याऐवजी भारतातील तीर्थक्षेत्रांच्या सहलीकडे वळू लागली आहेत. अयोध्या, वाराणसी, ऋषीकेश, अमृतसरसारख्या तीर्थस्थळांवरील गर्दी यंदाच्या डिसेंबरचा अखेरच्या आठवड्यात नवा विक्रम प्रस्थापित करेल असा सहल आयोजकांचा अंदाज या बदलाचे संकेत देतो. गेल्या वर्षभरात जेन-झीच्या मानसिकतेचे अनेक नवे पैलू जगाच्या वेगवेगळ्या भागांतून दिसू लागले असताना, भारतातील 'जेन-झी'ला तीर्थस्थळांचे आकर्षण वाटू लागल्याचेही दिसू लागले आहे. तीर्थस्थळांची यात्रा करणाऱ्यांपैकी सुमारे १२ टक्के पर्यटक तरुण पिढीतील असल्याची ढोबळ आकडेवारी समोर येत आहे. गेल्या वर्षातील तीर्थयात्रींच्या तुलनेत ही टक्केवारी सुमारे १५ टक्क्यांनी अधिक आहे. त्यामुळे, भौतिक सुखाच्या उपभोगानंतरही समाधानाचा शोध संपलेला नसल्याचा व समाधानाच्या शोधात नव्या समाजाच्या आसुसलेपणाचा अंदाज या नव्या बदलातून येऊ शकतो. पर्यटनक्षेत्राला चालना मिळेल हा या नव्या बदलाचा फायदा आहेच, पण नव्या मानसिकतेचे दर्शन घडविणारा हा नवा बदल म्हणजे भविष्यात घडणाऱ्या इतिहासाच्या पुनरावृत्तीची चाहूल तर नसेल? ▮


## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# नेतान्याहू यांनी का टाळला भारत दौरा?

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या कार्यालयाने इस्रायलचे भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी असलेले संबंध खूप मजबूत आहेत, असे अलिकडे सांगितले. खरे तर याची उजळणी करण्याची काहीच गरज नव्हती; परंतु नेतान्याहू यांच्या कार्यालयाने 'एक्स'वर जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, त्यांची टीम भारतभेटीसाठी नव्या तारखेबाबत चर्चा करीत आहे. याचा अर्थ असा की, नेतान्याहू यांचा आगामी भारत दौरा पुढे ढकलला गेला आहे आणि नवी तारीख अद्याप निश्चित झालेली नाही. याचा दुसरा अर्थ असा की, मध्य पूर्वेत घेतलेल्या भूमिकेमुळे नेतान्याहू अनेकांच्या रडारवर आहेत आणि जीविताला धोका असल्याच्या भीतीतून तूर्त त्यांचा दौरा पुढे ढकलण्यात आला आहे. दुसरे एक कारण म्हणजे इस्रायलचे परपंरागत विरोधी असलेले रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन हेही नेमके याच काळात भारताच्या दौऱ्यावर येत आहेत. 'आय २४ न्यूज' या इस्रायली वृत्तवाहिनीने दिलेल्या माहितीनुसार नेतान्याहू यांनी सुरक्षेच्या कारणास्तव भारत दौरा रद्द केला आहे. तथापि, 'सुरक्षेच्या कारणास्तव' असा उल्लेख कुठेही अधिकृतपणे करण्यात आलेला नाही. या वृत्तवाहिनीचे राजनयिक प्रतिनिधी गाय अझिएल यांनी लिहिले आहे की, नेतान्याहू यांची भारतभेट सुरक्षेच्या कारणास्तव पुढे ढकलण्यात आली आहे. दोन आठवड्यांपूर्वी नवी दिल्ली येथे एका दशकाहून अधिक काळानंतर अत्यंत शक्तिशाली बॉम्बस्फोट झाला. त्यात १३ लोक ठार झाले तर डझनभर जखमी झाले होते. नेतान्याहू यांनी २०१८ मध्ये शेवटचा भारत दौरा केला होता आणि पंतप्रधान मोदी यांना भेटण्यासाठी ते परत येणार होते. आता सुरक्षेच्या मूल्यांकनाच्या आधारे, पुढील वर्षी नवीन तारीख निश्चित होण्याची अपेक्षा आहे.

नेतान्याहू हे मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प या दोघांनाही आपले मित्र म्हणतात. वृत्तवाहिनीच्या या अहवालाचा हवाला देऊन, भारतीय माध्यमांमध्ये बातम्या पसरू लागल्या की, इस्रायली पंतप्रधानांनी सुरक्षेच्या कारणास्तव आपला भारत दौरा पुढे ढकलला आहे. संध्याकाळपर्यंत इस्रायली पंतप्रधान कार्यालयाला स्पष्टीकरण द्यावे लागले. इस्रायली पंतप्रधान कार्यालयाच्या विधानाबाबत, गाय अझिएल यांनी लिहिले की, सुरक्षेच्या कारणास्तव डिसेंबरमध्ये पंतप्रधान नेतान्याहू यांचा भारत दौरा पुढे ढकलण्यात आला आहे, या आमच्या विशेष वृत्तानंतर पंतप्रधान कार्यालयाने एक असामान्य निवेदन जारी केले आहे. हे विधान दोन्ही देशांमधील संबंध मजबूत करण्यावर आणि भेटीसाठी नवी तारीख निश्चित करण्यावर भर देते. भारताचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी २० नोव्हेंबर रोजी इस्रायलमध्ये नेतान्याहू यांची भेट घेतली. या बैठकीनंतर, इस्रायली पंतप्रधानांनी २३ नोव्हेंबर रोजी 'एक्स'वर लिहिले की, आज मी गोयल यांची भेट घेतली. भारत आणि इस्रायल आपली धोरणात्मक भागीदारी मजबूत करीत आहेत. नेतान्याहू यांनी सुरक्षेच्या



कारणास्तव त्यांचा भारत दौरा पुढे ढकलला का, या प्रश्नाचे उत्तर देताना सौदी अरेबियातील भारताचे माजी राजदूत तलमीज अहम म्हणतात, नेतान्याहू यांनी सुरक्षेच्या कारणास्तव दौरा पुढे ढकलणे भारतासाठी लज्जास्पद आहे. इस्रायली पंतप्रधानांनी आपला भारतातील सुरक्षेवर पूर्ण विश्वास आहे, असे स्पष्ट केले असले, तरी नेतान्याहू सरकारकडून ब्रीफिंगशिवाय तिथल्या माध्यमांमध्ये इतका मोठा मुद्दा प्रकाशित झाला नसता.

आजघडीला नेतान्याहू हे घरी अनेक आघाड्यांवर वेढलेले आहेत आणि या वेळी भारताला भेट देणे त्यांच्यासाठी कठीण आहे. त्यांनी सत्य सांगायला हवे होते; परंतु कथित भेट पुढे ढकलण्याचे कारण म्हणून त्यांनी सुरक्षाविषयक चिंता पुढे केल्या आहेत. हे भारताचा अपमान करणारे आहे. भारत आणि इस्रायलमध्ये बरेच प्रतीकात्मक संबंध आहेत. असे असूनही, नेतान्याहू यांनी आपला दौरा पुढे ढकलून भारताला चांगला संदेश दिलेला नाही. अमेरिकेशिवाय कोणीही त्यांच्यासोबत उभे नव्हते, तेव्हा भारत त्यांना पाठिंबा देत होता. ट्रम्प यांच्या भारताप्रति बदललेल्या भूमिकेवरून इस्रायलमध्ये वाद सुरू झाला आहे. नेतान्याहू यांनी भारताचा दौरा पुढे ढकलण्याचे कारण म्हणून सुरक्षा चिंतांचा उल्लेख करणे तर्कसंगत नाही. नेतान्याहू भारताकडून खूप अपेक्षा करत आहेत, पण भारत एका मर्यादेपलीकडे जाऊ शकत नाही. नेतान्याहू यांना वाटते की, भारत कधी तरी पॅलेस्टिनींची बाजू घेतो तर कधी तरी इस्रायलला पाठिंबा देतो. भारताने या विषयात मध्यस्थी करावी, असे इस्रायलला वाटत असले, तरी भारत तसे करणार नाही. कारण त्याच्याही काही मर्यादा आहेत. त्यातच सध्या भारत आणि अमेरिकेचे संबंध चांगले नसल्याने ट्रम्प भारताची मध्यस्थी मान्य करणार नाहीत. याची भारताला जाणीव आहे.

भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला, तर इस्रायलची प्रासंगिकता वाढते. कारण इस्रायल पाकिस्तानच्या अण्वस्त्रांना धोका मानतो. भारताचे अमेरिकेशी संबंध खराब असतील, तर इस्रायलशीही फारसे चांगले संबंध राहणार नाहीत. ट्रम्प यांनी भारतावरील कर ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची घोषणा केली, तेव्हा नेतान्याहू म्हणाले होते की, मोदी आणि ट्रम्प हे चांगले मित्र आहेत. ते मोदी यांना ट्रम्प यांच्याशी व्यवहार करण्यासाठी काही सूचना देतील; परंतु सार्वजनिकरीत्या नाही. नेतान्याहू यांनी भारतीय पत्रकारांच्या गटाला सांगितले की, भारत आणि अमेरिकादरम्यानच्या संबंधांमध्ये मूलभूत समजूतदारपणा आहे. दोन्ही देशांमधील संबंधांचा पाया खूप मजबूत आहे. दोन्ही देशांनी करार केला आणि करसमस्येचे निराकरण केले तर ते भारत आणि अमेरिकेच्या हिताचे असेल. हे आमच्यादेखील हिताचे असेल; कारण दोन्ही देश चांगले मित्र आहेत. नेतान्याहू यांनी या वर्षी सप्टेंबरमध्ये अमेरिकेला भेट दिली होती. 'व्हाईट हाऊस'च्या एका सल्लागाराने युक्रेनवरील रशियाच्या क्रूर हल्ल्याला 'मोदी युद्ध' म्हटले आहे. ऊर्जेसाठी भारताचे रशियावर वाढत असलेले अवलंबित्व दुःखद आहे; परंतु पुतिन यांच्या युद्ध गुन्ह्यांसाठी भारत जबाबदार नाही, असेही त्यांनी म्हटले होते. माजी इस्रायली खासदार आणि मध्य पूर्व प्रकरणांच्या तज्ज्ञ केसेनिया स्वेतलोवा यांनी या वर्षी फेब्रुवारीमध्ये मोदी आणि ट्रम्प यांच्या भेटीपूर्वी 'जेरुसलेम पोस्ट' या वृत्तपत्रामध्ये 'इस्रायलने मोदी-ट्रम्प बैठकीची काळजी का घ्यावी' या शीर्षकाचा लेख लिहिला होता.

केसेनिया स्वेतलोवा यांनी लिहिले की, भारत-मध्य पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर (आयएमईसी) साठी भारत आणि अमेरिकेतील चांगले संबंध महत्त्वाचे आहेत. मोदी पंतप्रधान झाल्यापासून भारताचे इस्रायलशी संबंध चांगले झाले आहेत. मोदी हे इस्रायलला भेट देणारे पहिले पंतप्रधान होते. भारत-पाकिस्तान संघर्षात जगातील जवळजवळ सर्व देशांनी तटस्थ राहण्याचा प्रयत्न केला, तेव्हा इस्रायलने भारताला उघडपणे पाठिंबा दिला. २००३ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात इस्रायली पंतप्रधानांची पहिली भारतभेट झाली होती. त्या वेळी एरियल शेरोन यांनी भारताला भेट दिली होती. भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला की भारत आणि इस्रायलमधील संबंध अधिक मजबूत होतात, असे निरीक्षण अनेक विचारवंतांनी नोंदवले आहे. पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रे आणि अणुबॉम्ब मुस्लिम राष्ट्रांचा विरोधक म्हणून पाकिस्तान इस्रायलविरोधात वापरायला कमी करणार नाही, अशी भीती इस्रायलला वाटते. त्यामुळे या दोन देशांमध्ये तणाव होतो, तेव्हा इस्रायल-भारत संबंधांमध्ये सुधारणा होते. सध्या भारत आणि पाकिस्तानदरम्यानचे संबंध ताणलेले आहेत. अशा वेळी नेतान्याहू यांनी दौरा रद्द करायला नको होता; परंतु ट्रम्प यांच्या दबावाखाली कदाचित नेतान्याहू यांनी हा दौरा रद्द केला असावा. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# बिबट्यांची दहशत; नागरिकांची गस्त

राज्यातील अनेक जिल्ह्यांत सध्या बिबट्यांनी दहशत माजवली आहे. अनेक ठिकाणी मानवी वस्तीत बिबट्यांचा मुक्तसंचार दिसून येतो आहे. काही ठिकाणी तर लहानग्या मुलांवर बिबट्याने हल्ला केल्याच्याही घटना घडल्या आहेत. पण सुदैवाने या घटनेत लहान मुले वाचली असली तरी इजा मात्र गंभीर झाल्या आहेत. या घटनेने सध्या नगर पालिका निवडणुकांच्या धामधुमीत राजकीय वातावरण तापलेले असताना संपूर्ण महाराष्ट्रभर बिबट्यांची दहशत पसरली आहे. अशा परिस्थितीत बिबट्यापासून वाचवण्यासाठी वनविभागाने नागरिकांसाठी काही आदेश व उपाय जारी केले आहेत. बिबट्यांच्या वाढत्या दहशतीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. यावर उपाय म्हणून, अनेक ठिकाणी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून गस्त वाढवण्यात आली आहे. ज्यात थर्मल ड्रोनसारख्या तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. नागरिकांनीही स्वसंरक्षणासाठी उपाययोजना केल्या आहेत. जसे की पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात महिलांनी गळ्यात टोकदार खिळ्यांचा पट्टा घालणे. प्रशासनाकडे बिबट्या पकडण्यासाठी पिंजरे लावण्याची आणि गस्त वाढवण्याची मागणी होत आहे. नागरिक आणि वन विभागाचे कर्मचारी मिळून गस्त घालत आहेत. बिबट्याच्या हल्ल्यांमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई आणि परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्रात बिबटग्रस्त भागात राज्य आपत्ती जाहीर करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. वनअधिकारी कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणे आवश्यक आहे. जंगलातील वन्यप्राणी मानवी वस्तीकडे वळू लागले



आहेत. वन्यप्राण्यांमुळे शेती पिकांचे नुकसान होत आहे. तसेच प्राणघातक हल्ले करत असल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण आहे. वन विभागाने यावर ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत आहे. काही दिवसांपासून शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात बिबट्याचा वावर वाढला आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा-मेहकर मार्गावर लमानदेव मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या शेतात बिबट्याचा मुक्तसंचार असल्याचे समजते. तिथे खेळत असलेल्या लहान मुलांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार निदर्शनास आला व मोठा अनर्थ टळला. पाच दिवसांपासून संग्रामपूर तालुक्यातील पाच गावांत बिबट्याने दहशत माजविली आहे. काकनवाडा, वडगाववाण, खळद, कोलद, बल्लाळी या गावांत आपला डेरा टाकल्याने या भागातील शेतातील कामे प्रभावित झाली आहेत. गेल्या पाच दिवसांपासून शेतमजूर व शेतकऱ्यांनी शेताकडे जाण्यास पाठ फिरवली आहे. या पाच गावांना लागून वान नदी व अडचणीचे जंगल अशी बिबट्याला लपण्यासाठी जागा आहे. पुणे जिल्ह्यातील बिबटप्रवण क्षेत्रातील शाळांची वेळ सकाळी ९.३० ते दुपारी ४ अशी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आणि अंधार होण्यापूर्वी त्यांना घरी पोहोचता यावे यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मागील महिन्यात बिबट्याच्या हल्ल्यात तीन लोकांना प्राण गमवावे लागले. या पृष्ठभूमीवर, शिरूर- आंबेगाव- खेड- जुन्नर या अतिसंवेदनशील बिबटप्रवण क्षेत्रातील शाळांच्या वेळात बदल करण्यात आला. गेल्या काही महिन्यांत गावोगावी दिसणाऱ्या बिबट्यांची दहशत हा लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न बनला आहे. याच पृष्ठभूमीवर राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली वन विभागाची महत्त्वाची आढावा बैठक संपन्न झाली. बैठकीत वन विभागाच्या संरचनात्मक विस्तारीकरण तसेच कार्यात्मक सबलीकरणासंदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला. थर्मल ड्रोन, ट्रॅप कॅमेरे, झूम स्कोप यांच्या मदतीने तसेच पथकांनी विविध भागांत बिबट्यांचा शोध सुरू केला आहे. तसेच वन विभागामार्फत शहरातील विशेषत: टेकडी परिसर व इतर मोठ्या प्रमाणात संरक्षित प्रदेशातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. बिबट्याच्या मुक्तसंचाराने परिस्थिती गंभीर झाली असून मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी शासन, प्रशासन आणि नागरिक दोन्ही स्तरांवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. ▮

९८८१७१७८२८

## इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# कामगार कायद्यांचे स्वरूप आणि फायदे

केंद्र सरकारने नवीन कामगार कायदे लागू करण्यासंबंधी निर्णय नुकताच जाहीर केला असून, त्यामुळे सर्व राज्य सरकारांच्या माध्यमातून या कायद्यांतर्गत नियम व तरतुदींच्या अंमलबजावणीला चालना मिळणार आहे. या नव्या कामगार कायद्यांवर साधकबाधक चर्चा होणे स्वाभाविक व आवश्यकदेखील आहे. विशेषत: केंद्रीय कामगार संघटनांनी यासंदर्भात आंदोलनांसह विरोधाची भूमिका घेण्याच्या पृष्ठभूमीवर नवीन कामगार कायदे व त्यातील तरतुदींचा मुळातून अभ्यास करणे गरजेचे ठरते.

यासंदर्भात सकृद्दर्शनी सांगायचे म्हणजे, केंद्र सरकारने परंपरागत स्वरूपात लागू असणाऱ्या २९ कामगार कायद्यांचा व्यापक व सर्वसमावेशक समावेश नवीन चार कामगार कायद्यांमध्ये केला आहे. कामगारांच्या संदर्भात संख्यात्मकदृष्ट्या सांगायचे म्हणजे, आज देशांतर्गत श्रमिकक्षेत्रात सुमारे ५० कोटी कर्मचारी-कामगार कार्यरत असून, त्यापैकी अधिकांश म्हणजेच सुमारे ९० टक्के कामगार हे असंघटित क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचा या नव्या तरतुदींमध्ये प्रकर्षाने विचार करण्यात आल्याचे दिसून येते.

कामगार कायद्यांची संख्या व त्यातील मुख्य व महत्त्वाच्या तरतुदींची अंमलबजावणी यावर आपले मत आणि विचार व्यक्त करताना २००२ मध्ये स्थापन झालेल्या द्वितीय श्रम आयोगाने स्पष्टपणे नमूद केले होते की, भारतातील प्रचलित कामगार कायद्यांची संख्या व स्वरूप पाहता, त्यावर गांभीर्याने विचार करून केंद्र सरकारने सर्वसमावेशक व व्यापक तरतुदींसह असणारे चार ते पाच कामगार कायदे केंद्रीय स्तरावर करणे आवश्यक ठरते. त्यानंतर या मुद्यावर सुमारे १८ वर्षे फारशी चर्चा व हालचाल झाली नाही. त्यामुळेच या नव्या कामगार कायद्यांच्या संदर्भातील महत्त्व प्रकर्षाने जाणवते.

नव्या कामगार कायद्यांची रचना आणि आखणीची पूर्वतयारी म्हणून २०१४ पासून मोदी सरकारने घेतलेल्या व अंमलात आणलेल्या प्रमुख कामगार कायद्यांचा गोषवारा खालीलप्रमाणे सांगता येईल :

कामगार कायदे व नियम यांची पारदर्शी व परिणामकारक स्वरूपात अंमलबजावणी करण्यासाठी संगणकीय पद्धत आणि प्रक्रियेची अंमलबजावणी आवश्यक करण्यात आली.

ग्रॅच्युईटी रकमेची कमाल मर्यादा २९ मार्च २०१८ पासून १० लाखांहून २० लाख करण्यात आली.

१६ फेब्रुवारी २०१७ पासून कामगार वेतन कायद्यात कामगारांचे वेतन चेकद्वारा अथवा थेट त्यांच्या खात्यावर जमा करण्याची तरतूद करण्यात आली.

मातृत्वविषयक कायद्यांतर्गत २०१७ मधील नव्या तरतुदींनुसार १ एप्रिल २०१७ पासून मातृत्व रजेचा कालावधी १२ आठवड्यांहून २६ आठवडे एवढा करण्यात आला.

या पृष्ठभूमीवर नवीन कामगार कायद्यांच्या संदर्भात थोडक्यात; पण महत्त्वाच्या तरतुदी खालीलप्रमाणे सांगता येतील :

**किमान वेतनविषयक तरतुदी** : नव्या तरतुदींनुसार किमान वेतन कायदा आता सुमारे ५० कोटी कामगारांना लागू होईल. यामध्ये संघटित व असंघटित अशा दोन्ही क्षेत्रांतील कामगारांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे.

**किमान वेतन** : २०१९च्या नव्या कामगार कायद्यातील तरतुदी आता सर्व उद्योगातील कामगारांना लागू करण्यात आल्या असून, त्याची दर पाच वर्षांनंतर कामगारांच्या किमान वेतनाची फेररचना केली जाणार आहे.

**सामाजिक सुरक्षा कायदा** : कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या उद्देशाने नव्या कायद्यांमध्ये कामगारांना सामाजिक सुरक्षेच्या संदर्भात लागू असणाऱ्या सुमारे १३ कायद्यांचा नव्या संदर्भात समावेश करून औद्योगिक कामगारांना प्रत्येक परिस्थितीत सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत.

**कामगार सुरक्षाविषयक कायदे** : कामगारांना सर्वकालीन सुरक्षा प्रदान करण्याच्या व्यापक उद्देशाने कामगार सुरक्षा विषयाशी संबंधित अशा १३ प्रचलित कायद्यांच्या समावेशातून २०२०च्या कामगार सुरक्षा व आरोग्यविषयक कायदा लागू करण्यात आला आहे. या नव्या कायद्यातील तरतुदींनुसार, आता रोजगारासाठी अन्य राज्यांमधून येणाऱ्या कामगारांना आता त्यांच्या रोजगाराच्या राज्यात सरकारी नियमांनुसार धान्य उपलब्ध करून दिले जाईल, याचा फायदा अशा कामगारांच्या कुटुंबीयांना पण मिळेल. याशिवाय, महिला सशक्तीकरण अधिक परिणामकारक करण्यासाठी कायदेशीर तरतुदी केल्या आहेत.

**कामगार विवादांची सोडवणूक** : कामगार व कामगार संघटनांशी निगडित विवाद वा विषयांची सोडवणूक करण्यासाठी २०२० औद्योगिक संबंध कायद्यामध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत. याशिवाय, कामगारांना वार्षिक रजा मिळण्यासाठी पूर्वी असणारी वर्षात २४० दिवस काम करण्याची अट आता वर्षात १८९ दिवसांवर आणण्यात आली आहे. यानुसार, कामगारांना आता २० दिवस काम करण्यापोटी एक दिवसाची वार्षिक रजा लागू होणार आहे. संघटित क्षेत्रातील कामगारांचा रोजगार गेल्यास त्याला सरकारी योजनेनुसार, अटल विमित व्यक्ती कल्याण योजनेंतर्गत लाभ मिळू शकेल. बेरोजगार झालेल्या कामगारांसाठी हा एक नवा पर्यायी लाभ ठरू शकेल. न्यायालयीन प्रक्रियेला चालना देऊन अधिक गतिमान करण्यासाठी कामगार न्यायालयात दोन सदस्यांची नेमणूक करणे, कामगार प्रश्नाचे विवाद प्राधान्य तत्त्वावर सोडवून निर्णय देण्यासाठी आता अशा प्रकरणी निकाल देण्यासाठी एक वर्षाची कालमर्यादा घालण्यात आली आहे.

**कामगार संघटनाविषयक** : ज्या कारखाना-आस्थापनेत एखाद्या कामगार संघटनेची सदस्यसंख्या ५१ टक्के वा त्याहून अधिक असेल, अशा कामगार संघटनेला त्या आस्थापनेत कामगारांची प्रतिनिधिक कामगार संघटना म्हणून मान्यता दिली जाईल. ज्या आस्थापनेत कामगार संघटनेची सदस्यसंख्या ५१ टक्क्यांहून कमी असेल, अशा ठिकाणी विविध कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची मिळून समिती स्थापित करून या प्रतिनिधींना व्यवस्थापनाशी चर्चा करण्याचे अधिकार राहतील.

**कंत्राटी कामगार कायदा** : नव्या कामगार कायद्यातील तरतुदींनुसार, कंत्राटी कामगारविषयक तरतुदी ज्या ठिकाणी ५० हून अधिक कंत्राटी कामगार असतील, अशा ठिकाणी लागू होतील. याशिवाय, कंत्राटी कामगारविषयक परवान्याची मुदत आता पाच वर्षांपर्यंत वाढविण्यात आली असून, निवडक उद्योगांमधील कंत्राटी कामगारांनी संघटना स्थापन केल्यास, निर्णय प्रक्रिया केंद्र सरकारकडे सोपविण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या नव्या कामगार कायद्यांमध्ये उद्योगक्षेत्रातील कंपन्यांपासून कामगार-कंत्राटदारांपर्यंत विविध घटकांची नोंद घेतली गेली आहे, हे या धोरणाचे वैशिष्ट्य ठरले आहे. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## आजचे संघगीत-६०

मंगळवार, २ डिसेंबर २०२५

### तुझे तेज अंगी शतांशे जरीही उजाळून देऊं दिशा दाहि दाही

तुझे तेज अंगी शतांशे जरीही उजाळून देऊं दिशा दाहि दाही ॥धृ.॥

स्मिताने तुझ्या विश्व तेजे भरेल, तमाचे कुठे नाव तेव्हा उरेल
मुखातून ये ना जरी शब्द काही, अभागी जना या तरी यापुढेही
तुझे धीर गंभीर ते शब्द कानी, अजूनी अम्हा देति उत्साह कार्या
पुढे चालवू कार्य तूझे सदाही, उजाळून देऊ दिशा दाहि दाही ॥१॥

समाधी तुझी ही इथे बांधिलेली, म्हणूनीच भूमी असे पुण्यशाली
हवेचा इथे हा अणूरेणु पूर्ण, तुझ्या आत्मतेजे असे दीप्तिपूर्ण
समाधिस्थ होता तुवा हा दिलेला, करांतील तो दीप आम्ही धरीला
पुढे चालवू कार्य तूझे सदाही, उजाळून देऊ दिशा दाहि दाही ॥२॥

स्मृतीने तुझ्या मात्र अश्रू गळावे, सुचावे न काही मनाशी रडावे
पुसूनीच अश्रू पुढे जावयाते तुझा याचितो स्पर्श मी एक हाते
मुखी नाम राहो सदा केशवाचे, तरूनी-तदा अश्मही जावयाचे
प्रसादे तुझ्या शक्ति ती अंगि येवो समाधीपुढे प्रार्थना हीच होवो ॥३॥

## वाचक पत्रे

### मतदारांनी मतदानाचा हक्क चोखपणे बजावा

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये नागरिकांना मतदानाचा अधिकार प्राप्त झालेला असतो. ग्रामपंचायत, नगरपालिकांपासून तर लोकसभेपर्यंत ज्या निवडणुका होतात त्यामध्ये मतदार आपल्या मतदानाच्या माध्यमातून आपल्या पसंतीचा उमेदवार लोकप्रतिनिधी म्हणून निवडून देतो. निवडलेल्या लोकप्रतिनिधींमधून त्या त्या स्तरावरील शासन व्यवस्था निर्माण होत असल्याने मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार चोखपणे बजावणे अत्यावश्यक आहे.

मंगळवार २ डिसेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात नगरपालिका व नगरपंचायत निवडणूक होत आहे. आपल्या नगरामधील, शहरातील समस्या सोडविण्यासाठी मतदारांना सक्षम उमेदवारांची निवड करावयाची आहे. सक्षम नगराध्यक्षांची निवड करावयाची आहे. मतदारांसाठी ही एक उत्तम संधी आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेमध्ये निवडणुकीचे महत्त्व कथन केले आहे.

काही उमेदवार निवडणुका जिंकण्यासाठी मतदारांना पैशाचे प्रलोभन दाखवून त्यांची मते विकत घेण्याचा प्रयत्न करतात, खोटी आश्वासने देतात, मतदारांना दमदाटी करतात, सत्तेच्या माध्यमातून भ्रष्टाचार करतात, अशा उमेदवारांना मतदारांनी मतदान करू नये. जनसामान्याच्या हिताची व विकासाची तळमळ असणाऱ्या उमेदवारांनाच मतदारांनी निवडून द्यायला पाहिजे.

**प्रा. उदय कानतोडे**/९४२३६६३७०६

### ढोंगी आणि हिंदुद्रोही पर्यावरणप्रेमी

लवकरच नाशिकला कुंभमेळा होणार आहे. नुकताच प्रयागराजला १४४ वर्षानंतर झालेला महाकुंभ सर्व विश्वात गाजला. संपूर्ण जगातले कोट्यवधी धर्मप्रेमी यात सहभागी झाले व मानसिक, धार्मिकरीत्या धन्य झाले. त्यामुळे अब्जो रुपयांची उलाढाल देखील झाली व हजारो हाताना रोजगार मिळाला. आता एवढे मोठे प्रस्तावित आयोजन करताना अनेक बाबी विचारात घ्याव्या लागतात. पहिले म्हणजे विस्तारित भव्य विशाल व योग्य जागा.

**रवी वाघमारे**/नागपूर

### सोलापूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्मची उंची कमी करावी



सोलापूर रेल्वे स्थानकात रेल्वे प्रशासन प्लॅटफॉर्म २ व ३ चे विस्ताराचे काम करणार आहेत तर डब्यातून उतरताना सध्या डबा व platform मधील अंतर (उंची) १ फूट आहे. ती कमी करून एकच लेव्हल करावे. म्हणजे ज्येष्ठ नागरिक, महिला व गुडघ्याचा त्रास असणाऱ्यांना फायदा होईल व चढ उताराचा वेळ वाचेल. व्हिल बॅगा घेऊन माणूस सोईस्कर डब्यातून आत बाहेर करू शकेल. तसेच वेळ व पाकीट मारीचे प्रसंग व सामान चोरीचे हे सर्व बंद होतील. सन २०११-१२ साली प्लॅटफॉर्मचे काम झाले, त्यावेळी हा उंचीचा प्रश्न निर्माण झाला. पूर्वी डबा व plateform यांची लेव्हल एकच होती. हा पण एक शारीरिक सोलापूरकरांसाठी विकासचाच भाग आहे, असे समजावे.

**- जयजीत पटवा, सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### सोलापूर जिल्हा निवडणूक उपजिल्हाधिकारी म्हणून किरण सुरवसे रुजू

**सोलापूर. दि. १ डिसेंबर-**
जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूक उपजिल्हाधिकारी गणेश निराळे यांचे प्रमोशन झाल्यानंतर रिक्त झालेल्या निवडणूक उपजिल्हाधिकारी पदी किरण सुरवसे हे नव्याने रुजू झाले आहेत शुक्रवारी त्यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी आणि उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले.

### इतर मतदारसंघात नावे गेली तर फॉर्म भरून द्या; महापालिकेचे आवाहन

**मतदार यादीतील घोळासंदर्भात उपाय योजना**

**सोलापूर, दि.१ डिसेंबर -**
महापालिका संकेतस्थळावर डिजिटल पोस्टर तयार करून सोशल मीडियावर जाहीर केले आहे. यावर मतदार यादीत आपले नाव कसे शोधायचे याची माहितीही दिली. त्यानुसार -प्रत्येकांनी यादीत शोधावे असे आवाहन - करण्यात आले आहे. तुमची नावे इतर विधानसभा मतदारसंघात गेली असतील, तर महापालिका निवडणूक कार्यालयात जाऊन फॉर्म भरून देऊ शकता. त्याचे कार्यालय हुतात्मा स्मृती मंदिराच्या पाठीमागील आयसीआयसीआय बँकेच्या वर आहे. त्याची दुरुस्ती होईल, असेही महापालिकेने स्पष्ट केले आहे. दरम्यान, मतदार याद्यातील घोळा संदर्भात अनेक तक्रारी दाखल झाल्यानंतर महापालिका प्रशासनाने यावर प्रतिबंधात्मक उपाय योजना सुरू केली आहे. संबंधित मतदाराचे नाव अथवा इतर माहिती दुसऱ्या प्रभागातील मतदार यादीत समाविष्ट झाले असल्यास, त्याची माहिती एका अर्जात भरून द्यावयाची आहे. त्यासाठी निवडणूक प्राधिकरण कार्यालय तथा महापालिका प्रशासनाच्या वतीने वेबसाईट द्वारे अर्ज भरावयाचा आहे.

### महापालिका प्रारूप मतदार यादीवर सोमवारी १०२ हरकती

**आतापर्यंत एकूण ३३७ तक्रारी प्राप्त**

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
सोलापूर महापालिका प्रारूप मतदार यादीवर आज सोमवार दि. १ डिसेंबर रोजी दिवसभरात एकूण १०२ हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत. २० नोव्हेंबर ते एक डिसेंबर २०२५ दरम्यान एकूण ३३७ हरकती व सूचना महापालिका निवडणूक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत. मतदार यादीमध्ये काही लेखनिकाच्या चुका असल्यास त्याबाबतचे प्राप्त अर्ज - २, दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असतील तर त्यांची नावे त्या प्रभागतून वगळण्यात यावी व संबंधित प्रभागत समाविष्ट करण्याबाबतचे प्राप्त अर्ज - ८५ , मनपा संबंधित प्रभागाच्या क्षेत्रातील विधानसभा भाग यादीत मतदारांची नावे असूनही मनपाच्या मतदार यादी मध्ये त्यांची नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्याबाबत प्राप्त अर्ज - ९, इतर अर्ज - ६ असे अशा एकूण १०२ हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत दि. २० नोव्हेंबर ते एक डिसेंबर २०२५ दरम्यान एकूण ३३७ हरकती व सूचना महापालिका निवडणूक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत.





## निधन वृत्त...

### रुथ कलबंडी



**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
वृंदावन पार्क आसरा येथील सोलापूर महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सिंग असोसिएशनचे माजी अध्यक्ष रुथ कलबंडी यांचे सोमवारी सकाळी साडेआठ वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मंगळवारी दुपारी चार वाजता होणार ख्रिश्चन स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होतील.

### निर्मला राऊळ



**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
येथील निर्मला विष्णुपंत राऊत ( वय ८६) यांचे रविवारी निधन झाले. त्यांच्यामागे दोन मुले, तीन मुली, पाच नातवंडे व नातसुना असा परिवार आहे. छायाचित्रकार मिलिंद राऊळ यांच्या त्या मातोश्री होत. सोमवारी सकाळी मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### शकुंतला भोसकर



**मंगळवेढा, दि. १ डिसेंबर-**
नागणेवाडी येथील श्रीमती शकुंतला अभिमन्यू भोसकर (वय ७२) यांचे सोमवार दि.१ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा,चार मुली,सुन,जावई,नातवंडे असा परिवार आहे. भोसकर इलेक्ट्रीकल्सचे चालक हरी भोसकर यांच्या त्या मातोश्री होत.मंगळवार२ डिसेंबर रोजी सकाळी ७ वा. बोराळे नाका स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार होतील.

# सत्तेच्या चाव्या मतदारराजा कोणाकडे देणार?

## अक्कलकोट, दुधनी, मैंदर्गीतील मतदानाकडे जिल्ह्याचे लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १ डिसेंबर-**
अक्कलकोट, मैंदर्गी, दूधनी नगरपालिकेसाठी मंगळवारी मतदान होणार असून तिन्ही नगरपालिकेत सत्तेच्या चाव्या मतदार राजा कोणाकडे देणार याचे गुढ मतदानयंत्रात बंद होणार आहे. येथील मतदान व निकालाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेली प्रचाराची रणधुमाळी थांबली आहे. अक्कलकोट, मैंदर्गी, दूधनी येथील मतदार नगरपालिकेतील सत्ता कोणाच्या ताब्यात देणार आहेत. याचा फैसला ३ डिसेंबर रोजी मतमोजणीनंतर होईल. या निवडणुकीमध्ये जाहीर सभा पदयात्रा त्याचबरोबर वैयक्तिक गाठीभेटी यावर उमेदवारांनी भर दिला. भाजपाकडून आमदार सचिन कल्याणशेट्टी तर शिवसेना शिंदे गटाकडून माजीमंत्री सिद्धाराम म्हेत्रे या दोन्ही मातब्बर नेत्यांनी नगराध्यक्षपद तसेच नगरसेवकपदाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी स्टार प्रचारक द्वारे मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला. प्रचारादरम्यान दोन्ही गटाने घेतलेल्या जाहीर




सभा तसेच आश्वासने चर्चेत राहिली. दूधनी नगराध्यक्षपदाच्या शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार प्रथमेश म्हेत्रे आणि भाजपाचे अतुल मेळकुंदे या दोन्ही उमेदवारांमध्येच अटीतटीची लढाई आहे. निवडणूक रिंगणात काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार रिंगणात आहेत. मैंदर्गी नगराध्यक्षपदाच्या स्थानिक गटाचे उमेदवार शिवाम्मा पोतेनवरू आणि भाजपाचे उमेदवार अंजली बाजारामठ या दोन्ही उमेदवारांमध्येच अटीतटीची लढाई आहे. अक्कलकोट नगरपरिषद नगराध्यक्षपदाचे भाजपाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी आणि शिवसेना शिंदे पक्षाकडून रईस टिनवला या दोन्ही उमेदवारांमध्येच अटीतटीची लढाई आहे. यामध्ये बाजी कोण मारणार आणि नगराध्यक्षपदाची खुर्ची अखेर कोण काबीज करणार हे आता अवघ्या काही तासामध्ये समोर येईल. विशेष म्हणजे नगराध्यक्षपदाची लढाई ही अतिशय चुरशीची ठरणार आहे. मात्र, निवडणूक रिंगणात असणारे काँग्रेस उमेदवार देखील चांगली मते घेण्याची शक्यता आहे. यामुळे मत विभागणी होणार आहे. या मत विभागणीचा फटका कोणत्या उमेदवाराला बसणार हे आता अवघ्या काही तासात समोर येईल. दरम्यान, प्रचाराच्या शेवटच्या दिवसांपर्यंत नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराबरोबरच उमेदवारांचीही अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठीची धडपड कायम राहिली आहे.



## शहरातील सिटी बससेवेसाठी संभाजी ब्रिगेडचे महापालिका अतिरिक्त आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ डिसेंबर-**
संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोलापूर शहरातील सिटी बस सेवा सुरु करण्यासाठी महापालिका जनता दरबारात अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांना निवेदन देण्यात आले. मागील बऱ्याच वर्षांपासून सोलापूर शहरात बऱ्याच ठिकाणी सिटी बसेस बंद आहेत. सिटी बसेस बंद असल्यामुळे रिक्षाने प्रवास करावा लागतो व रिक्षावाले सिटी बसच्या तुलनेत दुप्पट तिप्पट पैसे घेतात.

सिटी बस हा सर्वसामान्यांसाठी खूप मोठा आधार आहे. परंतु मागील बऱ्याच वर्षांपासून शहरात बऱ्याच ठिकाणी सिटी बस धावत नाहीत. यामुळे रिक्षावाले खूप मनमानी करतात. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेतात. विविध समस्यांमुळे संभाजी ब्रिगेडच्या वतीने शहरांमध्ये सर्व ठिकाणच्या सिटी बसेस सुरू कराव्यात अशी मागणी केली आहे.

याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महानगर प्रमुख शिरीष जगदाळे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मिनल दास, ॲड.गणेश कदम, महिला आघाडी जिल्हा कार्याध्यक्ष जयश्री जाधव, शहराध्यक्ष मनीषा कोळी, जिल्हा सचिव संजीवनी सलबत्ते, जिल्हा उपाध्यक्ष सुनिता घंटे, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, उद्योग आघाडी शहर अध्यक्ष संतोष सुरवसे, शहर व जिल्हा सचिव सिद्धाराम सावळे, शहर कार्याध्यक्ष सतीश वावरे, सुनंदा सूर्यवंशी, सुनिता कारंडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## शिष्यवृत्ती : ३ कोटी २२ लाखांचा निधी प्राप्त

**थेट विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होणार रक्कम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२३-२४ या सालात अर्ज दाखल केलेल्या २७ हजार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीपोटी ३ कोटी २२ लाख ८९ हजार रुपये निधी प्राप्त झाले आहेत. थेट विद्यार्थ्यांच्या खात्यावर हे पैसे जमा होणार आहेत. त्यामुळे शिष्यवृत्ती प्राप्त करुन घेण्याकामी विद्यार्थ्यांना चकरा मारावे लागणार नाही, असे सांगण्यात आले.

इयत्ता पाचवी ते सातवी व आठवी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, माध्यमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण व परीक्षा शुल्क, नववी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मेट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, अस्वच्छ व्यवसायामध्ये काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती अशा योजना राबविण्यात येतात.

सन २०२४-२०२५ या सालासाठी आतापर्यंत १२०५९ अर्ज दाखल करण्यात आले आहेत. २०२४-२५ या वर्षासाठी अर्ज स्वीकारणे सुरु असून मुदत शेवटच्या टप्प्यात आहे. जास्तीत जास्त अर्ज भरण्यासाठी जिल्हा परिषदेने मुख्याध्यापकांना सूचना केल्या आहेत.

विद्यार्थ्यांनी तातडीने अर्ज करावे, असे आवाहन समाजकल्याण विभागाकडून करण्यात आले आहे.

**लवकरात लवकर अर्ज भरावेत**

२०२४-२५ सालातील शिष्यवृत्ती योजनेसाठी समाजकल्याण विभागाकडून आतापर्यंत १२ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. जास्तीत जास्त अर्ज करण्यासाठी शाळांना, मुख्याध्यापकांना पत्रव्यवहार करुन सूचना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी लवकरात लवकर अर्ज भरावेत. मंजूर शिष्यवृत्ती रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार आहे, असे प्रभारी समाजकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी सांगितले.

**चकरा माराव्या लागणार नाहीत**

जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम थेट त्यांच्या खात्यावर पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयात चकरा मारावे लागणार नाहीत. शिवाय त्यांच्या खात्यावर पैसे जमा झाल्याने गरजेनुसार रक्कम काढता येणार आहे, असे मंद्रुप येथील लोकसेवा विद्यामंदिरचे प्राचार्य बसवराज कुमठेकर यांनी सांगितले.

## भटक्या कुत्र्यांबाबत आता विविध संस्थांना उपाययोजना करणे बंधनकारक

**सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिकेकडून संस्थांना निर्देश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
देशभरात भटक्या कुत्र्यांमुळे घडणाऱ्या अपघात व हल्ल्यांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमिवर तत्काळ व बंधनकारक उपाययोजना करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने जारी केले आहेत. या अनुषंगाने सोलापूर शहरात विविध संस्थांना आवश्यक उपाययोजना कराव्यात असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने सुओ-मोटू प्रकरण मध्ये दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी संपूर्ण देशभरातील संस्थांच्या परिसरात भटक्या कुत्र्यांमुळे घडणाऱ्या अपघात व हल्ल्यांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर तत्काळ व बंधनकारक उपाययोजना करण्याचे आदेश जारी केले आहेत. या अनुषंगाने महापालिका हद्दीतील सर्व शैक्षणिक संस्था शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे ई. (शासकीय व खाजगी), सर्व रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये सहित (शासकीय व खाजगी), सर्व क्रीडांगणे, क्रीडा संकुले, बसस्थानके व रेल्वे स्टेशन यांनी खालील उपाययोजनांची तात्काळ अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.

सर्वोच्च न्यायालयाने याबाबत मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. ती पुढील प्रमाणे आहेत.



संस्थेच्या संपूर्ण परिसराचे कुंपण/कंपाउंडिंग ८ आठवड्यांत पूर्ण करावे. संस्थेच्या परिसराभोवती सुरक्षित कुंपण/कंपाउंड भिंत बांधणे / गेट बसवून सर्व प्रवेशमार्गावर भटक्या प्राण्यांच्या प्रवेश नियंत्रणासाठी उपाय करावे. यासंदर्भात नोडल अधिकारी नियुक्त करावे. संस्थेच्या परिसरातील भटके कुत्रे रोखणे, स्वच्छता व सुरक्षितता यासाठी प्रत्येक संस्थेने एक नोडल अधिकारी नियुक्त करून त्याचे नाव व संपर्क क्रमांक प्रवेशद्वारावर प्रदर्शित करावे. सर्व क्रीडांगणे, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, बसस्थानके, रेल्वे स्थानक येथे संबंधित आस्थापना यांनी दिवस-रात्र सुरक्षा तपासणीसाठी सुरक्षारक्षक पथक नियुक्त करावे.

शैक्षणिक संस्थांना या संदर्भात जागृती कार्यक्रम घेणे अनिवार्य आहे. सर्व विद्यार्थ्यांसाठी/ कर्मचाऱ्यांसाठी भटक्या प्राण्यांचे वर्तन तसेच त्यांचे उपस्थितीत करावयाचे आचरण याबाबत जागृती करावी. कुत्र्याकडून चावा झाल्यास संबंधित व्यक्तीवर प्रथमोपचार करावे तसेच तातडीची वैद्यकीय संपर्क प्रक्रिया याबाबत सत्रे आयोजित करावीत.

या आदेशांचे पालन न केल्यास संबंधित अधिकारी, संस्था प्रमुख व व्यवस्थापनाविरुद्ध न्यायालयीन आदेशाचा अवमान कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. तरी सर्व संस्थानी वरील उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करण्याची खबरदारी घेण्यात यावी, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Alimuddin Basumiya Naikwadi** HAS BEEN CHANGED TO **Aleem**

Resi. - Plot No.314, Siddheshwar Nagar Bhag-4, New Jindagi Chowk, Solapur

**KINDLY NOTE**

**THE SAME. (41772 Dtd.27.11.2025)**

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, सुधाबेन पटेल यांच्या फायनल प्लॉट नं. १३२/१३अ/१/१/१/२ टी.पी.एस स्कीम, मजरेवाडी, जुळे सोलापूर, सोलापूर-४१३००४ येथील सोलापूर महानगरपालिका हद्दीतील " प्रपोज्ड रेजिडेंशियल व कमर्शियल प्रोजेक्ट या प्रकल्पास दिनांक २६/ ११/ २०२५ रोजीच्या पत्रान्वये इ. सी. आयडेन्टीफिकेशन नंबर EC25C3801MH5811681N व फाईल नं. SIA/MH/INFRA2/543415/2025 नमूद केले आहेत त्यानुसार पर्यावरण विषयक महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागकडून परवानगी मिळाली आहे. ही परवानगी पर्यावरण आघात मूल्यांकन अधिसूचना २००६ नुसार देण्यात आलेली आहे. सदर परवानगीची प्रत पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संकेतस्थळावर http://parivesh.nic.in वर उपलब्ध आहे.

**श्रीमती. सुधाबेन पटेल, सोलापूर-४१३००४**

## बायोक्लीन सिस्टिम इंडिया कंपनीला ५ वर्षासाठी काळ्या यादीत समाविष्ट करण्याचा निर्णय

**भोगाव येथील जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रकल्पातील निष्काळजीपणामुळे कारवाई**

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
भोगाव येथील जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रकल्पातील निष्काळजीपणाबाबत बायोक्लीन सिस्टिम इंडिया कंपनीला ५ वर्षांसाठी काळ्या यादीत समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सोलापूर महापालिकेमार्फत भोगाव येथील जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे कामकाज पूर्वी ''मे. बायोक्लीन सिस्टिम इंडिया प्रा. लि.'' यांचेकडे सोपविण्यात आले होते. मात्र प्रकल्प हस्तांतरणाच्या वेळी तसेच त्याआधीच्या काळात सदर मक्तेदाराकडून जैववैद्यकीय कचऱ्याची नियमानुसार प्रक्रिया न झाल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच महानगरपालिकेच्या तपासणीतून स्पष्ट झाले. महानगरपालिकेने दिलेल्या निर्देशांनुसार प्रकल्प परिसरात अंदाजे ४० ते ५० टन जैववैद्यकीय कचरा, व कार्बन सुमारे २५ टन, १५ टन, अशा स्वरूपातील धोकादायक कचऱ्यावर प्रक्रिया करणे ही जबाबदारी पूर्वीच्या मक्तेदार ''मे. बायोक्लीन लि.'' यांची होती.तथापि, महानगरपालिकेकडून दिलेल्या मुदतमंजुरीनंतरही तसेच त्यानंतर जारी केलेल्या नोटिसीनंतरही सदर कचरा प्रक्रियेशी संबंधित कोणतीही कार्यवाही मक्तेदाराने केली नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार महानगरपालिकेला नवीन प्रकल्प चालक यांच्यामार्फत हा संपूर्ण कचरा व्यवस्थितरीत्या नष्ट करावा लागला.

नवीन प्रकल्प चालक यांच्याकडून या विल्हेवाटीबाबत रु. ४२,५९,६९४/- इतक्या खर्चाची मागणी महानगरपालिकेकडे करण्यात आली असून हा संपूर्ण खर्च पूर्वीच्या मक्तेदारामुळे झालेला असल्याने ही रक्कम ''मे. बायोक्लीन लि.'' यांच्याकडून वसुल करणे आवश्यक होते. महानगरपालिकेतर्फे संबंधित कंपनीला आयुक्तांसमक्ष अनेक वेळा सुनावणीसाठी बोलावून या खर्चाची रक्कम जमा करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच १७ ऑक्टोंबर २०२५ रोजी आयुक्त डॉ. ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीतही त्यांना अंतिम सूचना दिली होती. परंतु संबंधित कंपनीने कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले. ही नुकसान भरपाई करण्यासाठी महाराष्ट्र महसूल संहितेनुसार वसुली करण्याची आणि तसेच सदर कंपनीला काही वर्षांसाठी काळ्या यादीत समाविष्ट करण्याची शिफारस करण्यात आली होती. सध्या सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्यामुळे ११ मार्च २०२२च्या गठीत उपसमितीमार्फत प्रस्ताव प्रशासकाकडे पाठविण्यात आला. त्यानुसार आयुक्तांच्या २१ नोव्हेंबरच्या मान्यतेने निर्णय घेण्यात आला.

**गंभीर जबाबदारीतील निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही**

याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनाही सूचित करण्यात येणार आहे.सोलापूर शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन अत्यंत गंभीर व महत्त्वाचा विषय आहे. अशा गंभीर जबाबदारीतील निष्काळजीपणा कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. पर्यावरण संरक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि कायद्याची अंमलबजावणी यात कुठलीही तडजोड न करता महानगरपालिका कठोर भूमिका पुढेही कायम ठेवेल, असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**IDFC FIRST Bank Limited**

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १२६६२०६२५ | मालमत्ता तारण कर्ज | १. अप्पासो किसन वायदंडे<br>२. कृष्णा शामराव वायदंडे | ०४.११.२०२५ | रुपये ६,९५,१३७.१२/- |

**मालमत्तेचा पत्ता:** मालमत्ता क्रमांक ६४/१ येथे नोंदणीकृत मालमत्तेचा/घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण जमीन क्षेत्रफळ १००० चौ.फूट, दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ तळमजला आहे = ७५०.०० चौ.फूट. एकूण बांधलेले क्षेत्रफळ = ७५०.०० चौ.फूट., गाव विटे येथे, पोस्ट येथे स्थित; बिटरगाव, तालुका: पंढरपूर जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि अशी सीमा आहे: - पूर्व: रस्ता पश्चिम: मालमत्ता क्रमांक ५२ उत्तर: मालमत्ता क्रमांक ६३ दक्षिण: मालमत्ता क्रमांक ६४ सर्जेराव वायदंडेचा भाग

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कार्यवाही सुरू करण्यास भाग पाडले जाईल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

**दिनांक : ०२/१२/२०२५**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# हिमाचलविरुद्ध महाराष्ट्राच्या ७ बाद ३५४ धावा

## १९ वर्षाखालील मुलांची कूच बिहार क्रिकेट स्पर्धा : सुआशिक जगताप, जशन सिंग, इंद्रजीत शिंदेंची तडफदार अर्धशतके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

येथील प्रसिद्ध इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर महाराष्ट्र विरुद्ध हिमाचल प्रदेश हा च्या १९ वर्षाखालील मुलांच्या कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील तिसऱ्या फेरीचा सामना सुरू झाला असून पहिल्या दिवशी महाराष्ट्राने ७ गडी गमावत ३५४ धावा केल्या आहेत.

सकाळी नाणेफेक जिंकल्यानंतर कर्णधार साहिल ने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय योग्य सिद्ध करताना ताबडतोब फलंदाजी करत पहिल्या ८ षटकात ६० धावा केल्या, ३१ चेंडूत ८ चौकारानिशी ४५ धावा करून साहिल पारख फलकावर ६१ धावा असताना बाद झाला, त्यानंतर इंद्रजीत शिंदे ने आल्यापासून फटकेबाजी करत तडफदार अर्धशतक झळकावले. जेवणाला खेळ थांबला तेंव्हा ३ बाद १६४ धावा (३१ षटके) करत महाराष्ट्राने पहिल्या सत्रात सामन्यावर पकड मिळवली. २० षटकात ९२ धावांची भागीदारी रचून इंद्रजीत बाद झाला आणि त्याच्या


अंश धीमन


इंद्रजीत शिंदे


जशन सिंग


सुआशिक जगताप

पाठोपाठ ईशान खोंड (०), समकित सुराणा (८) बाद झाले. हिमाचलच्या नौनिहाल ने लागोपाठ २ गडी बाद करत १ बाद १५० वरून ४ बाद १६४ अशी धावसंख्या केली. पण त्यानंतर सलामीवीर जशन सिंग याने यष्टिरक्षक साई परदेशी सोबत संयमी फलंदाजी करत ५८ धावांची भागीदारी रचली आणि आपले अर्धशतक देखील पूर्ण केले. साई ३४(५६) बाद झाल्यावर सुआशिक जगताप याने एक बाजू लावून धरत धावफलक हलता ठेवला. जशन सिंग ७० धावा काढून अंश धिमन चा बळी ठरला.


त्यानंतर अरकाम सय्यद हा खेळण्यास आला आणि जगताप हा खेळताना जायबंदी झाला व चहापानाला खेळ थांबला, तेंव्हा ६ बाद २५८ (५८.२ षटके) धावा झालेल्या.

चहापान नंतर खेळ सुरू झाला आणि तिसऱ्याच षटकात पुन्हा अंश धिमन ने अरकाम (६) ला बाद करत तिसरा बळी टिपला. शेवटच्या सत्रातील खेळात शुभम कदम सह सुआशिक जगतापने ९० धावांची भागीदारी करत आपले अर्धशतक झळकाविले. पहिल्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा शुभम कदम नाबाद ४३ व जगताप नाबाद ७१ धावा करून खेळपट्टीवर तग धरून आहेत.

हिमाचल प्रदेश संघाकडून अंश धीमन ने ६२/३ बळी तर नौनिहाल २ बळी व अक्षय वशिष्ठ, आर्यन ठाकूर यांनी प्रत्येकी १ बळी मिळवला आहे. सामन्याचा उद्या दुसरा दिवस असून सकाळच्या सत्रात महाराष्ट्र संघ पुढे आणखी किती धावा जोडतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

## महत्त्वाचे

### विश्व कनिष्ठ पुरुष हॉकी; जर्मनी उपांत्यपूर्व फेरीत



**मदुराई** : गतविजेत्या जर्मनीने सोमवारी आयर्लंडवर ५-१ असा विजय मिळवत २०२५ च्या एफआयएच कनिष्ठ पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले. दक्षिण आफ्रिकेने गट अ मध्ये दुसरे स्थान मिळविले. जर्मनीने सलग तिसरा विजय मिळवला आणि गट अ मध्ये अव्वल स्थान निश्चित केले. पहिल्या चरणात जर्मनीने जोनास वॉन गेरसमच्या गोलमुळे आघाडी घेतली. सर्वाधिक गोल नोंदविणारा बेन हॅसबॅक याने डी मध्ये जागा मिळवण्यासाठी बॅकलाइन ओलांडून उजवीकडून डावीकडे धाव घेतली, त्यानंतर वॉन गेरसमने पूर्ण स्ट्रेच मारून त्याला आत ढकलले. आयर्लण्डने आक्रमक खेळाचा पर्याय निवडला, परंतु जर्मनीवर जोरदार दबाव आणण्याचे काम असलेल्या त्यांच्या खेळाडूंना मदुराईमध्ये झालेल्या कडक उन्हाचा सामना करावा लागला.

### इटलीचे दिग्गज टेनिसपटू निकोला पिएट्रांजेली यांचे निधन

**रोम** : इटालियन टेनिस दिग्गज व दोन वेळा फ्रेंच ओपन विजेती निकोला पिएट्रांजेली यांचे निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत पिएट्रांजेली यांनी एकूण ४८ विजेतेपदे जिंकलीत. त्यांनी डेव्हिस चषकांत सर्वोत्तम कामगिरी केली असून तिथे त्यांनी विक्रमी १६४ सामने खेळले आणि १२० सामने जिंकले. ही कामगिरी अजूनही अतुलनीय आहे. १९६० मध्ये फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत ब्रेक दरम्यान, निकोला पिएट्रांजेलीने लॉकर रूममध्ये आपले बूट काढले. त्यांचे मोजे रक्ताने लाल झाले होते. पहिल्या तीन सेटमध्ये, चिलीचा लुईस निकोला पिएट्रांजेलीला ड्रॉप शॉट्स आणि लॉब्सने त्रास देत होता, त्यामुळे निकोलाला त्याच्या पायाची त्वचा सोलून येईपर्यंत पुढे आणि मागे धावावे लागले होते. तरीही, त्याने चिवट झुंज देत आपला दुसरा रोलॅण्ड गॅरोस मुकुट जिंकला.



### २०३० राष्ट्रकुल स्पर्धेत नेमबाजीचा समावेश

**जयपूर** : २०३० मध्ये भारत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आयोजित करेल तेव्हा स्पर्धेत नेमबाजीचा समावेश केला जाईल आणि देशाच्या एकूण पदकतालिकेत लक्षणीय भर पडेल, अशी आशा ऑलिम्पिकपटू सिफ्ट कौर समरा हिने व्यक्त केली. २०२२ बर्मिंगम व २०२६ ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धांसाठी पदक स्पर्धा म्हणून नेमबाजी बंद करण्यात आली होती, परंतु यजमान म्हणून भारतीय नेमबाजांना त्यांची प्रतिभा दाखवण्याची आणि त्यांच्या घरच्या प्रेक्षकांसमोर पदकांचा एक थैली जिंकण्याची संधी मिळेल. भारत राष्ट्रकुल स्पर्धा आयोजित करत आहे याचा मला आनंद आहे आणि मला खात्री आहे की नेमबाजीचाही एक क्रीडा प्रकार म्हणून समावेश केला जाईल. आपल्या राष्ट्रीय नेमबाजांसाठी चमकण्याची आणि घरी पदके आणण्याची ही एक उत्तम संधी आहे, अशी आशा तिने व्यक्त केली. या स्पर्धेमुळे क्रीडा पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होईल व त्यामुळे इच्छुक खेळाडूंना शिकणे आणि प्रशिक्षण घेणे सोपे होईल,'असेही ' सिफ्ट कौर म्हणाली.

### शालेय महाराष्ट्र क्रिकेट संघात आदित्य माने

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**



राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी १४ वर्षाखालील महाराष्ट्र शालेय क्रिकेट संघात आदित्य ज्ञानेश्वर माने याची निवड झाली. नाशिक येथे झालेल्या राज्य क्रिकेट स्पर्धेतील निवड चाचणीतून त्याची निवड झाली. पुणे विभागाकडून आदित्यने अमरावती विभागाविरुद्ध ५७ चेंडूमध्ये ८ चौकारासह ७२ धावा काढल्या. या कामगिरीवर त्याची निवड झाली. आदित्यला ट्रिनिटी स्कूल येवलेवाडी पुणे येथील प्रशिक्षक निलेश गोलगिरे व येथील सेंट जोसेफ स्कूलचे क्रीडा शिक्षक सनी भोसले यांचे मागदर्शन लाभले.

# गिलचे तंदुरुस्ती मूल्यांकन बंगळुरुत

◆ **नवी दिल्ली, १ डिसेंबर**

भारतीय टी-२० संघाचा उपकर्णधार शुभमन गिल सोमवारी बंगळुरूच्या सेंटर ऑफ एक्सलन्स येथे आपल्या अनिवार्य तंदुरुस्ती मूल्यांकन चाचणीसाठी उपस्थित झाला असेल. या चाचणीच्या माध्यमातून गिल ९ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी आपले पुनरागमन निश्चित करेल.

कोलकाता येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी फलंदाजी करताना गिलच्या मानेला दुखापत झाली होती आणि तेव्हापासून तो दुसरी कसोटी आणि चालू एकदिवसीय मालिका खेळू शकला नाही.

अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समिती सेंटर ऑफ एक्सलन्सच्या क्रीडा विज्ञान चमूकडून गिलच्या तंदुरुस्ती अहवालाची प्रतीक्षा असेल.




गिलला इंजेक्शन देण्यात आले आणि २१ दिवस विश्रांती आणि पुनर्वसनाचा सल्ला देण्यात आला, यात दुखापतग्रस्त भागाच्या स्नायूंना बळकटी देण्यासाठी विशिष्ट व्यायामांचा समावेश होता. अर्थात, क्रीडा विज्ञान संघ कौशल्य प्रशिक्षण सुरू करण्यापूर्वी त्याच्या सर्व अनिवार्य तंदुरुस्ती चाचण्या करेल.

क्रीडा विज्ञान चमू कौशल्य प्रशिक्षणादरम्यान त्याच्या हालचालींचे मूल्यांकन करत नाही आणि फलंदाजी करताना त्याला शून्य अस्वस्थता येत आहे की नाही हे पाहत नाही तोपर्यंत काहीही सांगता येणार नाही, असे या घडामोडींशी परिचित असलेल्या बीसीसीआयच्या एका सूत्राने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

सध्या, गिलच्या दक्षिण आफ्रिका टी-२० मालिकेसाठी परतण्याची शक्यता पन्नास-पन्नास टक्के आहे असे दिसते.

(वृत्तसंस्था)

### हार्दिक पूर्णपणे तंदुरुस्त



दरम्यान, भारतीय चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे, कारण हार्दिक पांड्याला टी-२० स्वरूपात परतण्याची परवानगी मिळाली आहे आणि तो मंगळवारी हैदराबादमध्ये सय्यद मुश्ताक अली चषकांत पंजाबविरुद्ध जवळजवळ अडीच महिन्यांत पहिला सामना खेळणार आहे. संघ जाहीर होण्यापूर्वी तो त्याची एकूण तंदुरुस्ती तपासण्यासाठी राष्ट्रीय निवडकर्ता प्रज्ञान ओझासह दोन्ही सामन्यांमध्ये उपस्थित राहणार आहे. २१ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत हार्दिकने सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) सोडलेच नाही. त्याने संपूर्ण पुनर्वसन आणि रिटर्न टू प्ले तपासणी केली. आतापर्यंत, त्याला टी-२० मध्ये फलंदाजी आणि गोलंदाजी करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तो पंजाब सामन्यासाठी बडोदा संघाशी आधीच जोडलेला आहे. तो ४ डिसेंबर रोजी गुजरात विरुद्ध खेळेल आणि जर भारतीय संघ व्यवस्थापनाने त्याला लवकर बोलावले नाही, तर तो ६ डिसेंबर रोजी हरयाणा विरुद्ध खेळण्याची योजना आखत आहे, असे एका सूत्राने सांगितले.

# जलतरणपटू प्रत्याशा रे हिचा प्रेरणादायी उदय

## वॉटर थेरपी ते खेलो इंडिया विद्यापीठ गेम्सपर्यंतचा थरारक प्रवास

◆ **जयपूर, १ डिसेंबर**

प्रत्याशा रे, आरोग्यविषयक गुंतागुंतींशी झुंजणाऱ्या या मुलीसाठी वॉटर थेरपी म्हणून सुरू झालेली ही कारकीर्द पदकांनी समृद्ध झाली आहे. येथे आयोजित खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत ती भारतातील सर्वात हुशार जलतरणपटूंपैकी एक म्हणून उदयास आली आहे.

खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रत्याशा रे हिने ३ सुवर्ण, १ रौप्य आणि १ कांस्यपदक जिंकले आहे.

या स्पर्धेच्या चार आवृत्त्यांमध्ये प्रत्याशाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट निकालांसह - नऊ सुवर्ण, सात रौप्य आणि दोन कांस्यपदकांसह एकूण १८ पदके मिळवली आहेत.

प्रत्युशाचा इथपर्यंतचा जीवनप्रवास अतिशय भावनाशील आणि प्रेरणादायी आहे. प्रत्याशा रे बालपणापासून आजारी असायची. तिच्या पालकांना प्रत्याशाची तब्येत सतत चिंतेचा विषय होता. प्रत्याशा तीन वर्षांची झाली तेव्हा तिचे पालक तिच्या आरोग्य समस्यंचे निराकरण करण्यासाठी अनेक रुग्णालयात गेले होते. प्रत्याशा जन्मतःच निरोगी जन्मली होती. पण तिला संसर्गापासून वाचवण्यासाठी अँटीबायोटिक्स देण्यात आले होते जेव्हा ती केवळ २१ दिवसांची होती आणि त्या औषधांचा प्रतिकूल परिणाम झाला. त्यानंतर तिचा नैसर्गिक शारीरिक



विकास थांबला. आमची चिंता वाढली. आम्हाला निरोगी मूल हवे होते, पण सर्व काही आमच्या विरुद्ध जात होत्या, असे प्रत्याशाची आई चारुश्री यांनी सांगितले.

तेव्हाच चारुश्री यांनी वॉटर थेरपीवरील एक लेख वाचला आणि तिने ते वापरून पाहण्याचा निर्णय घेतला. सतत रुग्णालयात जाण्याने कंटाळून मी तो धोका पत्करण्याचा निर्णय घेतला.

मी माझ्या तीन वर्षांच्या मुलीला संबलपूरमधील एका स्विमिंग पूलमध्ये घेऊन जाऊ लागली. त्या वयात प्रवेश शक्य नव्हता, म्हणून मी स्वतः तिच्यासोबत पाण्यात पोहू लागली. हळूहळू पाण्याने तिची भीती खेळात बदलली. दोन महिन्यांतच, रुग्णालयात जाण्याचे प्रमाण कमी झाले आणि तीन महिन्यांनंतर तिची तब्येत स्थिर झाली. पाण्यामुळे तिला आराम मिळाला. तिला पाण्यात राहण्याचा आनंद मिळू लागला आणि तिला जाणवलं की ते तिला रुग्णालयांपासून दूर ठेवत आहे. पुढच्या दोन ते तीन वर्षांत तिने तिचे पोहण्याचे अंतर सहजपणे २५ मीटरवरून ५० मीटरपर्यंत वाढवले, असे प्रत्याशाच्या आईने सांगितले.

संबलपूरमधील एका स्थानिक प्रशिक्षकाने माझी क्षमता ओळखली आणि मला स्पर्धात्मक पोहण्याचा सल्ला दिला, असे प्रत्याशाने सांगितले. आठ वर्षांची असताना, प्रत्याशाने रंगनिधी सेठ यांच्या नेतृत्वाखाली झारसा खेतान जलतरण संकुलात व्यावसायिक प्रशिक्षण सुरू केले.

या दरम्यानच्या काळात ओडिशा सरकारमध्ये काम करणारे प्रत्याशाचे वडील रजत कुमार रे यांची भुवनेश्वरला बदली झाली. त्यानंतर ती कलिंगमध्ये सराव करू लागली. अभ्यास आणि खेळ संतुलित करत, मी आता उत्कल विद्यापीठातून दुहेरी पदव्युत्तर पदवी घेत आहे, असे प्रत्याशा म्हणाली.

प्रत्याशा आता जपानमधील नागोया येथे २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघात स्थान मिळवण्याचे ध्येय ठेवत आहे.

(वृत्तसंस्था)

# हरेंद्र सिंग यांचा राजीनामा



**नवी दिल्ली, १ डिसेंबर -**

भारतीय महिला हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक हरेंद्र सिंग यांनी सोमवारी 'वैयक्तिक कारणे' देऊन तात्काळ प्रभावाने आपल्या पदाचा राजीनामा दिला. हरेंद्र यांनी हॉकी इंडियाला एक ई-मेल पाठवून सर्वोच्च संस्थेला कळवले की, ते तात्काळ प्रभावाने राजीनामा देत आहेत. २०२१ मध्ये टोकियो ऑलिम्पिकमध्ये चौथ्या स्थानावर राहिलेल्या संघाचे मुख्य प्रशिक्षक असलेले नेदरलॅण्डचे रणनीतीज्ञ शोएर्ड मारिज्ने मुख्य प्रशिक्षक म्हणून परत येऊ शकतात, असे सूत्रांनी सांगितले. ऑगस्ट २०२१ मध्ये महिला हॉकी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा मारिजने दिला होता. यापूर्वी अमेरिकेच्या पुरुष हॉकी संघाचे प्रशिक्षक असलेले हरेंद्र यांनी एप्रिल २०२४ मध्ये मुख्य प्रशिक्षकपद स्वीकारले होते. त्यापूर्वी त्यांनी २०१६ मध्ये लखनौ येथे झालेल्या विश्वचषक जिंकणाऱ्या भारताच्या कनिष्ठ पुरुष संघाचे प्रशिक्षकपद भूषवले होते.

### गावस्करने केले कोहलीचे कौतुक

**नवी दिल्ली** : रांची येथे झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात विजयी शतक ठोकल्यानंतर भारताचे दिग्गज फलंदाज सुनील गावस्करने विराट कोहलीच्या शिस्तबद्ध आणि गणनात्मक दृष्टिकोनाचे कौतुक केले आहे. रविवारी कोहलीने केवळ १२० चेंडूत १३५ धावा फटकावल्या तो स्वतःचा खेळ इतर कोणापेक्षाही चांगल्या प्रकारे समजतो. कोहलीला त्याचा खेळ आतून कळतो, असे गावस्कर म्हणाले.

# प्रशिक्षक पाठीशी असल्यास यश नक्की मिळतेच

## भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाची उपकर्णधार गंगा कदम हिचा विश्वास; सोलापूर विद्यापीठाच्या वतीने गंगा व तिचे प्रशिक्षक राजू शेळके यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

जेव्हा आपल्या पाठीशी एखादा प्रशिक्षक असतो, तेव्हा आपण कधीच हरु शकत नाही. माझे प्रशिक्षक राजू शेळके यांनी माझ्यासाठी कष्ट घेतल्यामुळे मी आंतरराष्ट्रीय पातळीवर यशस्वी होऊ शकले, असे मत भारतीय दिव्यांग टी-२० क्रिकेट संघाची उपकर्णधार गंगा संभाजी कदम यांनी व्यक्त केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आठ खेळांच्या सराव शिबिराच्या सांगता समारंभप्रसंगी त्या बोलत होत्या. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. प्रकाश महानवर होते. याप्रसंगी गंगाचे प्रशिक्षक राजू शिवाजी शेळके, प्र-कुलगुरु प्रा. लक्ष्मीकांत बसवराज दामा, परिक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे आदी उपस्थित होते. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अतुल लकडे यांनी प्रास्ताविक केले. क्रीडा समन्वयक प्रा. बाळासाहेब वाघचवरे यांनी सूत्रसंचालन केले. शिवानंद मैलारी यांनी आभार मानले.


सोलापूर : महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी जाणारा सोलापूर विद्यापीठाचा चमू क्रिकेटपटू गंगा कदम, प्रशिक्षक राजू शेळके यांच्या समवेत.


सोलापूर : गंगा कदम हिचा सत्कार करताना कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर व मान्यावर

महामहिम राज्यपाल कार्यालय आयोजित महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा जगतातील एक महत्त्वपूर्ण असलेल्या २७व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे आठ खेळातील पुरुष व महिला असे १६ संघ नांदेड येथे सहभागी होणार आहेत. यावर्षी या स्पर्धे चे आयोजन स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे ४ ते ८ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले आहे. सोलापूर विद्यापीठाकडून या महोत्सवासाठी खेळाडू, प्रशिक्षक आणि व्यवस्थापकांचा असा एकुण १८७ जणांचा मोठा चमू क्रीडा समन्वयक प्रा. बाळासाहेब वाघचवरे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेडकडे जात आहे. यात १६२ खेळाडू (पुरुष व महिला), २४ संघ प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक आणि १ स्पर्धा समन्वयक यांचा समावेश आहे. या स्पर्धेत ॲथलेटिक्स, बास्केटबॉल, कबड्डी, व्हॉलीबॉल, खो-खो, टेबल टेनिस, बॅडमिंटन व बुद्धिबळ या आठ क्रीडा प्रकारांचा समावेश आहे.

### गंगाने प्रशिक्षकाचा बहुमान स्वीकारावा!

आज गंगा कदम यांनी संकटावर मात करत मोठे शौर्य गाजवले आहे. याचा समस्त सोलापूरकरांना अभिमान असून त्यामुळे सोलापूरची मान उंचावली आहे. अशक्य गोष्ट शक्य करून त्यांनी मोठे यश संपादन करून एक आदर्श निर्माण केला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील विद्यार्थी खेळाडूंना त्यांनी प्रशिक्षण द्यावे व प्रशिक्षक म्हणून विद्यापीठाचा बहुमान स्वीकारण्याची विनंती कुलगुरू प्रा. महानवर यांनी यावेळी त्यांना केली.

### विद्यापीठाचे संघ यंदाही कामगिरी सुधारतील



गतवर्षी विद्यापीठाने मैदानी स्पर्धेत २ सुवर्ण, ३ रौप्य व २ कांस्य अशी ७ पदकांची कमाई केली होती. यात नीरज महानवर (भालाफेक), हर्ष राऊत (१००व २०० मी. धावणे), प्रणिता जाधवर (तिहेरी उडी), सुजाता बाबर(उंच उडी), बबलू चव्हाण (५ किमी धावणे) यांचा समावेश होता. यंदाही मैदानी स्पर्धेतील कामगिरीत सुधारेल. तसेच सांघिक स्पर्धेतही विद्यापीठास पदके मिळेल अशी आशा आहे.

**-प्रा. बाळासाहेब वाघचवरे, स्पर्धा क्रीडा समन्वयक**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर

# तरुण भारत

आयोजित

यादी क्रमांक ७

# "मला हवंय आदर्श सोलापूर"

## या विषयावरील निबंध स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांची यादी...

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रेरणा लोंढे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| २ | पूर्वा मोळकेरी | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ३ | दया कोळेकर | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ४ | अनमोल सवडे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ५ | श्रेयस पाटील | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ६ | महंमद सय्यद | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ७ | पौर्णिमा पाटील | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ८ | आचल भवर | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ९ | ऐश्वर्या आरबेल | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १० | जानवी माने | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ११ | श्रीदेवी राठोड | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १२ | निरंजन देडे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १३ | अथर्व उंबरदंद | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४ | मानवी बुरटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १५ | श्रेया हंचाटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १६ | परिहा पांढरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १७ | प्रगती पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १८ | सानिका सपाटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १९ | सर्वेश अष्टगी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २० | श्लोक देशमाने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २१ | विराज काशिद | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २२ | पराग कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २३ | विहान कुमार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २४ | अरव लहाने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २५ | चयन संकलेचा | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| २६ | आरव तोडकरी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २७ | रजत वानकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २८ | अश्विका जाधव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २९ | स्वरनिका कमटम | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३० | आरोही कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३१ | उर्वी कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३२ | आदर्शिनी लिंबोले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३३ | मैनवी मोगीली | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३४ | आशी शहा | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३५ | आराध्या सुरेकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३६ | गोविंदसिंग दोडमनी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३७ | ओम गुजराथी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३८ | आर्यन गुतल | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३९ | अमान जमादार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४० | अद्वीक लोंढे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४१ | प्रितम मोरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४२ | अलिया काझी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४३ | विश्वराज पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४४ | विहान दोशी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४५ | शौर्य थोरात | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४६ | विस्मया कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४७ | अनत शेख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४८ | अस्मि हुंडेकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४९ | जिजा पाटकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५० | झिया शेख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| ५१ | आर्यन सलगरकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५२ | फैझ मोमिन | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५३ | स्वानंद तपकिरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५४ | समर्थ जोशी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५५ | सृष्टी अन्सारी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५६ | सोनम अन्सारी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५७ | शिवानी अर्जुन | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५८ | अदिती बेळ्ळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५९ | प्रणवी चेंडके | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६० | पवित्रा गायकवाड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६१ | स्मिता गौर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६२ | स्वराली होटकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६३ | धनश्री जाधव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६४ | शर्वरी जाधव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६५ | अलिझा शेख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६६ | हुमेरा शेख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६७ | फैजाबानो वाडिकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६८ | विराजसिंग चव्हान | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६९ | तुषार धायफुले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७० | रोशन फुले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७१ | प्रतिक जमादार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७२ | जय कोळी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७३ | राजवीर माने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७४ | विघ्नेश्वर माने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७५ | प्रसाद पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | |
|---|---|---|
| ७६ | असद सय्यद | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७७ | श्रेयश उदानशीव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७८ | मधुरा बासुतकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७९ | समृद्धी भोसले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८० | अन्वी गांगजी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८१ | ममता गरदास | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८२ | काव्या जाधव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८३ | जान्हवी कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८४ | आकांक्षा शिवशरण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८५ | अप्रिता गाडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८६ | अक्षरा मोरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८७ | अंशिया सादिक | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८८ | शिवाजी काळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८९ | आरोह जावळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९० | स्वरा नाईकनिंबाळकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९१ | आरुषी शिंगे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९२ | हुमैरा बागवान | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९३ | अफिफा पठाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९४ | माही शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९५ | प्रिन्स चव्हाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९६ | शौर्य देशमुख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९७ | सारंग देशपांडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९८ | समर्थ नरोटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९९ | श्रावण सारसांबी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०० | ईशान सावले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १०१ | रूद्रप्रताप मोसलगी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०२ | आरव जावळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०३ | रूद्रा शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०४ | पियुष शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०५ | श्रुती अंकुशराव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०६ | रुतुजा बहालसकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०७ | प्रार्थना चव्हाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०८ | अदिती हताले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०९ | अंगारिका कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११० | अलमस पठाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १११ | मिहीर राजे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११२ | इब्राहिम बिजापूरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११३ | प्रज्योत तिर्थकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११४ | मंथन उपळकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११५ | श्रेया केंद्रे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११६ | ईश्वरी माने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११७ | वर्षा मंगलुरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११८ | क्षिषा पेंटर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११९ | वैष्णवी पन्हाळकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२० | शिवानी सहानी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२१ | प्रतिज्ञा स्वामी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२२ | शौर्य कासे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२३ | श्रावणी क्षीरसागर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२४ | फलकनाझ मुजावर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२५ | वैष्णवी सोनार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२६ | विराज घेरडी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२७ | श्रीपाद पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२८ | संकेत राठोड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२९ | प्रणव रेवे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३० | रिशा बेग | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३१ | वैष्णवी दण्णे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३२ | आकांक्षा काळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३३ | श्रेयांशी कोळी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३४ | स्वरा कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३५ | श्रावणी म्हमाणे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १३६ | नितीशा शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३७ | अफिया पटेल | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३८ | ईशिता पवार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३९ | रूजुता विंचुरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४० | हर्षवर्धन बाबे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४१ | हर्षद बबलेश्वर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४२ | युवराज बबलेश्वर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४३ | ओम गुडमल | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४४ | युग लोहार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४५ | भगवंत नरोटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४६ | अप्रित राठोड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४७ | हर्ष साखरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४८ | ओंकार तेलंग | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४९ | कौस्तुभ दंतकाळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १५० | मानव पटोले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १५१ | स्नेहा ढगे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५२ | आरोही सुरवसे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५३ | सिद्धी शिलवंत | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५४ | ओवी आयितवाडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५५ | साईदुर्वा सरदार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५६ | श्रावणी निंबर्गी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५७ | अन्वी सांगले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५८ | अनन्या शिंपी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५९ | वृषभ पवार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६० | भार्गवी जमगोंडी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६१ | रितीका राठोड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६२ | आर्वी राका | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६३ | स्वरा बसाटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६४ | आराध्या अभिवंत | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६५ | आदित्य बोराडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६६ | उन्नती चाबुकस्वार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६७ | आरोही करंडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६८ | अनिरूद्ध नादर्गी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६९ | राजनंदीनी पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७० | सानवी रेबन | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १७१ | मधुरा जोशी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७२ | मेधा पुजारी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७३ | अनुश्री भट्टड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७४ | आरोही पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७५ | श्रावणी वाळके | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १७६ | राजश्री बोराळे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १७७ | वैभवी बिराजदार | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १७८ | शिवराज गयाळे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १७९ | विवेक आडके | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८० | अजबदी काटे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८१ | अन्नपूर्णा हेळकर | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८२ | ज्ञानेश्वरी बिराजदार | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८३ | साक्षी चिट्टे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८४ | कोमल गुडे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८५ | वैष्णवी गरड | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८६ | सानिका लामकाने | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८७ | सक्षम मैदर्गीकर | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८८ | रुद्र सुरवसे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८९ | अनुप थोरात | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९० | संचिती कोळी | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९१ | राजनंदिनी चटके | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९२ | श्रावणी चव्हाण | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९३ | तनया सोनवणे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९४ | स्वरांजली शिंदे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९५ | रिद्धी राऊत | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| १९६ | पार्वी बिराजदार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| १९७ | अरहम पिरजादे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| १९८ | आलोक परसगेंड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| १९९ | तेजस राठोड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०० | पार्वी बिराजदार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०१ | अरहम पिरझादे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०२ | आलोक परसगोंड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०३ | प्रांजल गालंडे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०४ | श्रेयश यैवाले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०५ | आराध्या कलदिप | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| २०६ | नेहा कडबे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०७ | श्रृतीका चौगुले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०८ | प्रतीक थंबाके | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०९ | अवनी बागलकोट | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१० | अनन्या मोरे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २११ | शौर्य माने | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१२ | सियोना सबाले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१३ | अर्णव दहातोंडे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१४ | आदर्श गायकवाड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१५ | तन्वी बिराजदार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१६ | अनुजा करे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१७ | एकांश कांबळे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१८ | समर्थ बिराजदार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१९ | ईशान्वी नरके | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२० | यशस्विनी माने | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२१ | अथर्व म्हमाणे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२२ | श्रावणी सुतार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२३ | तेजस्विनी सुतार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२४ | तेजस म्हेत्रे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२५ | मिताली पांढरे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२६ | रितेश पुजारी | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२७ | संगमेश गुद्दड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२८ | राजवर्धिनी चव्हाण | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२९ | तन्मय बुदाले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३० | वामन कुलकर्णी | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३१ | विराज राठोड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३२ | दिव्या परसगोंड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३३ | तपस्या गोदीसेला | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३४ | हुझेता शेख | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३५ | संस्कृती चव्हाण | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३६ | अर्पिता शेटे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३७ | अस्मिता बनसोडे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३८ | श्रावणी साबले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३९ | दिव्या शिंदे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २४० | हुरेन पठाण | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |

## महत्वाचे...

### अक्कलकोट शहरात ४४ मतदान केंद्रांवर मतदार मतदानाचा हक्क बजावणार

**अक्कलकोट, दि. १ डिसेंबर-**

अक्कलकोट नगरपरिषद निवडणूकीची तयारी पूर्ण झाली असून अक्कलकोट शहरात ४४ मतदान केंद्रावर लोक मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारांनी निर्भयपणे जास्तीत जास्त मतदान करावे असे आवाहन मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी केले. आदर्श गुलाबी मतदान केंद्र श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशाला येथे आहे. ४४ मतदान पथके असून प्रत्येकी ५ मतदान कर्मचारी आणि एक पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या शिवाय १६ राखीव पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी प्रांत अधिकारी सुमीत शिंदे, सहायक निवडणूक अधिकारी नेहा कंठे, निवडणूक निरीक्षक अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे (कोल्हापूर) मुख्याधिकारी रमाकांत डाके, अधिक्षक शैलेश बिराजदार निवडणूकीवर लक्ष ठेवून आहेत. मतदान केंद्राच्या आत आणि बाहेर मिळून ७६ पोलीस तर ७४ होमगार्ड तसेच पोलिसांचे फिरते पथक राहणार आहे.सहा पोलीस अधिकारी आहेत यात पोलीस उपविभागीय अधिकारी विलास यामावार, पोलीस निरीक्षक दीपक भिताडे ,सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागाव, सहाय्यक पोलीस अधिकारी सतीश रणवरे, पांडुरंग पवार, रेवणसिद्ध काळे, गोपनीय शाखेचे शरद चव्हाण यांचा समावेश आहे. अक्कलकोट शहरात सहा पोलिस अधिकारी, ७८ पोलिस अंमलदार, ७४0 होम गार्ड,१ एसआरपीचे प्लॉटुन (३0 कर्मचारी) असा तगडा बंदोबस्त आहे . नागरिकांनी निर्भय पणे मतदान करावे असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर यांनी केले. आहे शहरात सर्वत्र पोलीस आणि होमगार्ड बंदोबस्त असून शहरात येणाऱ्या सर्व प्रवेश मार्गावर तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.

### विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिवापर टाळून उज्ज्वल भविष्य घडवावे - पो.नि. भिताडे

**अक्कलकोट, दि. १ डिसेंबर-**

विद्यार्थ्यांनी समाज माध्यमावरील रील बघण्यात वेळ घालवू नये. मोबाईलचा आणि समाज माध्यमाचा वापर आपल्या अभ्यासासाठी केल्यास आपले भविष्य उज्वल होऊ शकते असे प्रतिपादन येथील पोलिस निरीक्षक दिपक भिताडे यांनी केले. येथील मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूल येथे भारतीय संविधान दिन व शहीद दिनानिमित्तच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आर .एस. पडवळकर होते. यावेळी एनसीसीचे हवालदार विक्रमजितसिंग, हवालदार अजित जाधव, जेष्ठ शिक्षक वाय. पी.कबाडे, एनसीसी प्रमुख एस.एस. जवळकोटे उपस्थित होते.



प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व शहीद दिनानिमित २६/११ तील शहिदांचे प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी संविधान प्रस्ताविकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. एन. सी सी प्रमुख एस.एस. जवळकोटे यांनी भारतीय संविधान दिनाबाबत अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. संविधान दिनाचे औचित्य साधून प्रशालेत रांगोळी स्पर्धा, सेल्फी पॉईंट, भाषण, प्रश्नोउत्तरे आदी विविध कार्यक्रम घेतले. विभाग प्रमुख जे. एस.बगले यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन एम. एम. साळुंखे यांनी केले. एन.एम.तांबोळी यांनी आभार मानले.

# पंढरपुरात प्रचाराच्या तोफा थंडावल्या; मतदारांना प्रतिक्षा 'लक्ष्मी'दर्शनाची?

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.१ डिसेंबर -**

पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणुकीत माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली शहर विकास आघाडीसह भाजपा, भगीरथ भालके यांच्या नेतृत्वाखाली तीर्थक्षेत्र विकास आघाडी आणि आमदार अभिजीत पाटील यांच्या विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी यांच्यामध्ये निवडणुकीचा सामना होत आहे. अपक्षांनी देखील दोन, चार प्रभागातील निवडणूक प्रतिष्ठेची केलेली आहे. रविवारी रात्री १० वाजता जाहीर प्रचाराची सांगता झाली. मंगळवार, दि.२ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. आता प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून मतदारांना 'लक्ष्मी'दर्शनाची प्रतिक्षा लागून राहिल्याचे बोलले जात आहे.

मतदानाच्या पूर्वसंध्येला आणि मतदानादिवशी दिवसभर निवडणूकीच्या आखाड्यातील सर्व पक्ष, स्थानिक आघाड्यांकडून होणाऱ्या लक्ष्मी दर्शनाच्या देखील प्रतिक्षेत मतदार बांधव ऐन थंडीत रात्री उशिरा पर्यंत आपल्या घराची दारे उघडे ठेवून 'लक्ष्मी' येण्याच्या प्रतिक्षेत जागता पहारा देत असल्याचे निदर्शनास आले. प्रचारादरम्यान आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. सुरुवातीला वेगवेगळ्या मुद्यांवरुन सुरु असलेला प्रचार शेवटच्या टप्प्यात गुद्यांवर, एकमेकांच्या कार्यकर्त्यांना उचलण्यापर्यंत पोहचल्याचे दिसून आले. तरी पण, प्रचार कालावधीत कोणताही अनुचित प्रकार व अप्रिय घटना न घडता शांततेत प्रचार करण्यात आला.

**पालकमंत्र्यांची प्रतिष्ठा लागली पणाला**

पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीमध्ये भाजपने चांगलेच लक्ष केंद्रित केले. सोलापूर जिल्ह्यात भाजपची ताकद वाढविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे नगरपरिषद निवडणुकीची जबाबदारी दिली आहे. पालकमंत्री गोरे गेल्या महिनाभरापासून निवडणुकीच्या नियोजनासाठी भाजपासह मित्रपक्ष, स्थानिक आघाड्यांची यंत्रणा कामाला लावली. त्यामुळे पालकमंत्र्यांची प्रतिष्ठा लागली असल्याचे बोलले जात आहे.





**भाजपाकडून नियोजनबध्द आखणी**

नगरपरिषदेची निवडणूक लढविण्यासाठी भाजपाकडे इच्छुकांची संख्या मोठी होती. पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी नियोजनबध्द आखणी करुन इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या. नगराध्यक्षपदाची उमेदवारी शेवटच्या क्षणी शामल शिरसट यांना बहाल करण्यात आली. १८ प्रभागातून एकूण ३७ उमेदवार सदस्य पदासाठी रिंगणात उतरविण्यात आले. नेतेमंडळींच्या कार्यपध्दतीवर जुने व निष्ठावंत कार्यकर्त्यांतून टीकाटिप्पणी करण्यात आली.

**पाचशे कोटींच्या विकासाचा दावा**

भाजपकडून जबाबदारी माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या खाद्यांवर होती. प्रचार सभेमध्ये त्यांनी गेल्या २५ वर्षात पंढरपूर शहरामध्ये पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडीने केलेल्या कामाचा लेखाजोखा त्यांनी मांडला. सध्या ५00 कोटीची कामे सुरु असल्याचा दावाही त्यांनी केला. ही कामे झाली नसल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला.

**आ.पाटील यांचा कारखाना कर्जाच्या ओझ्याखाली**

पंढरपूर नगर परिषदेच्या निवडणुकीत आमदार अभिजीत पाटील यांनी देखील लक्ष घातले. मात्र सुरुवातीला त्यांचा जो टेम्पो होता तो मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी खास लक्ष घालून श्री विठ्ठल कारखान्याला दिलेल्या कर्जाच्या ओझ्याखाली केव्हा कमी झाला याचा कुणाला पत्ता देखील लागला नाही. तरी देखील त्यांनी श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी स्थापन करुन ११ उमेदवार रिंगणात उतरविलेले आहेत.

**मनसेच्या दिलीप धोत्रेंची चिकाटी**

मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी चिकाटी लावून माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या सर्व विरोधकांना एकाच छताखाली आणले. त्यामुळे विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगिरथ भालके यांच्या नेतृत्वात विठ्ठल परिवाराने भाजपापुढे तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या माध्यमातून आव्हान उभे केल्याचे दिसून येते.

**परिवर्तन घडविण्याचा निर्धार**

तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या माध्यमातून भालके पत्नी, पत्नीने निवडणुकीसाठी जोर लावल्याचे दिसून येते. नगराध्यक्षपदाची उमेदवारी डॉ.प्रणिता भालके यांना देण्यात आली. गेल्या ४0 वर्षांपासून पंढरपूर नगरपरिषद परिचारक गटाकडे आहे. मात्र म्हणावा तसा विकास झाला नाही. यामुळे नागरिक त्रस्त असून यंदाच्या निवडणुकीत परिवर्तन घडविण्याचा निर्धार नागरिकांनी केला आहे. यामुळे तीर्थक्षेत्र विकास आघाडीचा विजय निश्चित आहे, असा दावा भालके यांनी केला आहे.

**मतदारांनी लुटला सहली, भोजनावळीचा आनंद**

उमेदवारांकडून भोजनावळी, सहलीचे आयोजन करण्यात आले. काही ठिकाणी सोमवारी सकाळपासूनच लक्ष्मी दर्शनाला सुरुवात झाल्याचे दबक्या आवाजात बोलले जात आहे. विशेषत: विरोधी गटातील वजनदार पदाधिकाऱ्यांना आपल्याकडे वळविण्याकामी लाखोंची बोली लावले जात असल्याचे बोलले जात आहे.

# मैंदर्गीत १२ हजार ४६६ मतदार; २० केंद्रांवर होणार मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ डिसेबर**

मैंदर्गी नगरपरिषद निवडणूकीसाठी एकूण १२४६६ मतदार आहेत २0 मतदान केंद्रावर मतदान होणार आहे . मतदारांनी निर्भयपणे जास्तीत जास्त मतदान करावे असे आवाहन मुख्याधिकारी अर्जुन सुरवसे यांनी केले. ६२५६ पुरुष व ६२0९ स्त्री व १ इतर असे १२४६६ मतदार आहेत.

२0 मतदान पथके असून प्रत्येकी ५ मतदान कर्मचारी आणि एक पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या शिवाय २ राखीव पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. केंद्रावरील स्टाफ १२0 व राखीव १२ असे एकूण १३२ कर्मचारी तैनात आहेत. मैंदर्गी शहरात ४६ सदस्य व २ अध्यक्ष पदासाठी उमेदवार आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी शिल्पा ओसवाल, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अर्जुन सुरवसे निवडणूकीवर लक्ष ठेवून आहेत. मतदान वेळ सकाळी ७-३0 ते ५-३0 अशी आहे. पोलीस उपविभागीय अधिकारी विलास यामावार हे लक्ष ठेऊन आहेत.शहरात सर्वत्र पोलीस आणि होमगार्ड बंदोबस्त असून शहरात येणाऱ्या सर्व प्रवेश मार्गावर तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.



**दुधनीत १0९0५ मतदार १६ मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावणार**

दुधनी नगरपरिषद निवडणूक साठी एकूण १0९0५ मतदार आहेत १६ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. मतदारांनी निर्भयपणे जास्तीत जास्त मतदान करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी विनायक मगर यांनी केले आहे. ५५५४ पुरुष व ५३५0 स्त्री व १ इतर असे १0९0५ मतदार आहेत.

### मैंदर्गीसह दुधनीतही तगडा पोलिस बंदोबस्त

१६ मतदान पथके असून प्रत्येकी ५ मतदान कर्मचारी आणि एक पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या शिवाय ३ राखीव पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. केंद्रावरील स्टाफ ९६ व राखीव १५ असे एकूण १११ कर्मचारी तैनात आहेत. दुधनी शहरात सदस्य ५३ व ५ नगर अध्यक्ष पदासाठी उमेदवार आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी विनायक मगर , सहायक निवडणूक निर्णय अधिकारी लक्ष्मीकांत कहार निवडणूकीवर लक्ष ठेवून आहेत. मतदान वेळ सकाळी ७-३0 ते ५-३0 अशी आहे. पोलीस उपविभागीय अधिकारी विलास यामावार हे लक्ष ठेऊन आहेत. शहरात सर्वत्र पोलीस आणि होमगार्ड बंदोबस्त असून शहरात येणाऱ्या सर्व प्रवेश मार्गावर तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.

### स्वच्छ भारत मिशनच्या
# ५४ कंत्राटी कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधकारमय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वच्छतेला महत्व देत स्वच्छता संदेश देत आहेत. अनेक कार्यक्रमात स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात स्वच्छतेला महत्व प्राप्त होत आहे. ग्रामीण भागातील लोकांमध्ये स्वच्छतेविषयी जागृती होताना दिसून येत आहे. मात्र याच स्वच्छतेविषयी मोलाची भूमिका बजावणारे व या विभागात १४ वर्षांपासून काम करणाऱ्या स्वच्छ भारत मिशन व जलजीवनचे ५४ कर्मचाऱ्यांची नियुक्ती मुदत डिसेंबर अखेरला संपणार आहे. डिसेंबर अखेरला स्वच्छता भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांचे नियुक्ती कालावधी मुदत संपणार असल्याने या विभागाच्या कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्वच्छता व ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयांतर्गत विविध तालुक्यात स्वच्छता मिशनचे ५४ कर्मचारी कार्यरत आहेत. मुख्य कार्यालयात स्वच्छता भारत मिशनचे ५ व जलजीवन विभागाचे ६ कर्मचारी विविध पदावर काम करीत आहेत. जिल्ह्यातील विविध तालुक्यात स्वच्छता भारत मिशनचे २१ व जलजीवनचे २२ कर्मचारी काम करीत आहेत. यामध्ये मानव संशोधन तज्ञ, इंजिनिअर, ऑपरेटर, स्वच्छता तज्ज्ञ, घनकचरा सांडपाणी तज्ज्ञ, लेखा सल्लागार, सनियंत्रण, मुल्यमापन तज्ज्ञ यांचा समावेश आहे.

ग्रामीण भागात स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात स्वच्छता भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा आहे. मात्र लोकांना स्वच्छता करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या स्वच्छता भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती मुदत डिसेंबर महिना अखेरला संपणार आहे. त्यामुळे त्यांचे भविष्य अधांतरी असल्याचे दिसून येते. मार्च महिन्यात या विभागाच्या कर्मचाऱ्यांची मुदत संपल्यानंतर त्यांना डिसेंबर अखेरपर्यंत मुदत वाढवून देण्यात आले होते. त्यामुळे डिसेंबर महिन्यानंतर त्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात येत आहे.

**डिसेंबर अखेर मुदत संपणार**

जिल्ह्यातील नागरिकांमध्ये स्वच्छतेचे महत्व व जनजागृती करण्यामध्ये स्वच्छता भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांचा सिंहाचा वाटा आहे. मात्र या विभागाचे कर्मचारी कंत्राटी असल्याने त्यांना एका वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येते. डिसेंबर महिना अखेरला मुदत संपणार असल्याने या विभागाच्या कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे. मुदतवाढ मिळविण्यासाठी संघटनामार्फत पाठपुरावा करण्यात येईल.

**- सचिन जाधव,**
कार्याध्यक्ष, पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समिती, महाराष्ट्र राज्य

# जागतिक एड्स दिनानिमित्त सायकल रॅली

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

जागतिक एड्स दिनानिमित्त राज्य एड्स नियंत्रण संस्था, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्र, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, डॉ. वैशपायन महाविद्यालय, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, विधी व सेवा प्राधिकरण तसेच रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृतीपर सायकल रॅली उत्साहात पार पडली.



या रॅलीचा शुभारंभ जिल्हा रुग्णालय, गुरुनानक चौक येथून अप्पर जिल्हाधिकारी गणेश निराळी, अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांच्या हस्ते करण्यात आला. वालचंद महाविद्यालयातील एनएसएसचे विद्यार्थी सायकली आणि जनजागृतीपर बॅनरसह रॅलीत सहभागी झाले. सहशिक्षक संदीप चेंडकापुरे आणि एनएसएस विभाग प्रमुख डॉ. अमोल शिंदे हे उपस्थित होते. सुरुवातीस विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे यांनी सहभागाचे कौतुक केले.

# बार्शी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव तत्पर : राऊत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ डिसेंबर-**



बार्शी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव तत्पर आहे. शहरातील तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी औद्योगिक वसाहतीची निर्मिती शहरात होत आहे. लवकरच मोठमोठे उद्योगधंदे बार्शीत येतील. सर्वात मोठ्या उपसा सिंचन प्रकल्पामुळे तालुक्याची अर्थ व्यवस्था सुधारते आहे म्हणूनच विकासासाठी भाजपच्या उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी केले.

बार्शीत २0१६ ते २0२१ पर्यंत नगरपरिषदेत आमची सत्ता होती. त्याकाळात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केली आहेत, असे सांगून ते पुढे म्हणाले, डांबरी रस्ते, सिमेंट रस्ते, शहीद पार्क, शिवसृष्टीसह २९६ कोटीची उजनी ते बार्शीपर्यंत नवीन पाईप लाईनचे काम केले आहे. हे काम जवळजवळ ६0 ते ७0 टक्के पूर्ण झाले आहे. येत्या एप्रिलपर्यंत कोणत्याही परिस्थितीत पाणी येईल. बार्शीत मागील सहा महिन्यात शहरात सुमारे ३५ तरुणांनी आत्महत्या केल्या आहेत. हे कोणालाही भूषणावह नाही. तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी, शेतकरी सुजलाम सुफलाम होण्यासाठी पाण्याची मोठी आवश्यकता आहे. केंद्र आणि राज्यात आपल्या विचाराचे सरकार असल्यामुळे विकासाला चालना मिळणार आहे. भगवंत मंदिराच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी शासन दरबारी आपण प्रयत्नशील राहणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# पंढरपूर तीर्थक्षेत्र आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी भाजप उमेदवारांना निवडून द्या

### पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१ डिसेंबर-**

पंढरपूर हे तीर्थक्षेत्र आपणास आंतरराष्ट्रीय स्तरावर सादर करायचे आहे. यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी लागणार आहे, हा निधी केवळ भाजप सरकार जनतेला देऊ शकते. शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी भाजप आणि शहर विकास आघाडीच्या उमेदवारांना नगरपालिकेत निवडून द्या, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले. भाजपा व शहर विकास आघाडीच्या वतीने शिवतीर्थ येथे आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते.





व्यासपीठावर आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शामल शिरसट यांच्यासह गुरुदास अभ्यंकर, गणेश अधटराव, बालाजी मलपे, शैलेश बडवे, अपर्णा तारके, रचिता सगर, प्रदीप पवार, श्वेता डोंबे, शंकर सुरवसे, अमोल डोके, भागवत बडवे, बाळासाहेब कौलवार, माऊली हळवणकर, अक्षय वाडकर, महादेव धोत्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे पुढे म्हणाले, पाचशे कोटींचे रस्ते करायचे आहेत, तीर्थक्षेत्र विकास योजना करण्यासाठी ३५00 कोटी रुपये लागणार आहेत, विरोधक हा निधी कसा आणतील, हे पैसे कोणाकडे मागणार? आलेला निधी कसा वापरणार? नुसती वैयक्तिक टीका करून विकास करता येत नाही त्यासाठी दृष्टी लागते. वाराणसी, अयोध्या येथे फाईव्ह स्टार हॉटेल्स झाली आहेत. त्या धर्तीवर पंढरपूर विकसित करायचे आहे.

माजी आमदार प्रशांत परिचारक याप्रसंगी बोलताना म्हणाले, तालुक्यातील द्राक्ष, ऊस, डाळिंब लागवड वाढली आहे. तालुका सुजलाम सुफलाम झाला आहे. मोठे मालक श्रीमंत सुधाकर परिचारक १९६५ पासून राजकारणात आहेत, खेड्यासारखी परिस्थिती होती. एकही डांबरी रस्ता नव्हता केवळ घरपट्टी, पाणीपट्टी, दुकानाचे भाडे एवढेच उत्पन्न शहरातून मिळते. गरपालिकेचा खर्च कोट्यवधी रुपयांचा आहे. १९९५ साली प्रथम ड्रेनेज सिस्टीम तयार केली.

यावेळी चंदु जगताप, भारत माळी, राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे श्रीकांत शिंदे, जितेंद्र बनसोडे, कृष्णा वाघमारे, आप्पा राऊत, माजी नगरसेवक बागवान, पंडित भोसले, सतीश धनवे, सुनील वाळूजकर, पंढरपूर अर्बन बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे, भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, स्वेरी कॉलेज चे डॉ.बी.पी.रोंगे, लक्ष्मण शिरसट यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्रचारादरम्यान विरोधकांनी परिचारक कुटुंबियांवर अनेक खोटे आरोप करत आहेत. श्रीकृष्ण यजुर्वेद जागेविषयी दस्तुरखुद्द मालक भारत माळी यांनी स्पष्ट केले की, सुरवसे बिल्डिंगवरुन राजकारण सुरु आहे. पण या जागेचे केवळ डेव्हलपर परिचारक आहेत, असा जाहीर खुलासा करून विरोधकांचे खोटे आरोप हाणून पाडले.

आज विरोधकांना बडवे, उत्पात सेवाधारी मंडळींचा कळवळा आला आहे. पण २0१४ साली त्यांच्या ताब्यातून देऊळ काढून घेतले. त्यावेळी याच लोकांनी फटाके उडवून आनंद साजरा केला होता. तेव्हा कुठे गेले गेली होती तुमची माया? असा जाब माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी विचारला.

# पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांचे सोलापुरात ७ डिसेंबरला व्याख्यान

**सोलापूर,दि.१ डिसेंबर-**



महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या दक्षिण सोलापूर शाखेतर्फे पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांचे 'भारत का भविष्य' या विषयावर ७ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजून २५ मिनिटांनी हुतात्मा स्मृती मंदिरात व्याख्यान होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगर देवगिरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे उपस्थित राहणार आहेत. कुलश्रेष्ठ यांच्या ओघवत्या भाषणाचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन परिषदेच्या अध्यक्षा रेणुका महागावकर तसेच पदाधिकारी यांनी केले आहे.







हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(0२१७)-२६00४९८ ● जाहिरात विभाग (0२१७)-२६00३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## महापालिकेकडून मिळकत कर नोंदींचे सर्वांगीण पुनरावलोकन, शुद्धीकरण सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ डिसेंबर-**

कर आकारणी प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याच्या उद्देशाने सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने मिळकत कर नोंदींचे सर्वांगीण पुनरावलोकन व शुद्धीकरण सुरू केले आहे.

विशेषतः महापालिका हद्दीतील आढळ न होणाऱ्या मिळकती तसेच दुबार नोंद झालेल्या मिळकती ओळखून त्यावर आवश्यक ती सुधारणा करण्यात येत आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या नियंत्रणाखाली ही मोहीम राबवली जात आहे. मालमत्ता कर विभागाकडील कर निरिक्षक व वसुलि लिपिक यांचेकडून मिळणाऱ्या अहवालांच्या आधारे कार्यवाही करण्यात येत आहे: आढळ न होणाऱ्या मिळकतींबाबत कार्यवाही,प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणाद्वारे संबधित ठिकाणी मिळकत अस्तित्वात आहे की नाही याची खात्री करणे. आढळ न झालेल्या मिळकती व आढळ न होणारे पैकी नळाचे पंचनामे करणेचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच



अशा मिळकतींची पेठ निहाय यादी मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून, सदर यादीमधील निर्लेखित करावयाच्या मिळकतीबाबत कोणाची हरकत अथवा माहिती असल्यास याबाबत smcpropartytax@gmail.com यावर अथवा आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे नांवे लेखी स्वरुपात ७ दिवसाचे आत हरकत अथवा माहिती द्यावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

## ▸▸ महत्वाचे...

### राज्यातील शाळा ५ डिसेंबरला राहणार बंद

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

प्राथमिक, माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघ महामंडळाच्या वतीने मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्व शाळा ५ डिसेंबरला बंद राहणार आहेत. महाराष्ट्रातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांनी ५ डिसेंबर रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन पुकारले आहे. हे आंदोलन मुख्यतः शिक्षक पात्रता परीक्षा सक्ती, संच मान्यता संदर्भातील शासन निर्णय रद्द करण्यासाठी आणि इतर प्रलंबित मागण्यांसाठी करण्यात येणार आहे. या आंदोलनामुळे राज्यातील शाळा बंद राहणार आहेत. राज्यव्यापी शाळा बंदचा पुण्यातून एल्गार करण्यात आला आहे. मुख्याध्यापक महामंडळाने राज्यव्यापी संपाचा इशारा दिला आहे. पुण्यात पार पडलेल्या बैठकीत मुख्याध्यापक महामंडळाने निर्णय घेतला आहे. येत्या ५ डिसेंबर रोजी राज्यातील शाळा बंद ठेवून सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. प्राथमिक, माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र मुख्याध्यापक महामंडळाच्या वतीने मोर्चा काढण्यात येणार आहे.

### कामगारांना आज मतदान करण्यासाठी सुट्टी

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

नगरपरिषद, नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२५ करिता मतदारसंघातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी आज (दि. २) रोजी निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना; मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक कामगार आयुक्त निलेश येलगुंडे यांनी दिली. सदर सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादीना लागू राहिल (उदा. खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी, हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.) अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल, अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थपनांच्या संदर्भात संबंधित अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घ्यावी. वर नमूद केल्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी / व्यवस्थापनाने वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित आस्थापनांविरुध्द कारवाई करण्यात येईल. सोलापूर जिल्ह्यातील कामगारांकरीता सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय सोलापूर यांच्या स्तरावर दक्षता कक्ष स्थापन करण्यात आला असून, कामगारांना मतदानाकरीता सुट्टी अथवा दोन तासांची सवलत आस्थापना मालक देत नसल्यास कार्यालयाचे दुरध्वनी क्र. ०२१७-२७२८४०१ वर संपर्क साधून तक्रार देण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले.

# ४ लाख ४३ हजार मतदार करणार 'नगर कारभाऱ्यांचा' फैसला

- ४९९ केंद्रांवर होणार मतदान
- सोमवारी दिवसभर पडला आश्वासनांचा पाऊस

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील ९ तालुक्यातील ११ नगरपरिषदेच्या अध्यक्ष पदासाठी ६६ उमेदवार तर सदस्यपदासाठी ८९३ उमेदवार रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी १५२ प्रभागातील २ लाख २२ हजार २४७ महिला, २ लाख २१ हजार १४३ पुरुष आणि इतर मतदार ९४ असे ४ लाख ४३ हजार ४८४ मतदार आपापले कारभारी निवडणार आहेत.

जिल्ह्यातील ४९९ मतदान केंद्रांसाठी १३३२ बीयु, ६६१ सीयु आणि ६६१ डीएमएम अशा ईव्हीएमची सोय केली असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली. दरम्यान, सोमवारी प्रचाराचा अखेरचा दिवस असल्याने उमेदवार आणि त्यांच्या नेत्यांनी रात्री उशिरापर्यंत आपापल्या मतदारसंघात





आश्वासनांचा जणू पाऊस पाडला.

मंगळवार, दि.२ डिसेंबर रोजी सकाळी ७:३० वाजल्यापासून मतदान प्रकियेला प्रारंभ होणार आहे. जिल्हाभरात एकूण ४९९ मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली. मतदान प्रक्रिया शांततेत व व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी बुथनिहाय व केंद्रनिहाय तीन पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहे. जवळपास दीड हजार पोलिसांचा फौजफाटा राहणार आहे.

मतदान प्रक्रियेत २७०० हुन अधिक प्रशिक्षणार्थी कर्मचारी सहभागी आहेत. सुरक्षा यंत्रणेच्या देखरेखीखाली दि.३ डिसेंबर रोजी मतमोजणी प्रकिया ज्या-त्या ठिकाणच्या गोडावून येथे पार पडणार आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाचे काही आदेश बदलल्यास मतमोजणी प्रक्रिया लांबणीवर जाण्याची चर्चा आज दिवसभर राजकीय वर्तुळात होती. रविवारी सर्वच पक्षातील प्रमुख नेते राज्यभर प्रचाराच्या दौऱ्यावर होते. सोमवारी प्रचाराचा शेवटचा दिवस असल्यामुळे अनेक पक्षांनी अंतिम शक्तिप्रदर्शनासाठी सभा, जनसंपर्क आणि रोड शो आयोजित केले होते. गेल्या काही दिवसांपासून प्रचारात आरोप-प्रत्यारोपांची धार पहायला मिळाली. अखेर सोमवारी रात्री प्रचार थांबला.

काही ठिकाणी भाजप आणि शिंदेसेना तरी काही ठिकाणी भाजप विरुध्द राष्ट्रवादी अजित पवार गट असा सामना पहायला मिळत आहे. यंदाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य दिग्गज नेत्यांनी सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यात प्रचारसभा घेतल्या.

शेतकरी, शेतमजूर, कामगार, लाडक्या बहिणी, युवक-युवती, वयोवृध्द नागरिकांसाठी केलेली विकासकामे सांगत त्यांनी मतदारांची मने आपल्याकडे वळविण्याचा पुरेपूर प्रयत्न केल्याचे दिसून आले. तर दुसरीकडे काँग्रेस, शरद पवार गट, उद्धव सेना या विरोधी पक्षांचा प्रचार सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांच्या प्रचारासमोर फिकाच दिसून आला.

### नगरपालिकेतील तिजोरीच्या चाव्या कोणाच्या हाती?

आता आपल्या शहरातील नगरपालिकेतील तिजोरीच्या चाव्या कोणाच्या हातात द्यायच्या? याचा फैसला मंगळवारी मतदार बांधव करणार आहेत. तर निवडून कोण-कोण येणार? कोण गुलाल अन् फटाक्याची आतषबाजी करणार? हे येणारा काळच ठरविणार आहे.

### मतदानाच्या पूर्वसंध्येलाच अधिकारी-कर्मचारी केंद्रावर रवाना

या निवडणुकीसाठी जिल्ह्यात ४९९ मतदान केंद्रे, १५०० पोलिसांचा फौजफाटा आणि २७०० हून अधिक प्रशिक्षणार्थी कर्मचारी निवडणूक प्रकियेत सहभागी आहेत. हे कर्मचारी-अधिकारी मतदानाच्या पूर्वसंध्येलाच आपापल्या बुथवर मार्गस्थ झाले आहेत. मतदानासाठी लागणारे साहित्यही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या सुचनेनुसार आम्ही सोमवारपर्यंत सर्वत्र पोहोच केले आहे.

**- योगेश डोके, नगरपालिका जिल्हा सहआयुक्त, सोलापूर**

# माजी नगरसेवकांच्या कोलांटउड्या; नवखा इच्छुक संभ्रमावस्थेत

- इच्छुकांचा सत्ताधाऱ्यांकडे ओढा परंतु उभारण्यास नाही जागा
- आघाडीत सामील होण्याशिवाय नाही उरला पर्याय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१ डिसेंबर**

गेल्या काही महिन्यांपासून पक्षांतराचे वारे जोरात वाहत असल्याचे दिसून येत आहे. अनेक आजी-माजी नगरसेवकही यात मागे नाहीत. माजी नगरसेवकांच्या या कोलांटउड्यांमुळे नवखा इच्छुक मात्र संभ्रमावस्थेत पडल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, आगामी निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्यांचा सत्ताधारी पक्षाकडे ओढा आहे. परंतु उभारण्यास जागा नाही. त्यामुळे आघाडीत सामील होण्याशिवाय पर्याय उरला नसल्याचे सांगण्यात येते.






सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. ज्या स्थानिक स्वराज्य संस्था ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत आहेत. त्या स्थानिक संस्थांच्या पंचवार्षिक निवडणुकीला ग्रीन सिग्नल मिळाला आहे. यामध्ये सोलापूर महानगरपालिकेचा देखील समावेश आहे. त्यामुळे जिंकून येण्याच्या अनुषंगाने अनेक माजी नगरसेवक प्रभागाची चाचपणी सुरु करीत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, निवडणूक पुढे ढकलली जाईल या अविर्भावात अनेक नेतेमंडळी आरामात होते. निवडणुकीची तयारी जोमाने केली नव्हती. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीनंतर मात्र सर्वपक्षीय नेते खडबडून जागे झाले आहेत. निवडणुकीला अजून अवधी आहे, नंतर बघू, असे म्हणत नॉट रिचेबल झालेले माजी नगरसेवक तात्काळ रेंजमध्ये आले आहेत. तर काहींनी थेट पक्ष बदलत नवीन पक्षाचा झेंडा हाती घेत आहेत.

जानेवारी महिन्यात महापालिका निवडणुका घ्याव्यात, असे आदेश सुप्रीम कोर्टाने निवडणूक आयोगाला तसेच राज्य सरकारला दिले आहेत. त्यामुळे निवडणूक आयोग आणि राज्य सरकार देखील अलर्ट मोडवर आले आहेत. तर इकडे मतदार याद्यांचा घोळ अद्यापही कायम आहे. बोगस मतदानाची टक्केवारी वाढेल या चिंतेत विरोधक असून, मतदार यादीतील घोळ दूर करावा. त्यानंतर मतदान घ्यावे, असे विरोधकांचे म्हणणे आहे. दुसरीकडे अशा गोंधळातच निवडणुका पार पाडण्याचे चंग निवडणूक आयोग आणि राज्य सरकार यांनी बांधलेले असल्याचे दिसून येत आहे. मतदार यादीतील घोळ दूर करण्यासाठी ज्या त्या महापालिका स्तरावर वेबसाईटद्वारे अर्ज भरण्यासंबंधी सूचना जारी केल्या आहेत.

मात्र निवडणुकीच्या तोंडावर ही प्रक्रिया पूर्णत्वास जाईल का? अशी साशंकता व्यक्त केली जात आहे. काही माजी नगरसेवकांनी आपल्या पारंपारिक असलेल्या प्रभाग रचनेवर हरकती घेतल्या आहेत. काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तौफिक शेख यांच्यासह अन्य काही जणांनी आपल्या प्रभागातील मतदार हे दुसऱ्या प्रभागात समाविष्ट केल्याच्या तक्रारी निवडणूक प्राधिकरणाच्या कार्यालयाकडे केले आहेत. प्रभाग रचनेतील हरकती आणि मतदार यादी हरकतीसाठी दि.७ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आले आहे. निवडणूक प्राधिकरणाने वेबसाईटवर अर्ज भरण्यासंबंधी सूचना जारी केल्या आहेत.

### पक्षशिस्त आणि कोणता झेंडा

अनेक माजी नगरसेवकांनी राजकीयदृष्ट्या सेफ राहण्याच्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टीची वाट धरली-धरत आहेत. त्यामुळे भाजपामधील निष्ठावंत कमालीचे नाराज व्यक्त करीत आहेत. मात्र पक्षशिस्तच्या नावाखाली ते दोन पावले मागे सरकरण्याच्या भूमिकेत असल्याचे सांगण्यात येते. तर दुसरीकडे सत्ताधारी की विरोधी पक्षात जावे? महापालिका निवडणुकीत कोणता झेंडा घेऊ हाती? असा प्रश्न नव्याने सामोऱ्या जाणाऱ्या इच्छुकांना पडला असल्याचे सांगण्यात येते.




# 'त्या' बसस्टॉपच्या जागी वाहण्यात आली श्रध्दांजली

### शिवसेना उबाठा आणि मनसेने केले निदर्शने

**सोलापूर, दि.१ डिसेंबर-**

आजपर्यंत जागा गायब होणे, शौचालय गायब होणे असे प्रकार ऐकले-पाहिले होते. आता तर पार्क स्टेडियमसमोरील चक्क बसस्टॉपच गायब केला. या विरोधात शिवसेना उबाठा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निदर्शने करत 'त्या' बसस्टॉपच्या जागी श्रध्दांजली वाहण्यात आली.

'त्या' बसस्टॉपच्या जागेवर पुष्पगुच्छ व उदबत्ती ठेवून श्रध्दांजली वाहण्यात आली. महापालिका आयुक्त, परिवहन विभागाकडील अधिकाऱ्यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. सदर बसस्टॉप पूर्ववत उभारण्यात यावा. अन्यथा महापालिका अधिकाऱ्यांच्या विरोधात प्रतिकात्मक श्रध्दांजली वाहण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. शिवसेना उबाठाचे शहर प्रमुख महेश धाराशिवकर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाप्रमुख विनायक महिंद्रकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रताप चव्हाण, दत्तात्रय गणेशकर, लहू गायकवाड, आबा सावंत, सुरेश जगताप, दत्ता खलाटे, जैनुद्दीन शेख, अभिषेक रामपुरे आदी उपस्थित होते.

# मंगळवेढा नगरपालिकेची निवडणूक २० डिसेंबरला; सुधारित कार्यक्रम जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मंगळवेढा नगरपालिका आणि अनगर नगरपंचायत यांच्या निवड प्रक्रियेला स्थगिती आदेश दिले आहेत. आता सुधारित कार्यक्रमानुसार येथील निवडणूक प्रक्रिया घेतली जाणार असल्याचे आदेशात नमूद आहे. नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांशी संबंधित न्यायालयीन प्रकरणांमुळे अडकलेली निवडणूक आता २० डिसेंबर रोजी होणार असून, राज्य निवडणूक आयोगाने सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे.

मंगळवेढा नगरपरिषद तसेच नगराध्यक्षपद आणि नगरसेवक पदांच्या निवडणुकीची प्रक्रिया नव्या तारखांसह जाहीर करण्यात आली आहे.




मंगळवेढा नगराध्यक्षपदाच्या उमेदवारी अर्जांवर एकूण तीन अपील जिल्हा न्यायालयात दाखल झाली होती. या अपिलांवर २७ नोव्हेंबरपर्यंत निर्णय न झाल्याने निवडणूक आयोगाने संपूर्ण निवडणूक प्रक्रिया स्थगित केली होती. जिल्हाधिकाऱ्यांनीही याबाबतची माहिती राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवली होती. पूर्वीच्या कार्यक्रमानुसार मतदान २ डिसेंबरला आणि मतमोजणी ३ डिसेंबरला होणार होती. मात्र न्यायालयीन अडथळ्यांमुळे संपूर्ण कार्यक्रम रद्द करावा लागला.

**निवडणूक आयोगाचा नवा निर्णय**

निर्णयाची प्रतीक्षा आणि संभ्रम निर्माण झाल्यानंतर आता राज्य निवडणूक आयोगाने मंगळवेढा नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांच्या निवडणुकीसंदर्भात नवा सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी हा निर्णय जाहीर केला. सहआयुक्त योगेश डोके यांनीही या कार्यक्रमानुसार पुढील कार्यवाही केली जाणार असल्याची माहिती दिली.

**सुधारित निवडणूक कार्यक्रम**

नवीन वेळापत्रकानुसार पुढीलप्रमाणे निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार आहे. ४ डिसेंबर: जिल्हाधिकारी निवडणूक कार्यक्रम जाहीर करतील, १० डिसेंबर (दुपारी ३ वाजेपर्यंत): नामनिर्देश मागे घेण्याची अंतिम मुदत, ११ डिसेंबर: चिन्ह वाटप व उमेदवारांची अंतिम यादी जाहीर, २० डिसेंबर: मतदान, २१ डिसेंबर २०२५: मतमोजणी, २३ डिसेंबरपूर्वी: संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण.

**उमेदवार आता नव्या वेळापत्रकानुसार मोट बांधणार**

नव्या कार्यक्रमामुळे मंगळवेढा नगरपालिका निवडणुकीत पुन्हा उत्साह येणार आहे. न्यायालयीन प्रक्रियेतील विलंब आता मागे पडला असून, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया



२३ डिसेंबरपूर्वी पूर्ण होणार आहे. त्यामुळे आता उमेदवारांची धाकधूक वाढल्याचे दिसून येते. दरम्यान, आता निवडणूक आयोगाच्या नव्या वेळापत्रकानुसार निवडणुकीस उभे ठाकलेले उमेदवार मोट बांधणार असल्याची चर्चा सुरू आहे. आजतागायत त्यांनी केलेला प्रचार फेल गेला आहे; यामुळे उमेदवारांना पुन्हा एकदा होम टु होम प्रचारफेऱ्या काढाव्या लागणार आहेत. याच धर्तीवर यवतमाळ, धाराशिव, अहिल्यानगर, बारामती, महाबळेश्वर व इतर काही ठिकाणी उमेदवारांना पुन्हा प्रचारसभा, कॉर्नरसभा, मतदारांच्या गाठीभेटीवर भर द्यावा लागणार आहे.

# दत्त जयंतीमुळे शहरात चैतन्यमय वातावरण

- विविध मंदिरात प्रवचनासह धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी
- दत्त जयंतीच्या पूर्वसंध्येला मंदिर विद्युत रोषणाईने सजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ डिसेंबर-**

अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त, दिगंबरा, दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा, अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज की जय, असा जयघोष शहरातील विविध दत्त मंदिरांत निनादत आहे. गुरुवार, दि.४ डिसेंबर रोजी श्रीदत्त जयंती आहे.



यानिमित्त गुरुचरित्र पारायण, भजन, कीर्तन, प्रवचन सुरू झाले आहे. श्रीदत्त जयंती पाळणा सोहळ्यात शहरातील विविध मंदिरांत सुमारे ५० हजाराहून अधिक भाविक सहभाग होतील. अनेक मंदिरात महाप्रसादाचे आयोजन आहे. सुमारे ४० हजारांहून अधिक भाविकांना महाप्रसादाचा लाभ मिळणार आहे. दत्त चौकातील जुने दत्त मंदिर, कल्याण नगर येथील दत्त मंदिर, सुंदरम नगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिर, मेकॅनिकी चौक येथील नवे दत्त मंदिर, मड्डी वस्ती येथील श्री दत्त मंदिर, पूर्वभागातील दत्त नगर येथील दत्त मंदिर, कविता नगर पोलिस लाईनसमोरील श्री दत्त मंदिर, अशोक चौक येथील श्री स्वामी समर्थ मंदिर यांसह शहरातील विविध दत्त मंदिरांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील कल्याणनगर, जुळे सोलापूर येथील दत्त मंदिरात दि.५ डिसेंबर रोजी दुपारी एक ते चार यावेळेत महाप्रसाद असून, सात ते आठ हजार भाविकांसाठी नियोजन आहे. लष्कर, जगंदबा चौकातील दत्त माणिक प्रभू मंदिरात सहा दिवस उत्सव काळात दररोज तीनशे, तर तीन डिसेंबर रोजी उत्सव समाप्तीला १० हजार भाविकांना प्रसाद वाटप आहे. शहरात विविध भागातील प्रसिद्ध मंदिरात जयंतीनिमित्त भजन, कीर्तन, प्रवचन हे धार्मिक कार्यक्रम संपन्न होत असताना भाविकांच्या चेहऱ्यावर समाधानाची लकेर दिसत आहे.

**सुंदरमनगर मंदिर स्वामी समर्थ मंदिर**

विजापूर रोड येथील सुंदरमनगर श्री स्वामी समर्थ मंदिरात दि.२ ते ५ डिसेंबर दरम्यान दररोज सकाळी गुरुलीलामृत पारायण, सायंकाळी ६ वाजता भजन, कीर्तन, व्यंकटेश संगीत विद्यालयाचा भक्तिसंगीत कार्यक्रम, दि. ३ रोजी किरण जोजारे यांचे भजन. दि.४ रोजी शामराव जोशी महाराज यांचे दत्त जन्म आख्यान. ६ वाजता दत्त जन्म पाळणा. दि.५ रोजी स्वामी समर्थ यांच्या मूळ मूर्तीस सकाळी ६.३० वाजता अभिषेक, ९ वाजता पारायण, सायंकाळी ६ वाजता भजन असे कार्यक्रम होणार आहेत.

**कल्याण नगरमधील दत्त मंदिर**

कल्याणनगर भाग दोन येथील दत्त मंदिरात दि.२७ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर सप्ताहास सुरुवात झाली आहे. दररोज पहाटे ५ वाजता अभिषेक, पूजा, आरती, सकाळी ८ वाजता गुरुचरित्र पारायण, सायंकाळी ५ वाजता प्रवचन, पसायदान आरती, दि.१ डिसेंबरला गोपाळ लोंढे महाराजांचे प्रवचन. दि.२ डिसेंबर रोजी मुकुंद महाराज ताकमोगे, दि.३ डिसेंबर रोजी अच्युत मोफरे महाराज, दि. ४ हरिपद पद्मानंद ज्ञानेश्वर महाराज चव्हाण यांचे दत्त जन्मोत्सव कीर्तन. पालखी मिरवणूक सायंकाळी ६ वाजता कल्याण नगर, विश्वकरण पार्क, गोकुळनगर, लक्ष्मी बैंक कॉलनी, पाणी टाकी ते डी. मार्ट या मार्गावरुन काढण्यात येणार आहे.

**दत्त चौकातील जुने दत्त मंदिर**

दत्त चौकातील जुने दत्त मंदिरात दि.२७ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत दत्त नवरात्र सुरू झाले आहे. याअंतर्गत महाआरती, मंत्रजप, भजन, गुरुचरित्र पारायण असे कार्यक्रम होत आहेत. दत्त जयंतीच्या दिवशी मूळ पादुकांना लघुरुद्राभिषेक, प्रथमेश कुलकर्णी यांचे कीर्तन, महाआरती, पालखी सेवा असे कार्यक्रम होणार आहेत, असे मंदिराचे प्रमुख प्रदीप अंबलगी यांनी सांगितले.

**अशोक चौकातील स्वामी समर्थ मंदिर**

दि.२८ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर सप्ताहास सुरुवात झाली असून या कालावधीत गुरुचरित्र पारायण संपन्न होत आहे. दि.४ डिसेंबरला पहाटे ५.३० वाजता काकडा आरती, सकाळी ११ वाजता प्रवचन होणार आहे, असे मंदिर समितीच्या वतीने सांगण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी १२८४

**आवडीसी जीवा मन आनंदले ।**
**पाहता विठ्ठले तुजलागी ॥**

नाशवंत देहाला मी म्हणणाऱ्या जीवाला दुसरा जीव ज्याच्यावर त्याचे जीवापाड प्रेम आहे, तो भेटला तर त्याचा आनंद गगनात मावत नाही. नाशवंत देहाला मी म्हणणाऱ्या जीवाच्या बाबतीत जर असे घडते तर जो जीव नाशवंत देहाला मी म्हणत नाही. अर्थात, ज्याला स्वत:चा खरा परिचय झाला आहे, अशा जीवाला शाश्वत परमात्म्याची भेट झाली तर त्याचा आनंद किती असेल, हे खरोखरच शब्दात सांगण्यापलीकडचे आहे. लाखों वारकरी ज्यांना वारीच्या गर्दीत प्रत्यक्ष पांडूरंगाच्या चरणावर डोके ठेवायला मिळत नाही, ते केवळ दुरुन श्रीमुख पाहून आनंदी होतात. यामागे त्यांचे पांडूरंगावरील जीवापाड प्रेमच कारणीभूत असते.



सेनाजींना अत्यंत जवळून प्रत्यक्ष पांडूरंग पाहायला मिळाला. एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष पांडूरंग अनुभवायला मिळाला. हे त्यांच्या,आवडीसी जीवा मन आनंदले । पाहता विठ्ठले तुजलागी ॥, या वचनांतून लक्षात येते. पांडुरंगाच्या भेटीमुळे त्यांचा आनंद निश्चित शब्दापलीकडचा असणार आहे. आपणाला पांडूरंगावर जीवापाड प्रेम करून आनंदाची अनुभूती घेता नाही आली तरी चालेल, पण आपल्या अवती भोवती असणाऱ्या सर्व जीवमात्ररुपी पांडूरंगाच्या लेकरावर नि:स्वार्थ प्रेम करता आले तरी पुरेसे आहे. पुढे सेनाजी महाराज,

घालीन मी मिठी होऊनिया दास ।
आहे तुझी आस देवराया ॥

त्यांच्या उपरोक्त वचनांची अनुभूती सांगतात. नि:स्वार्थ प्रेम काय आणि किती अधिकार देऊ शकते हे, संत महात्म्यांचा भगवंतावरील अधिकार पाहिल्यास लक्षात येतं. कोणी देवाला म्हणतं, तुला कोणी बोलावलं इथं, कोणी म्हणतं, काळ्या तोंडाच्या तूच आहेस का तो ? कोणी म्हणतं जा तिथं जाऊन उभा राहा, तर कोणी आणखी कांही म्हणतं. खरच काय अधिकार आहे, या भक्तांचा. आपण आपल्या कुटूंबातील किंवा रक्ताच्या नात्यातील सदस्यांनाही एवढ्या अधिकारानं बोलू शकत नाही. यामागचं प्रमुख कारण म्हणजे आपलं समोरच्यावर तेवढं निस्वार्थ प्रेम नसतं. खरं म्हणजे प्रेम हेच सर्व सुखाचा आधारस्तंभ होय. हा आधारस्तंभ ज्या बुध्दिजीवी माणसाला पक्का करता येत नाही, त्याचे जीवन सुखमय होऊच शकत नाही. हा आधारस्तंभ पक्का करण्यासाठी धन, संपत्ती लागत नाही. यासाठी मनाची निस्वार्थता आणि दृष्टीची सकारात्मकता लागते. सेनाजींकडे हे सर्व कांही होतं म्हणूनच ते भगवंताला तुझ्या भेटीच्या अपेक्षेशिवाय मला काही नको. तू भेटताच मी तुला घट्टपणे मिठी मारेन. पण ही मिठी मी दास होऊन मारेन. सेनाजींच्या या वाक्यात केवळ निस्वार्थ प्रेमच आहे असे नव्हे तर नम्रताही आहे. जय जय राम कृष्ण हरी. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार
दि. २ डिसेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - मार्गशिर्ष शु. द्वादशी
ऋतु - हेमंत
नक्षत्र- अश्विनी (२०.५१)
योग - वरियन (२१.०८)
करण - कौलव (२६.१४)
....राहू काल....
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०

दिनविशेष -
भौमप्रदोष,
राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन.
२०१४: महाराष्ट्राचे ८ वे मुख्यमंत्री ए आर अंतुले यांचे निधन. (जन्म: ९ फेब्रुवारी १९२९)
२०१४: भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते देवेन वर्मा यांचे निधन (जन्म: २३ ऑक्टोबर १९३७)




## 'सेवा धर्म महान' पुस्तिकेचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १ डिसेंबर-**

कोणत्याही आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांना केली जाणारी मदत हे 'सेवा भारती' च्या कार्याचे वैशिष्ट्य आहे. सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठीही 'सेवा भारती'ने लक्षणीय कार्य केले, अशा शब्दात 'सेवा भारती'चे अखिल भारतीय संघटन मंत्री सुधीरकुमार यांनी 'सेवा भारती'च्या कार्याचा गौरव केला.

सोलापूर जिल्ह्यातील पुरामुळे बाधित झालेल्या गावांमध्ये 'सेवा भारती'च्या वतीने मदत कार्य करण्यात आले. या मदत कार्याची माहिती देणाऱ्या 'सेवा धर्म महान' या पुस्तिकेचे प्रकाशन सुधीरकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात ते बोलत होते. संस्थेच्या अखिल भारतीय महामंत्री रेणूताई पाठक, संयुक्त महामंत्री विजय पुराणिक आणि 'सेवा भारती' पश्चिम महाराष्ट्रचे सचिव प्रदीप सबनीस यांची कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती होती. सुधीरकुमार यांनी सांगितले की 'सेवा भारती'ने सोलापूर जिल्ह्यात जे मदत आणि पुनर्वसन कार्य केले ते महत्त्वपूर्ण आणि नागरिकांसाठी उपयुक्त ठरणारे आहे. समाजाने या कामाला जी उत्स्फूर्त साथ दिली ती देखील महत्त्वाची आहे. जनसेवा सहकारी बँक, जनता बँक यासह विविध बँकांमधील कर्मचाऱ्यांनी, शिक्षण संस्थांनी, शिक्षण संस्थांमधील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी तसेच व्यापारी, उद्योजक, सामाजिक संस्था आदींनी या कामाला मोठे सहाय्य केले, अशी माहिती सबनीस यांनी दिली.

# डॉ. आंबेडकर विषयावर सोलापुरात आंतरराष्ट्रीय परिषद

### ४ व ५ डिसेंबरला सोलापूर विद्यापीठात होणार विचार मंथन

### डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते होणार उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे संकुल, प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'कोट्यावधी मनाला स्पर्श करणारे मनः डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारांचे जागतिक संदर्भ' या महत्त्वपूर्ण विषयावर ही आंतरराष्ट्रीय परिषद दि. ४ आणि ५ डिसेंबर रोजी होणार आहे, अशी माहिती पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी अरब अमेरिकन विद्यापीठाचे डॉ. अयमान इसुफ हे विशेष पाहुणे असणार आहेत. कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्र. कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही परिषद आयोजित करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले सामाजिक न्याय, समानता, लोकशाही, अर्थकारण आणि राष्ट्रनिर्माणाचे विचार आज केवळ भारत देशापुरते मर्यादित नसून, ते जागतिक स्तरावर मानवमुक्ती आणि प्रगतीसाठी मार्गदर्शक ठरत आहेत. याच विचारांना वैश्विक स्तरावर अधिक दृढ करण्यासाठी आणि नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत ४ डिसेंबर रोजी अत्यंत महत्त्वाचे सत्र 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय सुरक्षेसंबंधी विचार' या विषयावर डॉ. विजय खरे मांडणी करणार आहेत. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीवादी, मानवी हक आणि मानवी स्वातंत्र्यासाठी विषयक विचार या विषयावर डॉ. सुमित म्हसकर, भदंत धम्मनाग, डॉ. प्रकाश पवार, डॉ. वैशाली प्रधान आदी मांडणी करणार आहेत. दुसऱ्या दिवशी ५ डिसेंबर रोजी आंबेडकरवादी प्रबोधनातून सामाजिक परिवर्तनः शिक्षण आणि आर्थिक न्याय या विषयावर प्रशांत रणदिवे, डॉ. त्रिनाध, डॉ. प्रशांत बनसोडे सविस्तर मांडणी करणार आहेत. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता एक चळवळ मूकनायक ते प्रबुद्ध भारत या विषयावर डॉ. राजेंद्र गोणारकर, डॉ. रवींद्र चिंचोलकर विषयाची मांडणी करणार आहेत. दि. ४ डिसेंबर रोजी सायंकाळी डॉ. जयभीम शिंदे यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप समारंभ दिनांक ५ डिसेंबर रोजी होणार आहे. या समारोपाला माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अमेरिका येथील टेक्सास विद्यापीठातील डॉ. स्कॉट स्ट्राऊड मार्गदर्शन कणार आहेत. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. तेजस्विनी कांबळे, प्रा. सागर राठोड, डॉ. अंबादास भास्के, प्रा. विठ्ठल एडके उपस्थित होते.

**४०० हून अधिक संशोधक, विचारवंत, अभ्यासकांचा सहभाग**

या आंतरराष्ट्रीय परिषदेत विदेशातील आणि भारतातील देशातील विविध राज्यांतून ४०० हून अधिक संशोधक, विचारवंत आणि अभ्यासक सहभागी होणार आहेत. विविध परिषदेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांच्या विविध पैलूंवर १५० संशोधन पेपरचे सादरीकरण आणि गटचर्चा होणार आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक आणि कायदेशीर क्षेत्रातील डॉ. आंबेडकरांच्या योगदानाचे विश्लेषण या सत्रांमध्ये होईल.



## हत्तुरे महाविद्यालयात व्यक्तिमत्व विकास, किमान रोजगार क्षमता कौशल्य शिबीर

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
**तभा वृत्तसेवा,**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तरे कनिष्ठ महाविद्यालय हत्तुरे नगर व कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभाग, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त व्यक्तिमत्व विकास व किमान रोजगार क्षमता कौशल्य शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिरास महाविद्यालयाचे मार्गदर्शक धरेपा हत्तुरे,प्र. प्राचार्य रमेश दिंडोरे, प्रमुख व्याख्याते ड्रीम फाउंडेशनचे अध्यक्ष काशिनाथ भतगुणकी, जिल्हा कौशल्य विकासचे समन्वयक सिद्धप्पा बनसोडे, एम प्रोफेशनल तृष्णा गायकवाड, जिल्हा कौशल्य विकासचे कर्मचारी रेश्मा विद्याधर, सुहास डोईफोडे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते प्रमुख अतिथींचे शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी लखन भिंगे, श्रेयस कांबळे, प्रिया लिगाडे आदी विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्वाचा विकास करत स्वतः मधील कौशल्याचा विकास करू अशी ग्वाही दिली. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा.प्रशांत हरके,विरेश हचडे व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक अनिलकुमार गावडे यांनी केले, सूत्रसंचालन रमेश आगवणे यांनी केले. प्रा. लक्ष्मीकांत पनशेट्टी यांनी आभार मानले.

## भगवान अय्यप्पास्वामींच्या दीक्षेस प्रारंभ

### भगवान अय्यप्पास्वामी अन्नदान सेवा संघातर्फे १०४ भक्तांनी केले माळधारण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

अक्कलकोट रोड एमआयडीसीमधील श्री अय्यप्पास्वामी अन्नदान सेवा संघातर्फे आयोजित श्री अय्यप्पास्वामी दीक्षा कार्यक्रमास सोमवारपासून प्रारंभ झाला. यामध्ये १०४ भक्तगण सहभागी झाले आहेत.



माळधारण करुन या दिक्षेचा प्रारंभ करण्यात आला.देशभरात कार्तिक पौर्णिमा ते मकरसंक्रांती या कालावधीत श्री अय्यप्पास्वामींचे भक्त ४८ दिवसांची मंडल दीक्षा (व्रत) घेतात. या दीक्षेचा प्रारंभ माळधारणेने करण्यात येतो. सोलापुरात श्री अय्यप्पास्वामींचे हजारो भक्तगण आहेत. यापैकी शेकडो भक्त गट स्थापून सामूहिक दीक्षा घेतात. याअंतर्गत श्री अय्यप्पास्वामी अन्नदान सेवा संघातर्फे सोमवार, दि. १ डिसेंबर रोजी श्री धर्मशास्ता चॅरिटेबल ट्रस्ट श्री अय्यप्पास्वामी मंदिर येथे पहाटे ६ वाजता माळधारण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंदिरातील आचार्य आनंद गुर्रम, वसंत गोसकी व रचन भंडारी यांच्या हस्ते दिक्षेत सहभागी होणाऱ्या भक्तांना माळ घालण्यात आला. याप्रसंगी संघाचे संस्थापक सत्यनारायण भंडारी,अध्यक्ष रचन भंडारी, उपाध्यक्ष प्रकाश चन्ना, खजिनदार भूमण्णा कोंडी, सचिव अरविंद जिल्ला, विश्वस्त नरेश भंडारी, विकास पलगंटी, रमेश गरदास, श्रीनिवास सुरा, वासुदेव शेरला, नरेश मैले, विशाल नल्ला, आयलेश यल्ला, सुहास पल्ली उपस्थित होते.

**दीक्षा कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन**

दिक्षेच्या ४८ दिवसांच्या कालावधीत संघातर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, वृक्षारोपण, शालेय साहित्य वाटप, भजन कार्यक्रम व सत्संग व गुरुचरित्र पारायण तसेच अन्नदान सेवा संघाचा १८ वा वर्धापन दिन कार्यक्रम, गुरुस्वामींचा सत्कार तसेच ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराज यांचे ६८ लिंग प्रदक्षिणा आदी कार्यक्रमांचा समावेश आहे, असे अध्यक्ष रचन भंडारी यांनी यावेळी सांगितले.

## महापरिनिर्वाण दिनी विशेष रेल्वे सोडावी

### विविध संघटनांची रेल्वे विभागीय वाणिज्य व्यवस्थापकांकडे मागणी
### महापरिनिर्वाण विशेष रेल्वेगाडी प्लॉटफॉर्म नं.१ वरुन सोडण्यात यावी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शुक्रवारी दि. ५ डिसेंबर रोजी सोलापूरहून मुंबईला जाण्यासाठी विशेष रेल्वेगाडी सोडण्याची मागणी विविध संघटनांकडून करण्यात आलीय.

या मागणीचं निवेदन सोलापूर जिल्हा रेल्वे प्रवासी संघटना, आधुनिक भारत रेल्वे असंघटीत कर्मचारी संघटना आणि भिमप्रेमी, समविचारी विविध संस्था आणि संघटनांचे अनेक पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी येथील रेल्वे कार्यालयाच्या विभागीय वाणिज्य व्यवस्थापकांना दिले.

सोलापूर जिल्हा आणि आसपासच्या परिसरातून अनुयायी हजारोंच्या संख्येने चैत्यभूमि मुंबईकडे जात असतात. त्यांच्या प्रवासी सुविधेसाठी अनुयायांसाठी दरवर्षी प्रमाणे यंदाही महापरिनिर्वाण दिनी सोलापूरहून मुंबई विशेष रेल्वे गाडीची सुविधा उपलब्ध करून द्यावी, त्याचबरोबर ५ डिसेंबर रोजी सोलापूरहून मुंबईला निघणारी विशेष रेल्वे संपूर्ण देशास स्वच्छतेचा संदेश देत आपल्या नियोजनानुसार वेळेवर निघून निर्धारीत वेळेत मुंबईला पोहोचावी. महापरिनिर्वाण विशेष रेल्वेगाडी सोलापूर रेल्वे स्थानकावरुन प्लॉटफॉर्म नं. ०१ वरुन सिध्देश्वर एक्सप्रेसच्या आगोदर सोडण्यात यावी, अचानक प्लॉटफॉर्म नं. ०१ चा बदल झाल्यास त्यात अनुयायांची पळापळ धावपळ होऊन त्याचा सुरक्षा व्यवस्थेवर ताण पडतो. त्यातून लहान-सहान अपघाताची शक्यता असते. या विशेष गाडीची मुंबईकडे निघण्याची वेळ दि. ५ डिसेंबर रोजी रात्री ९.०० अशी असावी. परतीच्या प्रवासाकरीता दि. ६ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून रात्री ११.४५ वाजता सोडून सोलापूर येथे दि. ७ डिसेंबर रोजी सकाळी ८.०० वाजता पोहोचावी. ग्रामीण भागातील भिम अनुयायांची मागणी विचारात घेऊन विशेष गाडी मोहोळ, माढा, जेऊर, दौंड, पुणे, कल्याण, ठाणे येथे थांबे मंजूर करावेत. प्रवासात अनुयायांची गैरसोय होऊ नये, याकडे रेल्वे प्रशासनाने विशेष लक्ष द्यावं, असंही निवेदनात नमूद आहे. विशेष गाडी प्लॅटफॉर्म नं. ०१ वरून सिध्देश्वर एक्सप्रेसच्या आगोदर सोडली तरीही पुढे मध्येच कुठेतरी सिग्नलला थांबवत असतात, असे होऊ नये यासाठी रेल्वे प्रशासनास सक्त सूचना देण्यात यावी, यावेळी संजय पाटील, राशिद शेख, निता सोनवणे, दिपक बनसोडे, अस्लम शेख, गौतम कांबळे, सुरज साबळे, अशोक रजपुत, मयुर भोज, रोहित अंबुरे, रमेश पवार, ऋषिकेश जोगळेकर आणि सतिश लोकरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.




## गुरुचरित्र पारायण सप्ताहाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

पूर्व विभाग दत्त मंदिरात श्री दत्त जयंतीच्या औचित्याने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीदत्त उपासना गुरुचरित्र पारायण सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले असून हा पवित्र सप्ताह २६ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत भक्तिमय वातावरणात संपन्न होत आहे.

सप्ताहाच्या प्रारंभी अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा या जयघोषाने परिसर दुमदुमला. पारायणासाठी २०० पेक्षा अधिक भक्तांनी सहभाग नोंदविला. पारायण सप्ताह गोविंद तुम्मा महाराज, अंजनेयलू दुस्सा व गणेश देवसानी यांच्या नेतृत्वाखाली शिस्तबद्धरीत्या पार पडत आहे. कार्यक्रम सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मंदिराचे व्यवस्थापक श्रीनिवास गरदास, न्यानेश्वर वल्लमदेशी, हरी गौडा यांनी मनापासून परिश्रम घेतले असून भक्तांच्या सोयीसाठी सर्व व्यवस्था करण्यात आल्या आहेत. देवस्थानचे संस्थापक दत्तात्रय सिंघम व अध्यक्ष महेश देवस्थान यांच्या मार्गदर्शनाखाली पारायण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाच्या दरम्यान दररोज नामस्मरण, सत्संग व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून २ डिसेंबर रोजी सप्ताहाचा समारोप सोहळा पार पडणार आहे.

## सीईओंचे ग्रामपंचायत विभागाकडे दुर्लक्ष



**जिल्हा परिषदेतून**
**अमोगसिध्द मुंजे**
**मो. 9423535294**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या पारदर्शक कारभारामुळे जिल्हा परिषदेतील सर्व विभागांच्या बदली प्रक्रीया सुरळीत पार पडल्या. शिवाय नागरिकांच्या अडचणी समजावून घेऊन त्यांची सोडवणूक करीत असल्याने त्यांच्या स्वच्छ व पारदर्शक कारभाराची सर्वत्र चर्चा होत आहे. मात्र ग्रामपंचायत विभागातील रखडलेली ग्रामसेवक पदभार प्रक्रीया, दक्षिणच्या विस्तार अधिकाऱ्यावरील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई व बार्शी येथील ग्रामसेवक आत्महत्या प्रकरणातील अधिकाऱ्यांचा सहभाग याकडे सीईओंचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे सीईओंच्या पारदर्शक कामकाजाला गालबोट लागत असल्याने कर्मचाऱ्यांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

जून महिन्यात जिल्ह्यातील ७४ ग्रामसेवकांची बदली प्रक्रीया पार पडली. यामुळे अनेक वर्षे एकाच गावात ठाण मांडून बसलेल्या ग्रामसेवकांना सीईओंनी दणका दिला. त्यामुळे सीईओंचे सर्वत्र कौतुक करण्यात येत होते. मात्र बदली होऊन सहा महिने होत आले तरी अद्याप चार ते पाच निगरघट्ट ग्रामसेवकांनी पदभार न दिल्याने बदली प्रक्रीयेला गालबोट लागत आहे. अनेक ग्रामसेवकांनी बदली आदेश पडल्यानंतर त्वरीत पदभार दिला. मात्र काही ग्रामसेवकांनी सीईओंच्या बदली आदेशाला आव्हान देत सहा महिन्यानंतरही पदभार दिलाच नाही. त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी सीईओ त्या विषयाला बगल देताना दिसून येत आहेत. त्यामुळे ग्रामसेवक पदभार रखडला असून गावाच्या विकासावर परिणाम होत आहे. त्यामुळे सीईओंची बदली प्रक्रीया पारदर्शक आहे का? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

मंजूर कामाचे बिल काढण्यासाठी दोन हजाराची लाच घेताना ३० ऑक्टोबरला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दक्षिणच्या विस्तार अधिकाऱ्यावर कारवाई केली. त्यामुळे ग्रामपंचायत विभागात लाचखोरी असल्याचे दिसून येत आहे. मात्र या विस्तार अधिकाऱ्याला नियमानुसार त्याच दिवशी निलंबित करणे बंधनकारक असताना त्याला निलंबित करण्यासाठी १७ दिवसांचा कालावधी लागला. यावेळी कारवाई करताना अधिकाऱ्यांकडून चालढकल होत असल्याचे दिसून आल्याने सीईओंनी स्वता १७ नोव्हेंबरला त्या लाचखोर विस्तार अधिकाऱ्याला निलंबित केले. मात्र लाचखोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर निलंबित करण्यासाठी १७ दिवस विलंब होण्याचे कारण काय? ग्रामसेवक अथवा कर्मचाऱ्यांवर लाचखोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर त्वरीत निलंबित आदेश काढणाऱ्या ग्रामपंचायत विभागाकडून जाणीवपूर्वक विलंब करण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे सीईओंनी सरकारी कामात दिरंगाई करणाऱ्या व लाचखोरीसारख्या गंभीर गुन्ह्याला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. आठवड्यापूर्वी बार्शी येथील ग्रामसेवकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली. या ग्रामसेवकाला वरिष्ठ अधिकाऱ्याकडून वारंवार त्रास देण्यात आल्याने त्यांनी आत्महत्या केल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे त्या ग्रामसेवकाचे कुटुंब उघड्यावर आला आहे. यावेळी त्रास देणाऱ्या अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल होऊ नये म्हणून त्या कुटुंबावर दबावही आणल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे पुन्हा चुकीच्या कामाला पाठीशी घालण्याचे काम वरिष्ठ अधिकारी व राजकीय नेते करीत होते. वास्तविक पाहता ग्रामपंचायत विभागाचे प्रमुख म्हणून सीईओंनी या प्रकरणातील अधिकाऱ्यावर कारवाई करणे गरजेचे असताना त्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. त्यामुळे एक प्रकारे त्रास देणाऱ्या अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचे काम जिल्हा परिषद प्रशासनाकडून होत असल्याचे दिसून येते. जिल्हा परिषदेतील ग्रामपंचायत विभागातील प्रशासन अधिकारी झेड.ए. शेख यांचीही बदली होऊन सहा महिने झाले . मात्र अद्याप ते पदभार देण्यास तयार नाहीत. त्यांच्यामुळे ग्रामसेवक पदभार प्रक्रीया रखडल्याची चर्चा सुरू आहे. याबाबत सीईओंकडे विचारणा केली असता ग्रामपंचायत विभागात अनुभवी अधिकारी नसल्याने त्यांची पदभार प्रक्रीया थांबविल्याचे सांगण्यात येते. मात्र यामुळे प्रशासनाचे आदेश प्रमाण मानून व बदली होऊन अन्य ठिकाणी काम करणाऱ्या ग्रामसेवक व अधिकाऱ्यावर अन्याय होत आहे. सीईओंच्या ग्रामपंचायत विभागाकडील दुर्लक्षामुळे या विभागात मनमानी कारभार सुरू असल्याचे दिसून येते. त्यामुळे सीईओंनी रखडलेली ग्रामसेवक पदभार प्रक्रीया पूर्ण करून व आत्महत्या प्रकरणातील अधिकाऱ्यांवर कारवाईसाठी पाठपुरावा करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# मैंदर्गी, दुधनी व अक्कलकोट येथे चुरस

## तिन्ही ठिकाणी ६५ सदस्यपदासाठी १७३ जण रिंगणात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१ डिसेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील अक्कलकोट नगरपरिषद दुधनी, मैंदर्गी नगरपालिकेसाठी मंगळवार दि. २ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० पासून ५.३० पर्यंत मतदान होणार आहे. अक्कलकोट नगरपरिषद नगराध्यक्ष पदासाठी प्रमुख लढत भाजपा विरोधात सत्ताधारी महायुतीतील शिंदे शिवसेनेत होत आहे. कॉंग्रेस, उबाठा शिवसेना, राष्ट्रवादी (शप) गट, अपक्ष यांचे उमेदवारही नगराध्यक्षपदासाठी रिंगणात आहेत. २५ सदस्यांकरिता ७६ उमेदवार भाग्य आजमावित आहेत. मैंदर्गी नगराध्यक्षपदासाठी भाजपा विरोधात स्थानिक गट यांच्यात दुरंगी लढत असून यंदा भाजपाचा नगराध्यक्ष होईल याकडे लक्ष लागले आहे. मैंदर्गी नपा च्या२० सदस्या करिता ४४ उमेदवार रिंगणात आहेत.

दुधनी नगराध्यक्षपदासाठी पाच उमेदवार व २० सदस्यासाठी ५३ उमेदवार भाग्य आजमावित आहेत. अक्कलकोट नगरपरिषद नगराध्यक्षपदासाठी भारतीय जनता पार्टी तर्फे मिलन कल्याणशेट्टी, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस कडून अशपाक बळोर्गी, शिवसेना शिंदे गटातर्फे रईस टिनवाला, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटातर्फे बाबासाहेब जाधव, शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तर्फे शरद पवार गटातर्फे इकरार शेख, अपक्ष म्हणून नागनाथ उमदी हे निवडणुकीच्या मैदानात आहेत. अक्कलकोट नगरपरिषदेच्या २५ सदस्याकरिता ७६ उमेदवार भाग्य आजमावित आहेत.




अक्कलकोट नगरपरिषद निवडणूककरिता १२ प्रभागात ४४ मतदान केंद्र आहेत. ४४ मतदान पथके असून सोळा राखीव पथके आहेत.

या पथकात प्रत्येकी ५ कर्मचारी एक पोलीस कर्मचारी आहेत. निर्मला राजे कन्या प्रशाला बूथ क्रमांक ७ / १ पिंक बूथ आहे. अक्कलकोट नगरपरिषद निवडणुकसाठी एकूण मतदार ३८ हजार ४४२ मतदार मतदानास पात्र आहेत अशी माहिती प्रशासक तथा मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी दिली.

### मैंदर्गीत नगराध्यक्षसाठी दुरंगी

मैंदर्गी नगराध्यक्ष पदासाठी भाजपाकडून अंजली बाजारमठ, विरोधात स्थानिक गटातर्फे शिवम्मा पोतेनवरू यांच्यात सरळ लढत आहे. मैंदर्गी नपाच्या २० सदस्या करिता ४४ उमेदवारात लढत आहे.

### दुधनी नगराध्यक्षसाठी ५ जणांत लढत

दुधनी नगराध्यक्षपदासाठी शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तर्फे राजेद्र इंगळे, रेखा गद्दी, कॉंग्रेस तर्फे महेश बाहेरमठ, भाजपा तर्फे अतुल मेळकुंदे, शिवसेना शिंदे गटाकडून प्रथमेश म्हेत्रे यांच्यात लढत आहे. दुधनी नपा च्या २० सदस्या करिता ५३ उमेदवार भाग्य आजमावित आहेत .

## महत्वाचे...




### राष्ट्रीय स्तरावरील पोस्टर सादरीकरण स्पर्धेत सोजर फार्मसीचे यश

**बार्शी, दि. १ डिसेंबर-**

केशवराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, धाराशिव यांच्यावतीने २९ नोव्हेंबर रोजी आयोजित पहिली राष्ट्रीय स्तरावरील पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा उत्साहात पार पडली. विविध फार्मसी महाविद्यालयांमधून विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. स्पर्धेत सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, खंडवी येथील डी. फार्मसी द्वितीय वर्षातील विद्यार्थी रिया बाबासाहेब योगे आणि सिमरन इब्राहीम शेख यांनी कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. या विद्यार्थिनींनी मेडिकेशन एरर अँड प्रिव्हेन्शन स्ट्रॅटेजी या महत्त्वपूर्ण विषयावर आकर्षक, माहितीपूर्ण व वैज्ञानिक मांडणी करुन परीक्षकांची प्रशंसा मिळवली. त्यांच्या सादरीकरणामध्ये औषधांच्या चुका कशा होत असतात, त्यांचे रुग्णांवर होणारे दुष्परिणाम तसेच प्रतिबंधात्मक उपाय यांचे सुटसुटीत आणि प्रभावी विवेचन करण्यात आले. सदर विद्यार्थिनी महाविद्यालयाचे अधिव्याख्याता डॉ. स्वप्नील पौळ यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. सुजित करपे, संस्थेचे अध्यक्ष अरुण बारबोले व सचिवा कल्पना बारबोले यांनी अभिनंदन केले.



### शिवसेना ग्रंथालय सेलचे राज्य अध्यक्ष देशमुख यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १ डिसेंबर-**

शिवसेना ग्रंथालय सेलचे राज्य अध्यक्ष बी.जी. देशमुख यांचा शिवसेना संपर्क कार्यालयात शिवसेना तालुकाप्रमुख बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बी. जी. देशमुख यांनी रविवारी नगर परिषद निवडणूकी संदर्भात शिवसेना कार्यालयास भेट देऊन ग्रंथालय संघटनेच्या पदाधिकाऱ्याचीं भेट घेतली. याप्रसंगी शिवसेना ग्रंथालय सेलचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष दीपक गिरी, सोलापूर जिल्हा अध्यक्ष देविदास राठोड, दत्तात्रय बाबर, बसवराज अल्लोळी, हमीद गिलकी, चव्हाण , पिरजादे, पत्रकार नंदकुमार जगदाळे, स्वामीराव गायकवाड, राजेश जगताप, शिवसेना ज्येष्ठ नेते पुजारी आदी उपस्थित होते.



### ऊसतोड मजुरांचे झोपडी जळून भस्मसात; 'आपुलकी'कडून मदत

**सांगोला, दि. १ डिसेंबर**

अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यातील दिया या गावचे चंदुलाल मुनशी मावसकर व त्यांचे नातेवाईक ऊस तोडणीसाठी सांगोला तालुक्यात गेल्या महिन्याभरापासून फिरत आहेत. वाढेगाव मेडशिंगी रस्त्यावर ऐवळे यांच्या शेताजवळ त्यांचा सध्या मुक्काम आहे. शुक्रवारी दुपारी ऊस तोडणीसाठी गेल्यानंतर राहत असलेल्या पालाला / झोपडीला आग लागून संपूर्ण झोपडी भस्मसात झाली. झोपडीत असलेले अन्नधान्य, कपडे, अंथरून, पांघरून जळाल्यामुळे मोठे नुकसान झाले. या घटनेची माहिती प्रा. सहदेव ऐवळे यांनी सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानला दिल्यानंतर प्रतिष्ठानने त्यांना तातडीची मदत म्हणून ब्लँकेट, बेडशीट व किराणा माल देऊन मदत केली. यावेळी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, कैलास कांबळे, दत्तात्रय नवले, अमर कुलकर्णी आदींसह ऊसतोड मजूर उपस्थित होते. यावेळी हायकोर्टाचे ॲड.बी.आर.माने म्हणाले, कसलाही संबंध नसताना केवळ आपुलकीच्या भावनेतून जळीतग्रस्तांना अगदी वेळेत योग्य ती मदत केली आहे. प्रा.सहदेव ऐवळे यांनीही आपुलकी प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक केले.

### पिलीव बसस्थानकावरील अतिक्रमण काढा; मधु भिसन यांची मागणी

**पिलीव, दि. १ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव बसस्थानकावरील अस्ताव्यस्त फळांच्या गाड्या तसेच वाहनांमुळे प्रवाशांसह नागरिकांनी अक्षरशः कसरत करावी लागत आहे. याबाबत पिलीव पोलीस ठाण्यात मधु भिसन यांनी रितसर लेखी निवेदन दिले आहे. या निवेदनात बचेरी चौक, अहिल्यादेवी चौक व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयासमोरील अतिक्रमणाबाबत समस्या मांडली आहे. सामान्य नागरिक तसेच विद्यार्थी यांना बसस्थानकावरुन वावरणे अक्षरश मुश्कील झाले आहे. वाहतुकीची प्रचंड मोठी कोंडी यामुळे बसस्थानकावर होत आहे. याबाबत कोणीही कसल्याच उपाययोजना करीत नाहीत यामुळे याचा सर्व सामान्यांना प्रचंड त्रास होत आहे. फक्त व्यापाऱ्यांचे गाळे हा विषय नसून अस्ताव्यस्त लावलेल्या दुचाकी तसेच चारचाकी वाहनांमुळे याठिकाणी वाहतूक व्यवस्थाच पूर्णपणे कोलमडली आहे. यावर योग्य त्या उपाययोजना करण्याची मागणी मधु भिसन यांनी केली आहे. याबाबत पोलीस प्रशासन काय निर्णय घेणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अक्कलकोट येथे पोलिसांचे पथसंचलन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ डिसेंबर-**

अक्कलकोट नगरपरिषदेच्या पार्श्वभूमीवर शांतता व सलोखा राखण्यासाठी कुठलीही अनुचित घटना होऊ नये. कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी या दृष्टीने खबरदारी म्हणून अक्कलकोट उत्तर पोलीसांच्या वतीने पोलीस निरिक्षक दिपक भिताडे यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट शहरातील प्रमुख मार्गावरून १०० अंमलदारासह, गृहरक्षक जवान, एसआरपी प्लॅटून, पोलीसांनी पथसंचलन केले.

पोलीस निरिक्षक दिपक भिताडे उपाध्ये सपोनि बागाव विकास पवार पोलीस कर्मचारी यामध्ये सामिल होते. उत्तर पोलीस स्थानक कारंजा चौक, कापड बाजार, वीर सावरकर चौक, समर्थ चौक, फत्तेसिंह चौक मार्गे पथसंचलन करण्यात आले. अक्कलकोट नगर परिषद निवडणुक निमित्ताने पोलीसांनी शहरातील प्रमुख मार्गावरुन पथसंचलन करण्यात आले. एस.आरपी प्लॅटुन होमगार्ड १०० अंमलदार या पथसंचलनात सहभाग घेतल्याचे पोलीस निरिक्षक दिपक भिताडे यांनी सांगितले निवडणुक शांततेत पार पडण्यासाठी पोलिस यंत्रणा तज्ञ असल्याचे पोनि भिताडे यांनी सांगितले.




# कृषीसेवा राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा

## शेतकऱ्यांना प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

## एक जानेवारीला वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त २३ डिसेंबर रोजी प्रथमच लोकमंगल कृषीसेवा राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ चे आयोजन करण्यात येत आहे. या पुरस्कारासाठी राज्यातील नामांकित आणि नाविन्यपूर्ण प्रयोगिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत, अशी माहिती लोकमंगल समूहाचे संस्थापक अध्यक्ष तथा आमदार सुभाष देशमुख यांनी दिली. दरम्यान, दि. १ जानेवारी २०२६ रोजी या पुरस्कारांचे वितरण होणार आहे, असेही त्यांनी सांगितले



या पुरस्कारात पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा कोकण आणि विदर्भ या पाच विभागांमधून स्पर्धकांची निवड केली जाणार असून प्रत्येक विभागातून प्रथम व द्वितीय असे दोन उत्कृष्ट शेतकरी निवडले जातील. प्रथम पुरस्कार ३१ हजार व सन्मानचिन्ह, द्वितीय पुरस्कार २१ हजार व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असणार आहे. याशिवाय सोलापूर जिल्ह्यामधील सर्वोत्कृष्ट तीन शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र पुरस्कार ठेवण्यात आले असून

प्रथम १५ हजार द्वितीय रु. १० हजार, तृतीय ५ हजार रोख व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. शेती क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, प्रायोगिक शेती, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर, शाश्वत शेती पद्धती, शेती व्यवसायातील दर्जेदार नियोजन, तसेच समाजाभिमुख उपक्रम या निकषांवरून शेतकऱ्यांची निवड होईल. या पुरस्कारासाठी फक्त शेतकऱ्यांचाच विचार होणार असून शेतकरी नसलेल्या व्यक्तींचे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत, असे लोकमंगलकडून स्पष्ट करण्यात आले आहे. राज्य आणि जिल्हास्तरीय निवड समितीमध्ये कृषी विद्यापीठांचे माजी अधिकारी, **NBRD** अधिकारी, कृषी विज्ञान केंद्रांचे तज्ज्ञ व पत्रकार यांचा समावेश असून संपूर्ण पारदर्शक निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. प्रस्ताव पाठविण्याची शेवटची तारीख २० डिसेंबर २०२५ आह. अर्ज लोकमंगल कृषी व्यावसाय व्यवस्थापन महाविद्यालय, वडाळा येथे उपलब्ध असून तेथून सबमिट करावेत. लोकमंगल कृषी राज्यस्तरीय पुरस्कार समितीने राज्यातील सर्व जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या स्पर्धेसाठी अर्ज करण्याचे आवाहन केले आह.

# कर्मवीर जगदाळे मामा यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ डिसेंबर-**

वखारिया विद्यालयात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त प्राथमिक गटाच्या विविध स्पर्धा उत्साहात झाल्या.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांची जयंती दरवर्षी दि. ४ फेब्रुवारी रोजी समाज दिन म्हणून साजरी केली जाते. त्यापूर्वी संस्थेच्या विविध शाखांमधून पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन स्तरावर विविध स्पर्धा घेण्यात येतात. यावर्षी प्राथमिक गटाच्या स्पर्धांचे आयोजन वखारिया विद्यालयात २८ व २९ नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते. शुक्रवार २८ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, माजी उपसभापती बापूसाहेब बुरगुटे, मनोज बुरगुटे, किरण महानवर, किरण सोनवणे, भागवत कसबे, दत्तात्रय गुरव, केंद्र प्रमुख हनुमंत सोनावणे, नागनाथ शेरकर, माजी सरपंच यशवंत बुरगुटे, धनंजय ताटे, सतीशकुमार बुरगुटे यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे दीपप्रज्वलन करुन उद्घाटन करण्यात आले.

प्रारंभी मान्यवरांचे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सवाद्य, टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. याप्रसंगी मुख्याध्यापक दयानंद रेवडकर आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला. पहिल्या दिवशी २८ नोव्हेंबर रोजी निबंध, वक्तृत्व, हस्ताक्षर, चित्रकला, रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेचे दत्तात्रय गुरव, कुरुंद, सिद्धेश्वर शिंदे, जि.प. मुलींच्या शाळेतील कुंभार, उलभगत, मंगरुळ (तुळजापूर), प्रशालेचे सहशिक्षक साहित्यिक शेख यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.




# जिजाऊ गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचा दिल्ली अभ्यास दौरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३० नोव्हेंबर-**

जिजाऊ गुरुकुल, खांडवीतर्फे आयोजित करण्यात आलेला दिल्ली शैक्षणिक अभ्यास दौरा विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरला आहे. विद्यार्थ्यांना भारताची संस्कृती, इतिहास आणि प्रशासन यांचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना पुस्तकाबरोबरच प्रत्यक्ष जगाचा अनुभव मिळणे आवश्यक आहे. दिल्लीसारख्या प्रशासनिक राजधानीचे दर्शन विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाला नवी दिशा देणारे ठरते. आठ दिवसांच्या या दौऱ्यात विद्यार्थ्यांनी इंडिया गेट, राजघाट, जंतर मंतर, राष्ट्रपती भवन, संसद भवन, कुतुब मिनार, लोटस टेंपल, अक्षरधाम मंदिर तसेच लाल बहादूर शास्त्री, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी स्मृती संग्रहालये या स्थळांना भेट दिली. विद्यार्थ्यांनी राष्ट्रपती भवनातील सुरक्षा यंत्रणा, तंत्रज्ञानयुक्त हॉल्स, पुरस्कार वितरण स्थळे आणि प्रशासनिक व्यवस्था प्रत्यक्ष पाहून भविष्यातील ध्येय निर्धारणाला नवी दिशा मिळाल्याचे सांगितले. डायरेक्टर संदेश कदम यांनी सांगितले की, हा प्रवास फक्त सहल नव्हे तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा एक समृद्ध अध्याय आहे. दौऱ्याचे नियोजन सचिवा वर्षा घाडगे, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम आणि नियोजन व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाखाली जे. बी. शिंदे, शिवराज चौगुले आणि भैरू जाधव यांनी केले.

# गुजरातमध्ये होणार पद्मशाली मेळावा

**सोलापूर, दि.३० नोव्हेंबर-**

पद्मशाली समाजातील युवकांच्या अनेक प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी दि.७ डिसेंबर रोजी पद्मशाली समाज बांधवांचा मेळावा गुजरात येथे आयोजित करण्यात आला आहे. अखिल भारतीय पद्मशाली युवजन संघम यांच्या वतीने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

विविध राज्यात पद्मशाली समाजाचे युवक आणि त्यांचे कुटुंब वास्तव्य करते. अशा परिस्थितीत इतर राज्यात वास्तव करणाऱ्या पद्मशाली समाजासमोर येणाऱ्या अडचणी सोडवण्यासंबंधित विचार विनिमय या मेळाव्यात केला जाणार आहे. तसेच पद्मशाली समाजातील युवकांचे रोजगाराचे प्रश्न देखील यात सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे या मेळाव्यास पद्मशाली समाजातील युवकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन श्रीनिवास संगा यांनी केले आहे.

# सुस्ते येथे खंडोबाची यात्रा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सुस्ते दि. १ डिसेंबर-**

पंढरपूर तालुक्यातील सुस्ते येथील श्री खंडेरायाची यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली.श्री खंडेरायाची घटस्थापना १६ नोव्हेंबर रोजी करण्यात झाली. परंपरेप्रमाणे देवाचे नऊ दिवस नऊ माळा घालून आरती व पूजा उत्साहात करण्यात आली.

यात्रेमुळे विद्युत रोषणाईने खंडोबाचे मंदिर सजवले होते. मंगळवार दि.२५ रोजी देवाच्या घोड्याची गावातून पारंपारिक वाद्य हलगी व फाटक्याची आतिषशबाजी करतीत छबिना काढण्यात आला. यावेळी येळकोट येळकोट जय मल्हार च्या जयघोषात संपुर्ण गाव दणाणून गेले होते.रात्री वाघ्या मुरळीचा जागरण गोंधळाचा कार्यक्रम झाला या कार्यक्रमाला भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पहाटे तीन वाजता लगंर तोडून कार्यक्रमाचे सांगता झाली.२६ रोजी मंदिरात दिवसभर भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यात्रेचे औचित्य साधून येथील राजन किड्स स्कूल,चोरमाळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वस्ती आणि अंगणवाडीतील मुलांना यात्रा कमिटीच्यावतीने प्रसादाचे वाटप करण्यात आले.






# डोणगाव येथे मधमाशी पालन प्रशिक्षण

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

युगंधर फाऊंडेशन सोलापूर आणि खादी ग्रामोद्योग आयोग यांच्या केंद्रीय मधमाशी पालन आणि संशोधन केंद्र पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय मधमाशी पालन प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील डोणगाव येथील सावित्रीबाई फुले महिला बचत गटाच्या मार्फत हे प्रशिक्षण २५ ते २९ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात आले होते. यामध्ये २१ महिलांनी सहभाग नोंदविला. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलाना आर्थिक सक्षम आणि त्यांच्या मधून नव उद्योजन निर्माण व्हावेत यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. या प्रशिक्षणामध्ये मधमाशीचे जीवन चक्र मधु उत्पादने तसेच खादी ग्रामोद्योग आयोगाच्या विविध योजना यांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे, अशी माहिती फाऊंडेशनच्या अध्यक्ष प्राध्यापक रेश्मा माने यांनी दिली. भविष्यात सोलापूर जिल्ह्यात मध उत्पादन वाढविणे तसेच या माध्यमातून महिलाना आर्थिक सक्षम करणे मधमाशी साठी नैसर्गिक अधिवास वाढविणे शेतकरी आणि नागरिकांच्या मध्ये मधमाशी विषयी भीती कमी करून त्यांचे संगोपन व संरक्षण करण्यासाठी युगंधर फाऊंडेशन प्रयत्नशील आहे.

# बासलेगाव येथील श्री जगदंबा देवी मूर्ती प्राणप्रतिष्ठापनेनिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ डिसेंबर-**

तालुक्यातील बासलेगाव येथील श्री जगदंबा देवी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना डॉ. श्री शिवाचार्यरत्न जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात बुधवार ३ ते ५ डिसेंबर दरम्यान असे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्री तुळजाभवानी मंदिर समिती च्यावतीने देण्यात आली आहे.



बुधवार, दि. ३ डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजता श्री लक्ष्मी मंदिर येथून देवीच्या डोंगराकडे मूर्तीची मिरवणूक, रात्री भजन, जागरण व पारंपारिक ढोल वाद्यासह जागरण कार्यक्रम त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप होणार आहे. गुरुवार, दि. ४ डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता रोगरावरील श्री जगदंबा देवी मंदिर येथून गावातील प्रमुख मार्गावरून जलकुंभ सुहासिनीसह श्री जगदंबा देवी मूर मिरवणूक संपन्न होणार आहे. दुपारी बारा वाजता मूर्ती प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रमास सुरुवात होईल व रात्री भजन पारंपारिक ढोलवद्यासह जागरण कार्यक्रम व महाप्रसादाचे वाटप होणार आहे. शुक्रवार ५ डिसेंबर रोजी पहाटे चार वाजता मूर्तीची मुख्य प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रमास सुरुवात होईल सकाळी ८ वाजता मूर्तीच्या झाला अभिषेकसाठी गावातील विहीर ते देवीच्या मंदिरापर्यंत भव्य जलकुंभ व महाआरती संपन्न होणार आहे. सकाळी ११ वाजता मंदिरातील मुख्य गर्भग्रहात श्री जगदंबा देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रम होईल त्यानंतर दुपारी १२ वाजता आलेल्या सर्व देवी भक्तांसाठी महाप्रसादाची सोय करण्यात आलेली आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





## बार्शीत अल्पवयीन मुलीने ओढणीने घेतला गळफास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१ डिसेंबर-**

परांडा रोड वैदवस्ती येथे अल्पवयीन मुलीने अज्ञात कारणावरुन पत्राशेडच्या घरातील लोखंडी एँगला ओडणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे.

ही घटना दि. १ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १२.३० च्या दरम्यान



घडली. मीनाक्षी ऊर्फ मीना बाबू काळे, वय १६ असे मयत मुलीचे नाव आहे. याबाबत पोलिसांत सोन्या तायाप्पा काळे याने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की शेजारीच चुलत्यांचे कुटुंब राहत असून सकाळी घरातील लोक कामानिमित्त बाहेर पडले होते. दरम्यान दुपारी १२.३० वाजता आजी घरी गेली असता मीनाक्षी हिने पत्राशेडमध्ये लोखंडी अँगलला ओढणीने गळफास घेतल्याचे दिसुन आले. अद्याप अल्पवयीन मीनाक्षीच्या आत्महत्येचे कारण अस्पष्ट असून पोलीस तपास करीत आहेत.

## महत्त्वाचे



### पश्चिम महाराष्ट्र संस्कृतभारतीतर्फे सोलापुरात भाषाबोधन वर्ग संपन्न; ३९ जणांचा सहभाग

**बार्शी, दि.१ डिसेंबर-**

दहा दिवसाचे संभाषण शिबिर झालेल्यांचे भाषाबोधन वर्ग शिवस्मारक येथे दि. ३० नोव्हेंबर रोजी संपन्न झाला. सोलापूर जिल्हा भाषाबोधन वर्गासाठी १५ ते ७० वयोगटातील ३९ विद्यार्थी सहभागी होते. भाषाबोधन वर्गाची सुरुवात सोलापूर जनपद संयोजक निखिल बडवे व्यासपीठावरील इतर मान्यवरांच्या हस्ते भारतमाता प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. ध्येयमन्त्र पठणानंतर प्रत्यक्ष वर्गाला सुरुवात झाली. जितेश सोनार, आनंद कुलकर्णी, श्रुती देवळे, वंदना कुलकर्णी, अश्विनी कुलकर्णी, विजयकुमार काळेगोरे तसेच प्राची कुंटे यांनी व्याकरण आधारित सत्रे घेऊन मार्गदर्शन केले. समारोप सत्रासाठी पश्चिम मध्यक्षेत्रमंत्री डॉ. गजानन अंभोरे यांनी मार्गदर्शन केले. त्यावेळी त्यांनी संस्कृत भाषेच्या प्रचार- प्रसारासाठी प्रत्येकाने आपल्या वेळेचा काही भाग दिला पाहिजे. दातृत्वाची भावना स्वतः मनापासून जागृत करावी, असे विचार मांडले. प्रदीप आर्य यांनी सूत्रसंचालन केले. वर्ग यशस्वीतेसाठी सर्व कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले.

### आज मतदान; प्रचाराच्या तोफा थंडावल्या सर्वच पक्षांनी केले मतदानाचे आवाहन

**कुर्डूवाडी, दि.१ डिसेंबर-**

कुर्डूवाडी नगरपालिका निवडणूकीच्या आज शेवटच्या दिवशी सर्वच राजकीय पक्षाकडून जोरदार प्रचार करण्यात आला. प्रत्येक पक्षाकडून पुढील पाच वर्षाची आपली विकासाबाबत काय भूमिका असेल हे स्पष्ट केले आहे. सर्वांनी कुर्डूवाडीचा विकास आपणच कसा चांगला करू शकतो हे मतदारापुढे होम टू होम, प्रचार रॅली काढत, मोठ्या



नेत्यांच्या सभा घेवून भूमिका मांडली. लोकशाहीच्या या उत्सवात आता जबाबदारी आहे ती मतदार राजांची. आता प्रत्यक्ष मतदान करण्याची वेळी आहे. त्यामुळे, मतदार राजा, सावधान ! जागा हो! लोकशाहीचा एक धागा हो! प्रत्येकाने मतदान कराच पण कोणत्याही राजकीय पक्षाच्या भ्रष्ट, व्यभिचारी, गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे, पैशाचा माज दाखवणारे, दारू पिवून, मावा खावून, रस्त्यावर वारंवार धिंगाणा घालणारे, घाण करणारे, गोरगरीबांच्या हॉटेलवर फुकटचे खाणारे, प्रस्थापीत व घराणेशाहीमधून आलेल्या हुल्लडबाज उमेदवारांना, जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करणारे, जातीयवादी विशेषता पुन्हा पुन्हा निवडणूक लढवणा-या, ना-लायक उमेदवारांना मतदान करण्यापेक्षा कोणीही असो गरीब -श्रीमंत पाहू नका, जो प्रत्येकवेळी तुमच्या प्रभागांचा विकास करेल, तुमचे प्रश्न पालिकेत मांडेल, प्रत्येक प्रश्नांची सोडवणूक करेल, अशा प्रामाणीक, लायक उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आज ख-या अर्थाने प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत.

### डिझेल चोरल्याच्या संशयावरून ट्रॅक्टर चालकास बेदम मारहाण; चौघांविरूध्द गुन्हा

**मंगळवेढा, दि.१ डिसेंबर-**

डिझेल चोरल्याच्या संशयावरून ट्रॅक्टर चालक रमेश इंगोले (वय २८ वर्षे,रा.खुपसंगी) याला लाथाबुक्क्यांनी व पाईपने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी महेश महादेव लुगडे, किरण लुगडे, पप्पू आवळेकर (कचरेवाडी), गोटू खरात(पाटखळ) या चौघांविरूध्द पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी रमेश इंगोले हे ट्रॅक्टर चालक असून दि.२८ रोजी सकाळी १०.३० च्या दरम्यान दामाजी साखर कारखाना येथे असताना फिर्यादीने डिझेल चोरल्याच्या संशयावरून वरील आरोपीने जवळ येवून प्लॉस्टिकचे पाईपने मारून गंभीर जखमी केले.तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलिस करीत आहेत.

### चोरी केल्याच्या संशयावरून जातीवाचक शिवीगाळ करीत पाईपने केली मारहाण

**मंगळवेढा, दि.१ डिसेंबर-**

त्रिमुर्ती मशनरी दुकानात चोरी केल्याच्या संशयावरून रवी दाजी कांबळे (वय ३५,रा.साठे नगर) याला बळजबरीने कारमध्ये बसवून अपहरण करून माळेवाडी येथे नेवून लोखंडी पाईप व काठीने मारून गंभीर जखमी केले. तसेच जातीवाचक शिवीगाळ करून दमदाटी केल्याप्रकरणी गणपती सोमुत्ते व अनोळखी दोघे या तीघांविरूध्द गुन्हा



दाखल झाला आहे. पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी अक्षय कांबळे याचा भाऊ तथा जखमी रवी कांबळे याने दि.२९ रोजी पहाटे ४.०० वा. मंगळवेढा येथील त्रिमुर्ती मशनरी दुकानात चोरी केल्याच्या संशयावरून लाथाबुक्क्यांनी मारहाण करून बळजबरीने कारमध्ये बसवून त्याचे अपहरण केले.व माळेवाडी येथे नेवून त्यास लोखंडी पाईप व काठीने मारून गंभीर जखमी करून जातीवाचक शिवीगाळ केल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.याचा अधिक तपास डि.वाय.एस.पी.डॉ.बसवराज शिवपुजे हे करीत आहेत.

## 'स्वच्छ सांगोला, सुंदर सांगोला' कधी होणार? नागरिकांचा प्रश्न

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ डिसेंबर-**

सांगोला नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष व ११ प्रभागातून २३ नगरसेवक पदाच्या निवडणुकीसाठी मंगळवारी दि.२ डिसेंबर रोजी मतदान होत आहे. यानिमित्ताने प्राचाराची रणधुमाळी चांगलीच गाजली. यामध्ये प्रमुख राजकीय पक्षांसह अपक्षांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली होती. सर्वच उमेदवार प्रचारात आपापल्या पद्धतीने निवडून आल्यावर काय करणार ? हे मतदारांना पटवून देत होते. परंतु नागरिकांचा एकच प्रश्न आहे तो म्हणजे 'स्वच्छ सांगोला, सुंदर सांगोला' कधी होणार?




**शहरात अनेक ठिकाणी कचऱ्यांचे ढीग**
सांगोला शहरात प्रत्येक गल्लीत, रस्त्यावर तसेच अनेक कोपऱ्यात कचऱ्याचे ढीग मोठ्या प्रमाणात दिसून येत असून त्यामुळे शहराचे विद्रूपीकरण झाले असून सुंदर सांगोला कधी होणार ? असा प्रश्न नागरिक करत आहेत.



**मोकाट जनावरांचा प्रश्न कायम**
सांगोला शहरात वाडेगाव नाका ते एसटी स्टँड परिसरात तसेच शहरालगत असलेल्या वाड्या वस्त्यांवर मोकाट जनावरांचा मोठ्या प्रमाणात वावर असून त्याच्यावर नगरपालिकेकडून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जातो परंतु तो प्रश्न अजून तसाच आहे. सदर मोकाट जनावरे रस्त्यावरच ठाण मांडून बसतात त्यामुळे दुचाकी चार चाकी वाहनांना चालवताना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. तसेच अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे नुकसान होत आहे.



**ऐतिहासिक ओढ्यातून येतो उग्र वास**
सांगोला शहराच्या मध्यवर्ती भागातून वाहणारा ओढा हा ऐतिहासिक असून पूर्वीच्या काळी येथील पाण्याचा उपयोग सांडपाण्यासाठी केला जात होता असे ज्येष्ठ नागरिक आवर्जून सांगतात. परंतु सध्या या ओढ्यात कचरा साठल्याने वाहणारे पाणी थांबत असल्यामुळे रात्री उग्र स्वरूपाचा वास येत असून त्याचा ओढ्यालगत राहणाऱ्या नागरिकांना खूप त्रास होत आहे. त्यामुळे नागरिकांचा एकच प्रश्न स्वच्छ सांगोला कधी होणार ?



**भुयारी गटारीचे काम प्रगतीपथावर पण धुळीचे साम्राज्य**
सांगोला शहरात ९६ कोटी ६३ लाख रुपयांचे भुयारी गटार योजनेचे काम प्रगतीपथावर असून सदर कामामुळे अनेक ठिकाणी रस्ता खोदल्यामुळे धुळीचे साम्राज्य पसरले आहे. शहराच्या विकासासाठी सदर भुयारी गटारीचे काम चांगले आहे परंतु धुळी मुळे नागरिकांना त्रास होत असून त्यावर तोडगा काढावा अशी नागरिकांची मागणी आहे.



सांगोला शहरातील महापुरुषांच्या स्मारका जवळील स्वच्छता रोज व्हावी. गार्डन, पार्किंग, लहान मुलांना खेळण्यासाठी ग्राउंड, लग्न समारंभासाठी हॉल, प्रत्येक वार्डमध्ये व्यायाम शाळा निर्माण करण्यात यावी. तसेच पाणीपुरवठा रोज व्हावा.

**- विश्वनाथ इंगोले, व्यापारी**



सांगोला नगरपालिका हद्दीतील सर्व रस्ते मोठे झाले पाहिजेत कारण महापुरुषांच्या जयंतीनिमित्त निघणाऱ्या मिरवणुका तसेच गणपती विसर्जन मिरवणुका यावेळी रस्ता लहान पडता, त्यामुळे रस्त्याची अडचण निर्माण होते.

**- विनायक सागावकर, सामाजिक कार्यकर्ते**

## विकास कामे मार्गी लावण्याची जबाबदारी माझी : आ. कल्याणशेट्टी

**● अक्कलकोटमध्ये प्रचाराची सांगता; प्रभाग ११ मध्ये घेतली सभा**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ डिसेंबर-**

अककलकोट तीर्थक्षेत्र विकासाची कामे मार्गी लावण्याची माझी जबाबदारी राहील असा विश्वास देत प्रभाग ११ सह नगराध्यपदावरील भाजपा उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दिले.

प्रभाग क्र ११ मध्ये भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार व प्रभागातील नगरसेवक यांच्या प्रचारार्थ आयोजित प्रचार सभेत आ. कल्याणशेट्टी बोलत होते. यावेळी प्रभाग ११ चे उमेदवार महेश इंगळे, आरती गायकवाड, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, माजी नगरसेवक उत्तम गायकवाड, माजी नगरसेवक आलम कोरबु, पंचायत समितीचे माजी सदस्य सिध्देश्वर मठपती स्वामी, प्रा. शिवशरण अचलेर, प्रथमेश इंगळे आदिंची प्रमुख उपस्थिती होती. अक्कलकोट तीर्थक्षेत्र झपाट्याने बदलत आहे. विकासाची मोठी कामे चालू आहेत. रस्ते, पाणीपुरवठा,



तीर्थक्षेत्र विकासाची सर्व कामे मार्गी लावण्यासाठी आ.कल्याणशेट्टी यांचे मागे भक्कमपणे उभे राहणे गरजेचे आहे यामुळे नगराध्यक्षपदाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी यांना महाराष्ट्रात विक्रमी मतांनी विजयी करण्याची ग्वाही प्रभाग १ चे उमेदवार महेश इंगळे यांनी यावेळी दिली. भाजपाला दिवसेंदिवस लोकांचा प्रचंड पाठिंबा मिळत आहे. पुढेही भाजपाची विजयी कमान वाढतच जाणार असे प्रतिपादन आलम कोरबु यांनी केले. याप्रसंगी भाजपा अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष नन्छु कोरबु, अंकुश केत, राजु एकबोटे, प्रा. अचलेर चित्तरंजन अगरथडे, निवास इंगळे, सागर इंगळे, बाळासाहेब एकबोटे, श्रीकांत झिपरे, संतोष पराणे, प्रविण देशमुख, प्रथमेथ इंगळे मित्रपरिवार, विरेश स्वामी, मनोज जाधव, सोमनाथ सुतार, मनोज इंगोले, अरुण शिंदे, नंदकुमार जगदाळे, सागर गोडाळ, बाबा सुरवसे, दादा सावंत, रवि कदम, चंद्रकांत सोनटक्के, मधुकर सदाफुले, खाजपपा झंपले, भिमा मिनगले, शेटप्पा मिनगले, अभिषेक गुंजले, रवि मलवे, श्रीकांत मलवे, सिद्धू माने, लखन झंपले काशीनाथ मलवे, आप्पाशा मिनगले, मल्लीकार्जुन कुर्ले, हणमंत मिनगले आदि कार्यकर्ते उपस्थित होते.

## पाणी व स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत उद्या बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर -**

राज्यातील पाणी व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नावर चर्चा करण्यासाठी राज्य कृती समितीला उद्या तीन डिसेंबर रोजी मंत्रालयात बैठक बोलाविण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी राज्य कृती समितीचे अध्यक्ष रमांकात जाधव व कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी दिली आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) व जल जीवन मिशन अंतर्गत कर्मचारी यांचे वेतन रखडल्या मुळे व विविध मागण्यांसाठी गुरुवारी राज्यभर काळ्या फिती लावून आंदोलन करण्यात आले. दिनांक १ डिसेंबर पासून धरणे आंदोलन सुरू करण्याचा इशारा देण्यात आला होता. दरम्यान आज पाणी पुरवठा व स्वच्छचा विभागाचे कक्ष अधिकारी वि. आ. जायकर यांनी राज्य कृती समितीला पत्र काढून कर्मचारी यांच्या प्रश्ना बाबत चर्चा करण्यासाठी निमंत्रीत केले आहे. स्वच्छ भारच मिशनचे प्रकल्प संचालक यांचे अध्यक्षतेखाली उद्या ३ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता ही बैठक होणार आहे.

जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षात जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत एकत्रित कर्मचारी काम करीत आहेत. जिल्हा व तालुका स्तरावर काम करणारे कर्मचारी यांचा आकृतीबंध करण्यात



आला नाही. शासनात कायम करणेची मागणी बरोबर या कर्मचारी मासिक वेतन कधीच वेळेवर दिले जात नाही. विभागासाठी प्रशासकीय खर्चासाठी गेल्या वर्षभरापासून निधी उपलब्ध नाही. यामुळे कामावर परिणाम झालेला आहे.

जलजीवन मिशन च्या जिल्हा व तालुका स्तरावरील कर्मचारी यांचे ऐन दिवाळीत तीन महिने वेतन रखडले होते. निधी असूनही स्वच्छ भारत मिशन च्या कर्मचारी यांचे वेतन रखडलेने कर्मचारी यांचे मनात असंतोषाची भावना निर्माण झाली होती. या वरून राज्यभर आंदोलन करण्यात आले आहे. प्रकल्पा साठी निधी आहे मात्र कर्मचारी यांचे वेतना साठी निधी उपलब्ध नाही ही बाब कर्मचारी यांचे मुलभूत हक्कावर गदा आणणारी होती. या सर्व बाबीची दखल घेऊन मंत्रालयात या बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याचे कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड व कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी सांगितले.



## सांगोल्यात किल्ले स्पर्धांचे पारितोषिक वितरण

**शहीद अशोक कामटे संघटनेतर्फे केले होते आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१ डिसेंबर -**

सांगोल्यातील शहीद अशोक कामटे सामाजिक संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या किल्ले स्पर्धांचे पारितोषिक वितरण समारंभ झाले. शहीद अशोक कामटे यांच्या प्रतिमापूजनाने सुरुवात करण्यात आली.

या स्पर्धेसाठी संघटनेचे अध्यक्ष निलकंठ शिंदे, मकरंद पाटील, तेजस कुरकुटे, रवींद्र कुलकर्णी, मुकुंद हजारे, शारीक तांबोळी, मयूर ढोले, विठ्ठलपंत शिंदे, अनिल तारळकर, मंगेश कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाप्रसंगी स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक तेजस कुरकुटे यांनी तर आभार रवींद्र कुलकर्णी यांनी मानले.

**विजेते स्पर्धक :** समर्थ काळे, कुंभार गल्ली-प्रथम, स्वयंम गाडे, श्रीराम ग्रुप-द्वितीय, अष्टविनायक मित्रमंडळ, पुजारवाडी-तृतीय क्रमांक तसेच उत्तेजनार्थ शंभू गोडसे, शिवशक्ती ग्रुप-कुंभार गल्ली, विराज पाटील-कडलास, चिन्मय कुलकर्णी-अष्टविनायक ग्रुप, राजवीर वाघ-कुंभार गल्ली, राजवर्धन शिंदे, अक्षय कुलकर्णी, देवराज पोळ सरंजामदार, आर्यन यादव

## बार्शी नगरपरिषद निवडणूक; प्रशासनाची तयारी पूर्ण; यंत्रणा सज्ज

**१ लाख ९ हजार १२ मतदारांसाठी ११२ मतदान केंद्र**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१डिसेंबर-**

बार्शी नगरपरिषद निवडणुकीसाठी शहरातील २१ प्रभागांतील मतदान केंद्रांची निश्चिती झाली असून, या निवडणुकीत एकूण १ लाख ९ हजार १२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

यासाठी शहरातील ४३ ठिकाणी ११२ मतदान केंद्र आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर १ केंद्राध्यक्ष, ३ मतदान अधिकारी, १ पोलीस व १ शिपाई अशा ६ जणांची टीम असणार आहे. तसेच दोन प्रभागासाठी १ असे ११ झोनल ऑफिसर आहेत. अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस यंत्रणाही सज्ज झाली असून रविवारी बार्शी पोलिसांनी शहरातून रुट मार्च काढला. मतदान केंद्रावर वृद्ध व




अपंग मतदारांकरीता व्हील चेअरची सोय करण्यात आलेली आहे. केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना प्रशिक्षण पूर्ण झाले असून १ डिसेंबर रोजी ते सायंकाळी ४ ते ५ वाजता ते आपापल्या मतदान केंद्रावर सर्व साहित्य घेऊन मुक्कामासाठी जाणार आहेत. २ डिसेंबर मतदान दिवशी सकाळी ६.३० वाजता मतदान अधिकारी हे उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांना मॉक पोल दाखविणार असून, प्रत्यक्ष मतदानाची वेळ ही सकाळी ७.३० ते ५.३० वाजेपर्यंत आहे. प्रत्येक मतदाना केंद्रावर दोन मतदान मशीन असून, पहिल्या मशीनवर नगराध्यक्ष पदाचे उमेदवार तर दुसऱ्या मशीन वर नगरसेवक पदाचे अवब उमेदवार यादी असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक अधिकारी तैमूर मुलाणी यांनी दिली.

बार्शीतील ११२पैकी २० मतदान केंद्र हे संवेदनशील असल्याने त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या निवडणुकीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये, भांडण-तंटे होऊ नये याची खबरदारी घेत बार्शीकरांनी मतदान शांततेत पार पाडण्याचे आवाहन पोलीस उपविभागीय अधिकारी अशोक सायकर व पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी केले आहे. मतदानादिवशी पोलीस बंदोबस्तासाठी पोलीस उपविभागीय अधिकारी १, पोलीस निरीक्षक २, पोलीस सहाय्यक निरीक्षक ५ पोलीस उपनिरीक्षक ५, पोलीस १४० व होमगार्ड १५२ अशा प्रकारे पोलीस अधिकारी बंदोबस्तासाठी सज्ज झाले आहेत.